# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९६ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | | ४८ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष दुसरे / अंक १ / जुलै १९९७

## संपादकीय

### भारत - एक ठेंगू लोकांचा देश ?

मराठी भाषेमध्ये ठेंगूला बुटका किंवा खुजा असे पर्यायी शब्द आहेत. हे सर्व शब्द माणसाच्या उंचीशी निगडित आहेत. वस्तुतः माणसाची उंची आणि त्याची बौद्धिक क्षमता यांचा दूरान्वयानेही संबंध नाही. उंच मनुष्य निर्बुद्ध असू शकतो, किंवा बुटका मनुष्य बुद्धिवान असू शकतो. पण मोजमापाच्या परिभाषा आणि परिमाणामध्ये उंची, लांबी, खोली हे विकास किंवा प्रगती दर्शवितात. व्यवहारामध्ये सुद्धा परीक्षेमध्ये अधिक गुण मिळणे हे चांगल्या बुद्धीचे लक्षण ठरले आहे. शाळा, महाविद्यालयांमधील प्रवेशाकरिता सुद्धा 'गुणवत्तेनुसार प्रवेश' असे जेव्हा सांगितले जाते, तेव्हा सर्वांत अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यालाच प्रवेश, असा त्याचा अर्थ असतो. यांत्रिकी, गणिती, वस्तुनिष्ठ, शास्त्रीय तत्त्वज्ञानांत 'प्रगती' किंवा 'विकास' हा श्रेणीयुक्तच (linear) गृहीत धरला आहे. या विचारसरणीचाच एक भाग म्हणून २१ वे शतक म्हणजे जणू काही प्रगतीचा परमोच्च बिंदूच, या दृष्टिकोनातूनच आज सर्व मानवी घटनांचा विचार केला जात आहे. या आधीची शतके ही माणसाच्या विकासातील 'बाल्या'वस्था आणि पुढील येणारे प्रत्येक शतक हे प्रगतीचे पुढील पाऊलच, हा या विज्ञानसंस्कृतीचा एक गृहीत सिद्धान्त आहे. दर माणशी सल्फ्यूरिक ॲसिड, साबण किंवा मोटारींचा वापर हे या प्रगतीचे निर्देशांक आहेत. या सर्वच उपभोग्य वस्तूंचा वापर जेवढा अधिक तेवढा प्रगतीचा आलेख अधिक उंच. आलेख जेवढा ठेंगू तेवढा तो देश अप्रगत. प्रगतीचे हे मोजमाप आणि निर्देशांक नुसतेच चुकीचे किंवा एकांगी नसून माणसाच्या विकासाच्या वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. सुसंस्कृत, सभ्य समाज निर्माण करण्याकरिता लागणारी महत्त्वाची नीतिमूल्ये, त्याग, संयम, अध्यात्म यांचा या मोजमापामध्ये कुठेच अंतर्भाव नाही. आत्मकेंद्रित, चंगळवादी, बेजबाबदार मानव अधिकार आणि भोगवाद म्हणजेच प्रगतीकरिता आवश्यक ठरणारा 'व्यवहार्य', 'विज्ञाननिष्ठ' दृष्टिकोन असा समज यामुळेच निर्माण करून देण्यात येत आहे. अर्थातच जगातल्या विचारवंतांचा या प्रगतीबद्दल भ्रमनिरास झाला असून 'प्रगती'चे हे आलेख मानवाच्या 'विकासा'पेक्षा 'भकासा'चे निर्देशांक असल्याचे त्यांना आता वाटू लागले आहे. कुटुंब, लग्न इ. सामाजिक संस्थांची यामुळे झालेली वाताहात आणि त्यामुळे निर्माण झालेला भावनाशून्य बधिर समाज, तसेच पर्यावरणातील बिघडलेल्या संतुलनामुळे निर्माण झालेले प्रश्न जगातल्या वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंतांची झोप उडवू लागले आहेत. २१ व्या शतकात येणारा संगणक किंवा जैविक तंत्रज्ञान यांपेक्षा मानवाच्या नीतिमूल्यांचा होणारा ह्रास, हीच विवंचना या शास्त्रज्ञांना अधिक भेडसावू लागलेली दिसते. सध्या अमेरिकेमध्ये चालू असलेल्या राष्ट्रसंघाच्या, पृथ्वीच्या पर्यावरणासंबंधात

(मुखपृष्ठ २ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष दुसरे/ अंक १ / जुलै १९९७

संपादक
डॉ. विजय वा. बेडेकर

सहसंपादक
श्री. प्रकाश ल. वैद्य

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

वार्षिक देणगी
रु. २०० / -

मुद्रक :
परफेक्ट प्रिण्टस,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) Sports & Pastimes in Ancient India | डॉ. विजय वा. बेडेकर | ५ |
| ४) कर्करोग व सामाजिक प्रणाली | श्री. प्रकाश ल. वैद्य | ८ |
| ५) वेदकालीन राज्यपद्धती | श्री. शं.बा. मठ | १९ |
| ६) भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१) | डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी | २९ |
| ७) मन आणि शरीर | श्री. वसंत वि. अकोलकर<br>श्री. पुं.ह. बेडेकर | ३३ |
| ८) महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ४१ |
| ९) सूची | | ४५ |

# लेखक - परिचय

१. **डॉ. विजय वा. बेडेकर**

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. **प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर**

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधून निवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. **श्री. प्रकाश ल. वैद्य**

आय. आय. टी. पवई, मुंबई, येथून बी.टेक (इलेक्ट्रिकल) ही पदवी संपादन, व्यवसाय: इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात सल्लागार, विशेष आवड आणि संशोधन : भाषा आणि संगीत या विषयांत.

४. **श्री. शं. बा. मठ**

B.P.T मधून निवृत्त. संस्कृत घेऊन M.A. धर्म, अध्यात्म या विषयात कार्य आणि लिखाण. संस्कृत नाटकातून कामे. ठाण्यातील कौपनेश्वर मंदिराच्या संदर्भ ग्रंथालय निर्मितीत योगदान.

५. **श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी**

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. काश्यपसंहिता या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

६. **श्री. वसंत वि. अकोलकर**

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६२) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

७. **प्रा. मोहन पाठक**

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

विजेतव्या लङ्का चरणतरणीयो जलनिधि-

र्विपक्षः पौलस्त्यः रणभुवि सहायाश्च कपयः।

लभाप्येके रामः सकलमजयद्राक्षसकुलं

क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥१॥

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगाः

निरालम्बो मार्गश्चरणविकलः सारथिरपि।

रविर्यात्येवान्तं प्रतिदिनमपारस्य नभसः

क्रियासिद्धिःसत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥२॥

धनुः पुष्पं मौर्वी मधुकरमयी चञ्चलदृशां

दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः।

स्वयं चैकोऽनङ्गः सकलभुवनं व्याकुलयति

क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥ ३ ॥

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने।

विक्रमार्जितसत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता ॥ ४ ॥

## डॉ. मोरेश्वर दि. पराडकर

वर दिलेल्या पहिल्या तिन्ही सुभाषिताचा समारोप एकाच ओळीने केला आणि सुभाषितकारांनी वाचणाऱ्यांच्या (पूर्वीच्या काळी 'विद्या कण्ठे' या म्हणीनुसार पाठ करणाऱ्यांच्या ) मनावर एक अनुभवाला येणारे सत्य बिंबवण्याचा प्रयत्न केला. मोठ्या लोकांचे सामर्थ्य किंबहुना त्यातून त्यांना हमखास मिळणारे यश (म्हणजे क्रियासिद्धि) हे त्यांच्या सत्त्वावर, आत्मविश्वासाने भरलेल्या व्यक्तित्वावर अवलंबून असते; त्यांना उपलब्ध असणाऱ्या साधनांवर नव्हे. किंबहुना त्यांची साधने दुबळीच असतात. त्यांच्यांत अनेक उणिवा असतात परंतु तरीही त्यांच्याच साहाय्याने हे लोक अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी व्यवहारात आणून दाखवतात. पहिल्याच श्लोकात हे पटवून देण्यासाठी इक्ष्वाकुकुलभूषण रामाचे उदाहरण घेतले. त्याला लङ्के सारखी सुवर्णमय नगरी जिंकावयाची होती, कारण त्याच्या पत्नीला पळवून नेणारा लङ्काधिपती होता. ही लङ्का पुष्कळच लांब होती. त्या काळात ज्ञात पृथिवीच्या दुसऱ्या टोकाला होती असे म्हटले तरी चालेल. या लङ्केला पोचण्यासाठी समुद्र (जलनिधि) ओलांडून जाणे भाग होते. समुद्र ओलांडण्यासाठी रामाला आपल्या पायांचाच आधार घ्यावा लागणार होता; बोटी किंवा जहाजे त्या काळात उपलब्ध नव्हतीच. आणि इतका भगीरथप्रयत्न करून ज्या शत्रूवर (विपक्ष) विजय मिळवावयाचा होता तो पुलस्त्य ऋषींच्या कुळात जन्मलेला रावण. सुभाषितकाराने रावणाला उद्देशून हा शब्द मुद्दाम वापरला कारण याच्यामुळे रावणाचे सामर्थ्य, त्याच्या कुळातील ज्ञानाची व शक्तीची उंची लक्षात येते. शत्रू हा साधासुधा नव्हताच; उलट तो शक्तीने युक्त, बुद्धीने समन्वित होता. आणि पराक्रमी राक्षसांच्या साहाय्याने संपन्न होता. इकडे रामालासुद्धा सहाय म्हणजे रणाङ्गणात साहाय्य करणारे मित्र मिळाले होते, पण ते वानर होते. रावणाच्या सेवकांप्रमाणे शक्तिमान नव्हते. थोडक्यात, रामाच्या मार्गात अनंत अडचणी होत्या आणि तो तसा एकटाच. तरीही सम्पूर्ण राक्षसकुलावर रामाने आपल्या धैर्याच्या जोरावर विजय मिळवलाच ना ? याला कारण रामाचे सत्वसंपन्न व्यक्तित्व.

दुसरे उदाहरण सूर्याचे. हा दर दिवशी आकाशाच्या एका टोकाकडून म्हणजे पूर्वेकडून पश्चिमेपर्यंतचे अंतर ओलांडून जातो. याचीही साधने दुबळी. याच्या रथाला एक चाक, आणि त्याला सात घोडे जुंपलेले. लगाम कोणते तर सापच (भुजग) वर सारथी कोणीतरी अरुण, तो बिचारा पांगळा ! आणि आकाशाचा मार्ग तरी कसा ? तोही अपार, कुठलाही आधार नसलेला. 'आधाराविण मार्ग नभाचा' हे तर उघडच आहे. असे असूनसुद्धा सूर्य एकदाच नव्हे तर दर दिवशी असे अनन्त आकाश ओलांडून जाताना आपण पहातो. याला कारण अर्थातच सूर्याचा अभेद्य निर्धार; त्याचा स्वयंसिद्धपणा. साधने कशी याची त्याला परवा नाही; ध्येय गाठणे आणि तेही एखादे दिवशी नव्हे तर दररोज, नियमाने.

याचेच तिसरे उदाहरण, हे तर प्रत्येक मनुष्याच्या जीवनात एकदा तरी अनुभवाला येणाऱ्या मदनाचे. जन्माला

येणारी प्रत्येक व्यक्ती केव्हाना केव्हातरी प्रेम करते; यात स्त्रीपुरुष हा भेद नाही. तो तिच्यावर आणि ती त्याच्यावर अनुरक्त होते. हा प्रभाव प्रेमदेवतेचा, कंदर्पाचा किंवा मदनाचा. ज्याला याचा अनुभव येत नाही तो करंटा. इंग्रजीत म्हटलेले आहे: She is better to be loved and lost than not to be loved at all. जगातील प्राणिमात्रांवर प्रभाव पाडणारा हा मदन स्वतः 'अनङ्ग' कारण याचे शरीर शंकराने आपल्या तिसऱ्या डोळ्यातून बाहेर पडलेल्या अग्नीने जाळून टाकले. याची साधने पहावी तर अगदी कोमल. धनुष्य फुलांचे . धनुष्याला दोरी कुठली ? तर भुंग्यांची. फुलांच्या धनुष्यातून निघणारे बाण तरी मुळात तीक्ष्ण नाहीत कारण स्त्रीचे चंचल कटाक्ष हेच बाण. यांच्या जोरावरच शकुन्तलेने दुष्यंताचे हृदय जिंकले आणि ज्यूलियटने रोमियोला वश करून टाकलं बरं. या मदनाचा मित्र चंद्र, तोही निर्जीवच (जडात्मा) आणि शीतल किरणे असणारा म्हणजे एका दृष्टीने थंडगारच. असे असूनसुद्धा मदन ही प्रेमाची अधिदेवता सर्व जगाला व्याकूळ करते. शंकराने रागाने मदनाला जाळून टाकले हे खरे, परंतु नंतर पार्वतीने प्रखर तपस्या केल्यामुळे प्रसन्न झालेल्या शंकराने पार्वतीला उद्देशून 'कुमारसंभव' या कविकुलगुरूच्या महाकाव्याच्या पाचव्या सर्गात 'आजपासून हे सुन्दरी, मी तुझ्या तपाने विकत घेतलेला दास आहे' असे उद्‌गार काढले तेही या देह नसलेल्या प्रेमदेवतेच्या प्रभावामुळेच ! या सर्वांचे कारण एकच. स्वयंसिद्ध अशा व्यक्तींचे यश साधनांवर अवलंबून नसते; ते त्यांच्या व्यक्तित्वाच्या मूलभूत सामर्थ्यावर आधारित असते.

चौथ्या सुभाषितात पराक्रमी व्यक्तीचे खरे लक्षण सांगितले. यासाठी सुभाषितकाराने सिंहाचे उदाहरण घेतले. त्याला 'वनराज' म्हणजे अरण्यातील पशूंचा राजा असे म्हणतात, हे खरे; परंतु हे राजेपण अभिषेकासारख्या समारंभाने किंवा मुकुट, वस्त्रे आणि अलंकार घालून कोणी करीत नाही. या सगळ्या बाह्य सोपस्कारांची जरूरी सिंहाला भासत नाही, कारण तो आपल्या पराक्रमाच्या जोरावरच इतर प्राण्यांची शिकार करतो, त्यांना आपल्या ताब्यात आणतो आणि स्वतःच वनाचा राजा होतो. मृगेन्द्रता म्हणजे प्राण्यांमधील श्रेष्ठता ही त्याने पराक्रमाच्या जोरावर मिळवलेली असते; त्यासाठी राज्याभिषेक किंवा एखादा समारंभ करून राजपदाचे वस्त्रे द्यावयाची तो वाट बघत नाही. सिंह हा 'पराक्रमाने स्वयेच बादशहा तो वनांतला' हेच खरे.

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्ते-

र्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।

अधोमुखस्यापि कृतस्य वह्ने-

र्नाधः शिखा यान्ति कदाचिदपि॥ ५ ॥

प्रायः कन्दुकपातेनोत्पतत्यार्यः पतन्नपि

तथा पतत्यनार्यस्तु मृत्पिण्डपतनं यथा ॥ ६ ॥

पाचव्या श्लोकात धैर्यशाली व्यक्तीच्या गुणाचे योग्य वर्णन केले . धैर्य हा अशा व्यक्तीचा अंगभूत गुण असतो. तो 'कदर्थित' म्हणजे संकटात सापडला, त्याला वाईट दिवस आले तरी धैर्य हा गुण पुसला जात नाही. हे पटविण्यासाठी दैनंदिन व्यवहारातले उदाहरण घेऊन सूक्तिकाराने बहार केली. मशाल जरी खाली तोंड करून उलटी धरली तरी तिच्या ज्वाला खाली कधीच जात नाहीत; त्या नेहमी वर उसळून येणार. धैर्यशाली व्यक्तीचे धैर्य म्हणजे अग्नीची ज्वाळा असते. तिला दाबून टाकणे अशक्य.

सहाव्या श्लोकातही धैर्यशाली, आर्य व्यक्तीचा गुण मोठ्या खुबीने सांगितला. आर्य किंवा धैर्यशाली माणूस पडला तरी चेंडूसारखा पडतो म्हणजेच उसळी घेऊन वर येतो. पडून राहणे किंवा हार पतकरणे हे त्याच्या स्वभावातच नसते. याच्या उलट वर्तन भ्याडाचे किंवा अनार्याचे असते. असा इसम पडला तर तो मृत्पिण्डाप्रमाणे, किंवा मातीच्या गोळ्याप्रमाणे पडतो. मातीचा गोळा एकदा पडला की फुटतो, पुन्हा वर येत नाही. भ्याड माणसाचे असेच असते. संकटे भ्याडाप्रमाणे धैर्यशाली व्यक्तीवरही येतात परंतु भ्याड खचून जातो तर आर्य किंवा धैर्यशाली माणूस संकटांनी खचून जात नाही , उभारी धरतो आणि पडलेल्या चेंडूप्रमाणे पुन्हा उसळी मारून वर येतो. कारण पाचव्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे माणसाचे धैर्य हे अग्नीच्या ज्वाळेप्रमाणे असते. उसळी मारून वर येणे; संकटावर मात करून पुन्हा चमकणे हा त्याचा स्वभाव असतो.

• • •

# Sports and Pastimes in Ancient India

*Dr. V. V. Bedekar*

*[ Introductory Speech delivered by Dr. V. V. Bedekar in the seminar on 'Sports and Pastimes in Ancient India ' held on 26th April 1997 at Thane, under the auspices of Institute for Oriental Study, Thane ]*

I have great pleasure in welcoming you to this daylong seminar on ' Sports and Pastimes in ancient India', held under the auspices of the Institute for Oriental Study, Thane.

We have been conducting seminars on different facets of Indian culture, since 1982. This will be the twentyfirst seminar in this uninterrupted series of seminars. We have scholars from different parts of the country, assembled here today, and there will about twentyfive presentations. I am sure that we will be richer in knowledge by the end of the day.

Some of the greatest scientists of the modern world, such as Kepler, Ampere, Darwin, Pasteur, Plank and Einstein have described that, at the moment of discovery they felt the same pleasure and excitement that a child feels while playing. Their admission regarding their experience offers a valuable insight to understand the meaning and the philosophy regarding play. Scientists feel that the 'impulse to play, ' which can also be called 'curiosity' or 'exploration impulse,' gives species and individuals an advantage in the process of natural selection. Biologists believe that few species retain in adult life their youthful capacity for play.

I have been using the word 'play', and all scholars, scientists and researchers find it very difficult to use 'games' and 'sports' as equally meaningful substitutes for the word 'play'. These words differ in their concepts and meaning, and using them as synonyms, leads to confusion. renowned Psychosociologist M.M. Bousqust has described play as follows :

" Play is desire for that with which one plays, not desire for something which one lacks and feels one must obtain. It is desire for the here and now, for the passing and the coming moment. In other words, play is pure appetite for living, not for this or that type of life made desirable by fashion or habit, but for things as they are, for life as it is. " He further states, ' the more play is authentic- as in the case of an absorbing children's game- the more the player feels freed from the contingencies of all kinds. Play in totally gratuitous and, as the German philosopher Eugen Fink has remarked, 'it is an oasis of happiness in the desert of so called serious life.'

Play is difficult to define. Play demands nothing, play is innocence. Play is creativity. Play transmits no academic or social skills. It encourages an aesthetic appreciation of the world. When the reason for playing is to win, the play ceases to be a pastime or leisure. Today's games and sports are the enemies of play. The encroachment of technology, advertising, and influence of money have made sports increasingly harsh and ruthlessly competitive.

Leela and Kreeda are the two words which are close to the English word 'play'. Only English language uses two words, game and play; but the same concept in French, German, Spanish and many other languages is described by a single word. If we want to understand the philosophy, spirit and cultural dimension of our Kreedas, Leelas, Vinod and Utsavas, we will have to purge ourselves from the semantic influence of English language and colonial mindsets.

The variety, diversity, its relation to religion can only be understood by indianising our outlook.

Study of festivals, plays and games, is as important as that of any other compartment of human activity. Encyclopaedia Britannica mentions that :

"The history of sports and games is a part of the history of man as a social animal, his interrelations with other individuals and groups, his civilization and culture, and specially his play."

British, German, French and other Western indologists, when they came in contact with this civilization, from eighteenth century onwards, were surprised to see a non-European civilization with a highly evolved language, philosophy, social institutions, art and architecture, and trade and health systems. Though they were aware of Greco-Roman tradition of sports, organisation of games for competitive play and codification of rules for each game took place in Europe only in the nineteenth century. Sir William Jones, the father of Indology, who initiated the study of language and comparative religion, had also observed, "If the Festivals of the old Greeks, Persians, Romans, Egyptians and Goths, could be arranged with exactness in the same form with the Indian, there would be found a striking resemblance among them; and an attractive comparison of them all might throw light on the religion, and perhaps on the history of primitive world."

As compared to the other aspects of culture, exclusive texts regarding sports and pastimes were not readily available to the scholars. The games of dice and hunting, as they were dominant royal games did attract them, but other games and pastimes as enjoyed by the people at large, went unnoticed. Unfortunately, the Indians, who by and large followed the Western studies of Indian culture and civilization, also neglected this dimension of culture. However Mr. A.S. Phadke, in 1938, published his article 'The Sports and Games as referred to in Sanskrit Literature' (The Prince of Wales Saraswati Bhavan Studies, Vol. 10, pp. 64-98, published by Govt. Sanskrit Library, Varanasi, 1938). Mr. G. K. Shreegondekar had earlier presented a paper in the fourth Oriental Conference, titled 'Polo under the Chalukyas' (Proceedings published in 1926, Vol. II, p.373-382, Allahabad). Tribidnath Ray presented his paper ' The Indoor and Outdoor Games of Ancient India' in the third Indian History Congress, (proceedings, 1939, p.241-261, Calcutta). Mr. N. P. Joshi, Mr. K.K. Raja, Mr. Om Prakash, Narendra Jha Shastri are some others who have contributed articles related to this subject. However, the scholarship had to wait for the exhaustive work on this subject by that great scholar of Sanskrit, Dr. V. Raghavan, whose book 'Festivals, Sports and Pastimes of India' was posthumously published in 1979. The recent comprehensive publication 'Physical Education in Ancient India' by Mr. S.H. Deshpande of Hanuman Vyayam Prasarak Mandali, Amaravati, was completed in 1977, but was published only in 1992. We have paid a heavy price for this neglect. All knowledge books related to this subject, including Encyclopaedia of Sports, either have a cursory mention of this subject, or have written adversely. For example Van Dallen et al in their book 'A World History of Physical Education (New York, Prentice Hall Inc. 1953) has given a most misleading account of physical education and social life in ancient India. The author's observations as referred to by Mr. S.H. Deshpande in his above cited book (p.11) are as follows "The Hindus seek release from the harsh vicissitudes of life through absorption into the great 'eternal spirit' due to the causes such as

debilitating climate, high mortality rate, pestilence and poverty. They were essentially interested in educating children to seek their place in the divine order and to preserve the caste system. The emphasis was on the future life rather than the present. The youngsters were not inspired to 'get on in the world' or 'to help their fellowmen' or to identify themselves completely with national goals. The enervating climate sapped their strength and they accepted a religious philosophy that rejected bodily activity. This abnegation of life was in direct opposition to the maintenance of health and physical vigor".

C.A. Bucher in his book 'Foundations of Physical Education' (St. Louis : The C.V. Mosby Co. 1975, 7th ed.) repeated the same stories and observed that, people of India are highly religious, and they ignore the physical needs and desires of the body, and concentrate solely on spiritual needs. He also states that Buddha prohibited games, amusements and exercises. However this prohibition pertains to monastic life, While Jatak Kathas are full of sport and pastimes including wrestling, boxing and dancing. R.B. Forst in his book 'Physical Education Foundations-Practices-Principles (London : Addison Wesley pub. Co. Inc. 1975) refers to boxing, riding, hunting, dance, yoga; but gives very little information on physical education. E.A. Rice in his book 'A brief History of Physical Education' (New York : A.J. Barnes & Co. 1929) observed that, due to the warm climate, people are indolent, dreamy and speculative. He further writes that, Hinduism is inimical to progress, individuality, sanitation and physical education. 'He goes ahead and says that, Indian history in sterile as far as athletic sports and physical education are concerned. '

All the above mentioned observations are not only incorrect and far from the truth; but they are mischievous. They have simply borrowed from the earlier writings of Indologists and Sanskritists, many of whom were missionaries, and have echoed the same theories in their writings on religion and social life of ancient Indians. The same source material is borrowed by many Indian writers committed to alien ideology and intoxicted with reformist zeal. Only a prosperous, stable and harmonious society can give birth to creative plays and pastimes. Social historians must take a note of these activities enjoyed by a society, and reflected in its literature. V. Raghavan in his book, while giving account of Buddhist literature on sports & pastimes, informs that, The Chandalas are referred to as playing with iron balls and doing acrobatics on poles. Someshwara's 'Manasollasa' is literally an encyclopaedic work on seasonal pastimes and festivals, and mentions many Vinodas and Kreedas.

While commenting on Someshwara V. Raghavan in his book observed that, " The king as a wise and popular ruler uses this occasion to gather the forest dwellers, the Matangas and Chandalas, enjoys the Veena music for which they are reputed, and distributes cash presents to them. "

We also have descriptions of common man's plays prevalent in different parts of the country, though called by differed names. One such play is Pariharapatha, which Buddhaghosha describes as, a kind of hopping game played on a diagram drawn on the ground, by boys and girls using a potsherd. The game is known as "Ekka-Dukka" in Bengal, 'Pandi Sanitaka' in Tamil and ' Thikri' (potsherd) in Maharahstra.

We have a lot to learn from our past. We have to rediscover the true meaning of play, i.e.

(पृष्ठ क्र. ३९ वर)

# कर्करोग व सामाजिक प्रणाली

श्री. प्रकाश ल. वैद्य

*प्रास्ताविक : जुलै 96 मधील 'दिशा' च्या प्रथमवर्षीय प्रथम अंकापासून भाषाविषयक लेखमालिका सुरू झाली. आता या द्वितीय वर्षाच्या प्रथम अंकात आपण 11 व्या पायरीवर पोचलो आहोत. संदर्भ लागावा म्हणून कर्करोगविषयक मागील लेखांचा आढावा उपयुक्त ठरेल. लेखांक 1 ते 5 मध्ये जनुकांचा व जननदोषांचा परिचय झाल्यानंतर लेखांक 6 मध्ये शारीरिक कर्करोगाचे ज्ञान मिळविले. यात कर्करोगप्रक्रियेवर भर दिला. कुठल्याही प्रगत प्रणालीत कर्करोगसदृश प्रक्रिया उद्भवू शकते असा सिद्धान्त कल्पून तत्पुष्ट्यर्थ विविध प्रणालींचा अभ्यास केला. लेखांक 7 मध्ये जंतुसंसर्ग व भौतिक धोके-युद्ध, आक्रमण, स्थलान्तर यांचा विचार केला. भौतिक प्रणालींप्रमाणेच वैचारिक प्रणाली व संस्थांमध्येही अशी प्रक्रिया घडू शकते. मानवसमाज अनेकविध वैचारिक प्रणालींवर आधारलेला असल्यामुळे त्यांचा प्रणालीनुरूप परामर्ष घेणे अगत्याचे ठरते. लेखांक 8 मध्ये अफवा, प्रवाद या तात्कालिक दोषांचा विचार करून सुरचना व गोंधळ यांमागील वैज्ञानिक तत्वाचा परिचय करून घेतला. आजचे युग हे अर्थयुग आहे म्हणून आर्थिक प्रणालीतील दोष लेखांक 9 मध्ये पाहिले. सहजीवन समाजधारणा करते, पण भोगलालसेमुळे आर्थिक प्रगती झाली तरी सामाजिक ह्रास होतो हा सध्याच्या आर्थिक प्रणालीचा मोठा धोका दिसतो. आर्थिक प्रगतीनंतर राजकीय सत्ता महत्वाची आहे. तिच्यातील दोष लेखांक 10 मध्ये पाहिले. आर्थिक सत्तेत स्वामित्वाला महत्त्व आहे, त्याप्रमाणे राजकीय सत्तेत नियंत्रणाला महत्त्व आहे. त्यासाठी सत्ताधाऱ्यांना विशेषाधिकार मिळतात. हे अधिकार लोकोपयोगी कार्यासाठी वापरण्याऐवजी व्यक्तिगत लाभासाठी वापरण्यामुळे होणारा भ्रष्टाचार हा सध्याच्या राजकीय व्यवस्थेतला मोठा रोग असल्याचे पाहिले. या दोन्ही बाह्य प्रबंधाच्या प्रणाली आहेत. राज्याचे कायदेकानू मुख्यतः आर्थिक व राजकीय प्रणालींच्या नियमनासाठी असतात. परंतु एवढ्याने मानवी समाजजीवनाचा आवाका संपत नाही. ते इतर अनेक व्यक्ताव्यक्त प्रणालींवर अवलंबून असते.*

**सामाजिक प्रणाली :**

आर्थिक व राजकीय सोडून उरलेल्या सर्व प्रणालींना सामाजिक प्रणाली म्हणता येईल. अर्थात हे वर्गीकरण कृत्रिम आहे व या तिन्ही प्रणाली एकमेकीत गुंतलेल्या आहेत. परंतु विश्लेषणाच्या सोयीसाठी असे केले जाते. खरे म्हणजे आर्थिक व राजकीय प्रणाली जास्त प्रकट असल्या, तरी शेवटी त्या सामाजिक प्रणालींवरच आधारलेल्या असतात. आर्थिक भोगवाद व राजकीय भ्रष्टाचार हे शेवटी सामाजिक प्रणालीमुळेच उद्भवतात. हे लक्षात न घेता अधिकाधिक कडक कायदे केले तरी भोगवाद व भ्रष्टाचाराला आळा घालता येत नाही, हे आपण भोवतालच्या परिस्थितीवरून अनुभवतोच आहोत. त्याची कारणमीमांसा सामाजिक प्रणालींच्या अभ्यासातून होऊ शकेल, अन्यथा नाही.

**समाज आणि तत्त्वज्ञान :**

सामाजिक प्रणालींचे परत दोन भाग करावे लागतात, १) संघटनात्मक (सामाजिक) २) वैचारिक (मानसिक). संघटनात्मक प्रणाली बाह्यरूप ठरवितात. त्यांनी व्यक्तीव्यक्तीतले संबंध ठरतात. व्यक्तींचे वर्तन कसे आहे याच्या निरीक्षणावरून संघटन समजते. परंतु वर्तन हे विचारांवर, व विचार हे व्यक्तिमत्वावर आधारलेले असतात. व्यक्तिमत्त्व हे मूल्ये, तत्त्वे, गृहीतके यांवरून ठरते. हे सर्व तात्त्विक प्रणालींच्या अभ्यासातूनच उलगडू शकते. स्थूलाकडून सूक्ष्माकडे या न्यायाने आपण प्रथम संघटनात्मक प्रणालींचा विचार करू.

**१) समाजसंघटन :** यालाच समाजधारणा असे म्हणता येईल. भारतीय विचाराप्रमाणे समाजधारणेचे काम धर्मामुळे होते. (धारयति इति धर्मः ।) खरे म्हणजे जगातल्या सर्व धर्मपंथांचे मुख्य कार्य हेच आहे. आर्थिक व राजकीय प्रणाली प्रथमावस्थेत होत्या तेव्हा धर्मपंथच त्यांचे कार्य

करीत असे. आपल्याकडे धर्मशास्त्र न्यायदानासाठी उपयोगात येई. इस्लामी शरियत ही असेच कार्य करीत असे. कुठल्याही धर्मांची मुख्य दोन कार्ये असतात, 1) सामाजिक व्यवहाराचे नीतिनियम ठरविणे 2) विश्वाचे कोडे उलगडणे. यापैकी विश्वाचे कोडे उलगडण्याचे काम आता विज्ञानाने उचलले आहे. सामाजिक व्यवहाराचे नियमही 'वैज्ञानिक नीतीने' ठरविता येतील असा एक भ्रम तथाकथित बुद्धिवाद्यांमध्ये प्रचलित आहे. परंतु विश्वाचे कोडे देखील विज्ञानाला उलगडलेले नाही; व सामाजिक व्यवहार ठरविण्यास एकटे विज्ञान असमर्थ आहे. त्यामुळे अजूनही सामाजिक व्यवहार धर्मपंथांना अनुसरूनच होतात.

धर्मनिरपेक्षता : पुष्कळशा आधुनिक राजसत्ता स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवतात. याचा खरा अर्थ धर्मसहिष्णुता असा हवा. परंतु याचा, निधर्मी राज्य असा विपरीत अर्थ कधी कधी लावला जातो. धर्माला राज्यव्यवहारात जरी स्थान नसले तरी समाजधारणा धर्माशिवाय होऊच शकत नाही. सुदैवाने बहुसंख्य प्रजाजन इतके बुद्धिवादी नसल्यामुळे ते पारंपरिक धार्मिक बंधने श्रद्धेने पाळतात, त्यामुळे समाज टिकला आहे. कागदावरील कायदे मात्र धार्मिक बंधने झुगारून देत आहेत. राजकीय व आर्थिक प्रणाली म्हणजे झाडाच्या फांद्या, पाने व फुले, फळे आहेत; तर समाजधारणा ही झाडाच्या मुळांप्रमाणे आहे. झाडाला मूळ नसले तर बिघडते कुठे, असे म्हणून कुणी मुळे तोडू लागला तर तो 'मूले कुठारः' चा विपरीतार्थ होईल. परंतु सध्याचे बुद्धिवादी व उपयुक्ततावादी धर्मश्रद्धेला निरुपयोगी व त्याज्य ठरवून हेच करू पाहत आहेत. त्याचे विपरीत परिणाम दिसू लागले आहेत.

व्यक्तिगत स्वैराचार : सध्याच्या कायद्यांप्रमाणे प्रत्येक नागरिक स्वतंत्र आहे व त्याला अनेक स्वातंत्र्याधिकार आहेत. यामागचे तत्व असे की, एखाद्याने आपल्या जीवनाचे काहीही बरेवाईट करून घेतले तरी त्यात इतरांचे काय बिघडते ? मग ज्याचे त्याला हवे ते करू द्यावे. अर्थात अशी स्वतंत्र व्यक्ती समाजापासून दूर एकटीच राहत असेल, तर तिने कसेही वागण्यास हरकत नाही. परंतु समाजात राहत असताना व्यक्तीच्या वर्तनाचे तात्कालिक आणि दूरगामी परिणाम विचारात घेतले पाहिजेत.

धूम्रपान व मद्यपानावर कायद्याने बंदी नाही. किंबहुना कराच्या उत्पन्नामुळे आर्थिक प्रणालीत ही व्यसने स्वागतार्ह मानली जातात. यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा आधार घेतला जातो. परंतु धूम्रपानामुळे इतरांना त्रास होतो. तसेच मोठ्यांनी धूम्रपान करणे वैध असले तरी त्यांच्या धूम्रपानामुळे मुलांवरही धूम्रपान योग्य असल्याचे संस्कार होतात. सामाजिक दडपणामुळे प्रगत देशांत सार्वजनिक स्थाने, कार्यालये, रेल्वे, विमाने इ. मध्ये धूम्रपानास बंदी घातली जात आहे. तसेच लहान मुलांना सिगारेट विकल्या जाऊ नयेत म्हणूनही नवे कायदे येत आहेत. म्हणजे सामाजिक स्वास्थ्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याला मुरड घातली जात आहे.

धूम्रपानाने शारीरिक व्याधी व कर्करोग उद्भवतात. उपचारांसाठी पुष्कळ खर्च येतो व तरीही आयुर्मान कमी होते. या सर्वांचा आरोग्यविमायोजनेवर ताण पडतो. शेवटी धूम्रपान न करणारे याचा भुर्दंड भरतात. हे खरे अगदी साधे तर्कशास्त्र आहे. तरीही ते वापरून सिगारेटउत्पादकांच्या गळ्यात हा खर्च बांधण्याचे कुणाला जमले नव्हते. परंतु अमेरिकेत सिगारेट उत्पादक व विविध राज्यशासने यांच्यात समझोता होऊ घातला आहे. त्याअन्वये सिगारेट कंपन्यांनी, 'धूम्रपान आरोग्यास बाधक आहे, त्यामुळे शासनावर आरोग्यसेवेचा भार पडतो, तसेच धूम्रपान हे व्यसन आहे,' हे सर्व मान्य केले आहे. त्याबद्दल नुकसानभरपाई म्हणून येत्या 25 वर्षांत एकूण सुमारे 300 अब्ज डॉलर्स = 300,00 कोटी डॉलर्स = सुमारे 1000,000 कोटी रु. किंवा दरवर्षी सरासरी 40,000 कोटी रु. देण्याचे मान्य केले आहे. हे सर्व आकडे छाती दडपून टाकणारे आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याचे स्वैराचारात रूपांतर झाल्यावर केवढी मोठी सामाजिक किंमत द्यावी लागते त्याचे हे बोलके उदाहरण आहे.

धूम्रपान वैध आहे की नाही, त्यातून मिळणाऱ्या कराचे उत्पन्न बुडेल त्याचे काय इ. विचार गौण ठरतात. जे धूम्रपानाचे, तेच मद्यपानाचे. भारतासारख्या देशात मद्यपानामुळे कित्येक कुटुंबांची क्रयशक्ती कमी होते. त्यामुळे अन्न, आरोग्य, शिक्षण यांची आबाळ होते. हा प्रश्न दारूबंदी करून राजकीय पातळीवर सुटत नाही, कारण स्वैराचारावर नियंत्रण ठेवण्यास गेले की, भ्रष्टाचार बोकाळतो. हा प्रश्न अंतिमतः सामाजिक पातळीवरच सोडवावा लागणार

आहे. धूम्रपान व मद्यपानाला जाहिरातबाजीमुळे आलेला प्रतिष्ठितपणा कमी केल्याशिवाय हे साधणार नाही. सिगारेट कंपन्यांनी खेळाचे प्रायोजन करण्यावर परदेशांत बंदी येऊ घातली आहे, ती यासाठीच.

मद्यपान परवडणाऱ्यांनी गाजावाजा न करता ते केले तर होणारे नुकसान कमी असेल. पण 'ओल्या' पार्टीला प्रतिष्ठा लाभल्यामुळे त्याचा प्रसार होत आहे. सार्वजनिक मद्यपानास बारसंस्कृतीमुळे उत्तेजन मिळत आहे. बारबरोबर 'बारांगना' (की वारांगना?) आल्यावर चित्र अधिकच बिघडू लागले आहे. इथे, ओल्याबरोबर सुकेही जळते. त्यामुळे 'सुक्या' उपाहारगृहांना 'कौटुंबिक उपाहारगृह' (Family Restaurant) अशी स्वतःची ओळख पटवावी लागत आहे.

या साध्या व्यसनांना कायदे आळा घालू शकत नाहीत, पण धर्मपंथ नियम ठरवू शकतात. हिंदुधर्मात उच्चवर्णीयांना अभक्ष्यभक्षणाप्रमाणेच मद्यपान निषिद्ध आहे. इस्लामही ते निषिद्ध मानतो. ख्रिस्ती धर्माचा नीतिसंस्थापक सेंट थॉमस याने अनेक निषेध सांगितले आहेत. कुणीतरी त्यावर मल्लनाथी केली की, 'पण त्याने धूम्रपान निषिद्ध मानलेले नाही !' यावर सॅम्युएल बटलरने सुचवले की, 'याचे कारण त्याला धूम्रपान माहीत नव्हते. माहीत असते तर त्याने नक्कीच बंदी घातली असती !' (तंबाखूचे पीक दक्षिण अमेरिकेच्या शोध लागल्यावर मिळाले. त्यामुळे सेंट थॉमसच्या काळी ते अज्ञात होते)

ज्या गोष्टी लोकांना कराव्याशा वाटतात त्यावर धर्मपंथ बंदी घालतात, त्यामुळे लोकांना धर्म नकोसा वाटतो. कायदेशीरपणा पुरेसा आहे असे मानले की, अलिखित बंधने टाळावीशी वाटतात. पण व्यसनमुक्त करण्याचे सामर्थ्य विचारापेक्षा श्रद्धेत अधिक असते. दारूच्या दुष्परिणामाविषयी व्याख्यान देऊन जी दारू सुटत नाही, ती गळ्यात तुळशीची माळ घालून शपथ घेतल्यावर सुद्धा शकते. शास्त्रीय विवाद हे मूठभर बुद्धिवाद्यांसाठी असतात; धर्म सामान्यांसाठी, नव्हे सर्वांसाठी असतो.

कुटुंबभंजन : आजचे युग विभक्त कुटुंबाचे आहे. त्यामुळे आधीच एकत्र कुटुंबपद्धतीच्या लाभांना आपण वंचित झालो आहेत. कुटुंबात व्यक्तिगत हितापेक्षा सामूहिक, कौटुंबिक हित महत्त्वाचे असते. त्यासाठी कधी कधी व्यक्तिगत स्वार्थाला तिलांजलीही द्यावी लागते.

धर्म हा कर्तव्याधिष्ठित असतो, पण आजची विधिव्यवस्था अधिकाराधिष्ठित आहे. आज कोणी दंडनीय अपराध सोडून काहीही केले तरी कुणीही त्याला जाब विचारू शकत नाही. कौटुंबिक स्वैराचारावर त्यामुळे नियंत्रण नाही. 'मुक्त' स्त्रियांनी कौटुंबिक हित स्वहितापेक्षा दुय्यम समजले तरी चालते. मुले व्यसनाधीन व अनभ्यासी झाली तर त्यांना शिस्त लावण्याऐवजी, 'त्यांना समजून घ्या' म्हणून उपदेश केला जातो. आईवडलांना म्हातारपणी संभाळणे हे पूर्वी आद्यकर्तव्य समजले जाई. आता त्यासाठी वेगळा कायदा करण्याची तयारी चालू आहे.

विवाहाचे महत्त्व कमी होऊन विवाहबाह्य संबंधांचे प्रस्थ वाढते आहे. पूर्वी सुद्धा अशी प्रकरणे असत, पण ती गुपचूप चालत. त्यांना प्रतिष्ठा नव्हती, त्यामुळे त्यांचे प्रमाण मर्यादित होते. बालकाला वडलांचे नाव माहीत नसणे कमीपणाचे समजले जाई. पण आता तसे नाही. स्त्रीमुक्तिवाल्यांनी तर 'केवळ आईचे नाव असले तरी चालवून घ्यावे ' असा आग्रह धरला आहे. यामुळे 'सत्यकामांचे' प्रमाण वाढेलसे दिसते ! 'प्रगत' राष्ट्रांत आधीच अशी सोय आहे. काही काळाने स्वतःच्या वडलांचे नाव निश्चित माहीत असणे कमीपणाचे समजले गेले, तर आश्चर्य वाटायला नको. तिकडील ख्रिस्ती चर्चने यातील सामाजिक धोका ओळखून त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. पण स्वैराचारी त्याला दाद देतीलसे दिसत नाही.

जातिभंजन : जात हे विस्तारित कुटुंबच असते. कुटुंबांतर्गत (सगोत्र) विवाह होत नाहीत, पण जातीत होतात. कुटुंब ही सगोत्रांची अंतर्मर्यादा , तर जात ही बहिर्मर्यादा. त्यामुळे विवाह कुटुंबाबाहेर पण जातीच्या आत होतात. जातीबाहेर होत नाहीत. पूर्वी विवाहासाठी कुटुंबाची आणि जातीची अनुज्ञा लागे. त्यामुळे कुटुंब व जात टिकून राहत. त्या काळी विवाह हे कौटुंबिक कर्तव्य होते. पण आता विवाह हा कायद्याने व्यक्तिगत अधिकार झाला आहे. त्याचा कुटुंबाशी, जातीशी किंबहुना समाजाशी संबंध नाही. कायद्याने कुणालाही कुणाशीही विवाह करण्यास अनुज्ञा आहे. अर्थात केवळ यामुळे कुणी मुद्दाम जातिबंधने तोडील असे नाही. साम्यवादी व समाजवादी यांनी तर, ' आंतरजातीय विवाह

हा अपवाद नसून नियमच व्हावा, त्यातच पुरुषार्थ आहे, वर्गहीन भेदहीन समाज अशा संकरातूनच निर्माण होईल.' असा प्रचार चालविला आहे.

जात ही रूढींनी व संस्कारांनी बांधलेली असते. स्वजातीय विवाहात संस्कृतिभेद नसतो, परंतु विजातीय विवाहात संस्कृतिभेदामुळे तणाव निर्माण होतात. विवाह करणारे अर्थातच ते मुकाट्याने हे सोसतात; कारण आधी शौर्याच्या वल्गना केल्यामुळे नंतर तक्रार केली तर अंगाशी येणार. इतर गोष्टी समान असताना (Caeteris Paribus) सजातीय विवाह अधिक सुखदायी ठरणार. अपवाद म्हणून विजातीय विवाह झाले तरी त्यात काहीतरी सांस्कृतिक किंमत मोजण्याची तयारी ठेवावी.

जातिसंकराने जातिभेद नष्ट होणार नाही. कारण अपत्याला बहुदा पित्याची जात पतकरावी लागते. जातिभिन्नता ही संस्कृतिभिन्नता मानली तर संस्कृतिप्रसाराने जात्युत्कर्ष घडेल. शिक्षणप्रसाराने हे घडू लागले आहे. सुदैवाने सामान्यजनांना हे काही शिकवावे लागत नाही. सजातीय विवाह हितकारक असतात हे त्यांना मनोमन ठाऊक असते. त्यामुळे समाजवाद्यांना अभिप्रेत असलेले जातिमंथन घडण्याची चिह्ने नाहीत. त्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर आपल्यापुरते काय हवे ते करावे. तो त्यांचा व्यक्तिगत अधिकार आहे. पण मारुतीच्या बेंबीत बोट घातल्यास गार लागते हे इतरांना पटविण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये. कुटुंबामुळे जात टिकते, जातीमुळे समाज टिकतो. व्यक्तिगत स्वार्थातून हे घडत नाही. आतापर्यंत स्वैराचारी वर्तनाचा विचार केला, आता स्वैराचारी आविष्काराचा करू.

आविष्कार: मनुष्य वर्तनाने इतरांशी संपर्क साधतो, त्याप्रमाणेच आविष्काराने तो अनेकांशी संधान बांधू शकतो. विविध कला व साहित्य ही आविष्काराची साधने. साहित्य व कला हे खरे संस्कृतीचे व समाजाचे घटक आहेत. त्यांनी इतर घटकांशी समतोल साधून राहिले पाहिजे, व परंपरा तशीच आहे.

परंतु काही सुधारकांना हे मान्य नाही. साहित्यासाठी साहित्य, तसेच जीवनासाठी कला नव्हे, तर कलेसाठी कला, असे विचार त्यांनी पसरविले आहेत. कला ही जर स्वान्तःसुखाय असेल व ती स्वतःपुरतीच ठेवली, तर तिला कुठलेच निकष लावण्याचे कारण नाही. पण आविष्काराचा मुख्य हेतू संवाद साधण्याचा असतो. म्हणजे समाजाशी संपर्क आला. तसे झाले की कलेसाठी कलेचा दावा कोलमडतो. 'आम्ही आमच्यापुरते व्यक्त करतो' असे म्हणून प्रसिद्धीची हाव धरणे, हे ताकाला जाऊन भांडे लपविण्यासारखे आहे. आपल्या कलेची समाजाने दखल घ्यावी अशी अपेक्षा असेल, तर समाजाच्या नीतिनियमांची, संकेतांची व श्रद्धांची कदर कलावंताने केलीच पाहिजे. आविष्कारस्वातंत्र्य हवे पण नीतिकर्तव्य नको, असे मान्य होणे कठीण आहे.

असे असूनही साहित्य व कला यांमध्ये, स्वैराचार करणारे व त्याचे समर्थन करणारे आहेतच. सभ्य म्हणजे जे सभेसमोर सादर केले तरी चालते ते. असभ्य गोष्टी जाहीरपणे केलेल्या चालत नाहीत. खाजगीत शिव्या दिल्या तरी चालतात. वार्ताहरांना काही गोष्टी अमुद्रणीय (off the record) म्हणून सांगितल्या जातात. असंसदीय उल्लेख इतिवृत्तातून गाळले जातात. सचिवाला धन्याच्या सर्व भल्याबुऱ्या व्यवहारांची माहिती असते, पण त्याने ती फोडणे अपेक्षित नसते. सचिव याचा इंग्रजी प्रतिशब्द Secretary, याचा अर्थच जो गुप्तता (Secrecy) राखू शकतो तो असा आहे. या सर्व परम्परा व्यक्तिस्वातंत्र्य-विरोधी आहेत, पण त्यांत सामाजिक हिताचा विचार आहे. वैद्यक व्यावसायिक जी शपथ घेतात त्यात रुग्णाविषयींची माहिती गुप्त ठेवण्याची व समाजहित जपण्याची प्रतिज्ञा असते. सर्व व्यावसायिक व्यवसायनीती पाळतात, असे असताना कलावंत व साहित्यिक यांना सामाजिक कर्तव्ये मुळीच नाहीत, व त्याचबरोबर अनिर्बंध स्वातंत्र्याचा परवाना, हे कसे शक्य आहे ? बाकी सर्व व्यावसायिकांप्रमाणेच कलावंत हे समाजघटक आहेत.

आजकाल मात्र आविष्कारस्वातंत्र्याचा गैरफायदा उठवला जात आहे. अर्वाच्य शिव्यांनी भरलेली आत्मचरित्रे लिहावी, व 'काय करणार आम्ही, बालपणी असेच ऐकले, मग ते सादर करण्याचे स्वातंत्र्य नको का' म्हणून सारवासारव करावी. हितचिंतकांनी 'ते लिहिताहेत ना, मग हवे ते लिहू देत' म्हणून फूस द्यावी. ऐतिहासिक व्यक्तींचे नावनिशीवार

चारित्र्यहनन करावे , व अनैतिहासिकतेच्या आरोप आल्यावर 'हा इतिहास नव्हे 'असे म्हणावे.

आविष्कारस्वातंत्र्य म्हणून मिरवणाऱ्या स्वैराचाराचे अनेक प्रकार आहेत. यात प्रथम व्यक्तिगत स्वैराचाराचे चित्रण व समर्थन येते. व्यक्तिगत स्वार्थ किंवा व्यसनाधीनता यांचे चित्रण साहित्यात पूर्वीपासूनच आहे, पण ते त्याच्या समर्थनासाठी नव्हे, तर त्यापासून परावृत्त करण्यासाठी. उदा. 'एकच प्याला' मध्ये दारूच्या व्यसनाच्या दुष्परिणामांचे उत्तम चित्रण आहे, पण त्यातून मद्यपानाचा निषेधच केलेला आहे. पूर्वी सर्व कथांमधून शेवटी दुष्टांचे निर्मूलन व सत्याचा विजय होत असे. दुसरे म्हणजे व्यसनवर्णनात देखील सभ्यतेच्या मर्यादा पाळल्या असत. आता नीतिसार व सभ्यपणा दोन्हीचा अभाव असतो. प्रतिभावंत लेखकसुद्धा अश्लील किंवा बीभत्स लेखन करण्यात धन्यता मानतात, त्यातून मानधनही मिळत असेल. अशा स्वैराचाराचे नुसतेच वर्णन व छुपे समर्थन वास्तववादाचा बुरखा पांघरून केलेले असते. यात कुटुंबातर्गत व कुटुंबबाह्य अनैतिक संबंध दाखवले जातात. व्यक्ति , कुटुंब व जाति-भंजन यातून साधते.

असभ्यदर्शन : हे सर्व करताना भाषा सूचक असेल तर बाह्यतः तरी ते सभ्य वाटेल, पण वास्तव वाटणार नाही. वास्तवता हवी म्हणून सभ्यता गुंडाळून ठेवली जाते. लेखनात अशी भाषा वापरली असेल तर ती एकट्या वाचकाला भोवते, कारण वाचन सहसा ऐकांतिक असते. पण नाट्याविष्कारात दृश्य संकेतही असतात त्यामुळे असभ्यपणाला अधिक वाव मिळतो. एका प्रसिद्ध आधुनिक नाटकात पक्षिगुणांचे सूचकत्व होते. अत्याचाराचे प्रतीक म्हणून त्यात लाल शाईने वस्त्रकलंक दाखविले होते. याला सेन्सॉरने आक्षेप घेतल्यावर लाल शाईऐवजी निळी शाई वापरण्यात आली व या बदलाचा खुलासा नाटकाच्या जाहिरातीत करण्यात आला. याला लेखकाने आक्षेप घेतल्याचे स्मरत नाही. कदाचित त्याला तसेच अभिप्रेत असेल. नाटक हा सहानुभव आहे, भिन्न रुचीचे जन एकत्र बसून त्याचा आस्वाद घेत असतात. ही एक सभाच असते, त्यामुळे सभ्यतेच्या मर्यादा अधिकच कठोर हव्यात. लेखनात जे चालू शकेल त्याला देखील नाटकात प्रदर्शनास अनुज्ञा नाही. जुन्या संकेतांप्रमाणे भोजन, निद्रा, रक्तपात आदी रंगमंचावर दाखवणे निषिद्ध मानले आहे. असे असताना हे संकेत मुद्दाम मोडून वेडेवाकडे का दाखवावे ? पौरजन तमाशा अश्लील असतो असे समजतात. पण त्यातला अश्लीलपणा फार तर भाषेत असतो, प्रत्यक्ष प्रदर्शन नसते.

विकृतिदर्शनाची कारणे : याचे परिणाम काहीही असले तरी कारणे अनेकविध असू शकतात. यात स्वभावाविष्काराबरोबरच सवंग लोकप्रियता, उदरभरण, अर्थार्जन, स्पर्धा असे व्यक्तिगत स्वार्थ असू शकतात. त्याशिवाय चारित्र्यहनन, संस्कृतिभंजन असे दूरगामी हेतूही असू शकतात.

स्वैराविष्कार : लेखक बहुदा सुशिक्षित असतो, पण सुसंस्कृत असतोच असे नाही. शिक्षणाने आविष्कारसामर्थ्य येते व संस्कृतीने त्यावर मर्यादा घातल्या जातात. यामुळे सुसंस्कृत लेखक सभ्यतेच्या मर्यादा पाळतात. यात अर्थातच त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो. ज्यांना सांस्कृतिक बंधने मान्य नसतात, ते शक्य झाल्यास स्वतःच स्वैराचारी बनतात. ज्यांना ते साधत नाही पण ज्यांचे भाषेवर प्रभुत्व असते, ते अशा स्वैराचाराची कल्पना व वर्णन करतात. यातून कदाचित स्वैराचाराचा स्वप्नसदृश अनुभव मिळत असेल. पण हा विचार मनोविश्लेषण करणाऱ्यांसाठी सोडलेला बरा. शिवाय हे मानसोपचारकही पाश्चात्य विचारांचे अंधानुकरण करून, अंतर्मनाची गटारे उपसण्यातच धन्यता मानतात, त्यामुळे स्वैराविष्काराचे विश्लेषण त्यांना पर्वणीच वाटावी.

भाषिक स्वैराचार : समाजात सुशिक्षित कमी व त्यातही वाचकांचे प्रमाण अल्प, शिवाय पुस्तके संग्रही नसतात व ती घरबसल्या मिळत नाहीत, त्यामुळे स्वैराचारलेखन फारसे पसरत नाही. वाचन हा एकट्याने करण्याचा उद्योग असल्यामुळे त्याचा परिणाम वाचकापुरताच राहतो. यामुळे भाषिक स्वैराचार विशेष गंभीर वाटत नाहीत. परंतु सर्व विचारांचे मूळ भाषेत आहे व भाषिक स्वैराचार अनेक पातळ्यांवर घडून त्याचे इतर स्वैराचारांत रूपांतर होऊन नाश ओढवतो हे हळूहळू अभ्यासाने उमगेल.

स्वैराचार हा स्वैरविचारात उगम पावतो. काया जे करते ते आधी मनात उद्‌भवते म्हणून तर कायावाचामनाने असा वाक्प्रचार आहे. स्वैराचार हे भाषेच्या माध्यमातून होतात. त्यामुळे स्वैराचाऱ्याचे प्रतिबिंब त्याच्या भाषणात

सापडते. स्वैराचारवर्णन हेही भाषेतून घडते. त्यामुळे दोन्ही मार्गांनी आपण भाषेशी येऊन पोहोचतो.

**आशय आणि अभिव्यक्ती :** स्वैराचार हा जर वर्णनविषय असेल, तर तो आशयाचा भाग ठरेल. कलाविष्कारात आशयाचे उदात्तीकरण अभिव्यक्तीने करता येते व सभ्यता पाळूनही सूक्ष्म विचार प्रकट करता येतात. 'साडी नेसतानाच सुंदर दिसत होती.'(स्वयंवर) - 'अर्जुनाच्या धनुष्याचे नाव घेताना मला उगीचच लाजल्यासारखे होते' - पु.ल. अशा वाक्यांमध्ये , भाषेचे व परंपरेचे विविध संदर्भ माहीत असून ते वेळीच आठवले तरच गूढार्थाचा बोध होतो. ही क्रिया सूक्ष्मविचाराची असल्यामुळे सामान्य भाषेत असभ्य वाटणारा आशय इथे तसा वाटत नाही. अभिजनांच्या भाषेत काही उल्लेख प्रकटपणे करण्यास परवानगी नसते. परंतु ते विशिष्ट संकेतांतून केलेले चालतात.

**शरीरसौंदर्य :** मानवी देह कितीही आकर्षक असला तरी त्याचे उघड प्रदर्शन करणे कुठल्याही संस्कृतीत असभ्यपणाचे मानले गेले आहे. त्यामुळेच वस्त्रप्रावरणांचे संकेत ठरलेले आहेत. यात सर्व झाकण्यापर्यंतही मजल जाऊ शकते, पण त्यावेळी चमकणाऱ्या डोळ्यांनाच महत्त्व येते. बहुतांश संस्कृत्यांत मुखप्रदर्शन केलेले चालते. ते आकर्षक करण्यासाठी चेहऱ्याची निगा राखली जाते व विविध सौंदर्यप्रसाधने वापरली जातात. असे लेप थापून कृत्रिम सौंदर्य निर्माण करता येते. नाटकसिनेमात हेच केलेले असते. याला भुलून, नट्या सुंदर असाव्यात असे सामान्यजनांना वाटू लागते. परंतु मेकअपशिवाय अशी स्त्री समोर आली तर कदाचित ओळखू येणार नाही!

सर्व स्त्रियांना आकर्षक दिसण्याची हौस असते. त्यासाठी त्या कांतिवर्धक लेप, औषधे, आहार, व्यायाम यांचा अवलंब करतात. यामुळे कांतीला तजेला यावा असा त्यांचा हेतू असतो. पण हे सर्व करण्यापेक्षा लेपाचा मुखवटा घालणे सोपे नव्हे काय ? सभ्य स्त्रिया असे करताना दिसत नाहीत. त्यांनी मुखरंजन केलेच तर ते न समजण्याइतके सूक्ष्म असते. फेस पावडर लावून घाम टिपला जातो व तेलकटपणा लपतो, पण सावळ्या स्त्रीने गोरे दिसण्यासाठी पुष्कळ पावडर थापली तर तिला 'खारादाणा' म्हणून चिडवले जाते. अभिजन नैसर्गिक सौंदर्याला श्रेष्ठ मानतात व कृत्रिम दिखाऊपणाला असंस्कृत समजतात, म्हणून तर '...वेश्या च मुखमण्डने' असे म्हटलेले आहे. येथे आपण दृश्य सौंदर्याशी येऊन पोचलो आहोत तेव्हा त्याचे थोडे विश्लेषण करू.

**नैसर्गिक सौंदर्य :** सौंदर्य हे विविध प्रकारचे असते. उदा. साहित्य, काव्य, संगीत, नृत्य यांतील सौंदर्य. कुठलीही कला हा सौंदर्याविष्कार असतो. या सर्व कला संस्कृतीच्या निर्देशक समजल्या जातात. म्हणून संस्कृती व सौंदर्य यांचे जवळचे नाते आहे, जसे शिव व सुंदराचे आहे. अभिजन सुसंस्कृत व सौंदर्योपासक असतात. कलेतील सौंदर्य कलेतील संकेत व परिभाषा समजल्यानंतर अभ्यासाने अनुभवता येते. त्यामुळे ते अभिजनांपुरते मर्यादित राहते. शिवाय ते संकेताधारित असल्यामुळे, ज्यांना ते भावत नाही त्यांना ते क्लिष्ट किंवा कृत्रिम वाटते. भाषेचे असेच आहे. ती दीर्घाभ्यास व उपयोगाशिवाय आत्मसात होत नाही, व सामान्यजनांना, यात एवढे अभ्यासण्यासारखे वा आस्वादण्यासारखे काय आहे असे वाटत राहते.

यातून मार्ग काढायचा तर सर्वांना समजेल असा काहीतरी सौंदर्याविष्कार शोधला पाहिजे. सुदैवाने, 'तुझे आहे तुजपाशी' या न्यायाने असा आविष्कार मानवी देहातच प्रत्येकाजवळ आहे. चित्रकाराला भौमितिक आकृत्या, नक्षा, यंत्राचे मानचित्र इ. काढणे सोपे वाटते. सामान्यजनही सरावाने हे सर्व करू शकतात. परंतु माणसांच्या आकृत्या काढणे मात्र सोपे नसते व ते थोड्या चित्रकारांनाच जमते. अर्थात मानवी आकृती स्वतःला रेखाटता आली नाही तरी तिच्यातले सौंदर्य मात्र सर्वांना समजते. ज्याला सुरूप आणि कुरूप व्यक्तींतला भेद कळत नाही तो विरळाच.

मानवी देह तरी सुंदर कोणता म्हणावा? यातही सांस्कृतिक संकेतांमुळे मतभेद होतात. उदा. एका आफ्रिकन जमातीत, स्त्री जेवढी लठ्ठ तेवढी सुंदर समजली जाते. त्यांच्याकडील सौंदर्यस्पर्धा म्हणजे वस्तुनिष्ठतेचा आदर्श ठरणे शक्य आहे. वजनाचा काटाच अचूक निर्णय देऊ शकेल ! याउलट, युरोपात मात्र कृश स्त्री सुंदर समजली जाते. एका युरोपीय सौंदर्यतज्ज्ञाने भारतीय तरुणीला, 'तू आणखी दहा किलो हलकी व सहा इंच उंच झालीस तर स्पर्धेत भाग घेऊ शकशील' असे सुनावले होते. सुदैवाने

याबाबतही उत्तर निसर्गानेच देऊन ठेवले आहे.

**बालसौंदर्य :** सर्वांत मानवी देह सुंदर व त्यातही बालदेह सर्वांत सुंदर. प्रत्येक आईला व बहुदा वडलांना, आपलेच मूल सुंदर आहे असे वाटते. राजा आणि नापिताच्या गोष्टीत राजा न्हाव्याला नगरातले सर्वांत सुंदर मूल शोधून आणण्यास सांगतो. तो घरी जाऊन पत्नीशी चर्चा करतो तेव्हा ती म्हणते, 'अहो त्यात काय, आपलाच बाळ नाही का ? त्यालाच घेऊन जा. तो ते काळेबेंद्रे मूल दरबारात घेऊन जातो तेव्हा राजा चकित होतो, पण असे होणार म्हणून बिरबलाने त्याला आधीच सांगितलेले असते ! 'आपला तो बाब्या व दुसऱ्याचे ते कारटे' यातही असाच आशय आहे.

**सूक्ष्माकार :** यातील स्वबालकप्रेमाचा भाग सोडला तरी खरे म्हणजे सर्वच मुले सुंदर असतात. कुरूप प्रौढ व्यक्ती पुष्कळ; पण कुरूप बालक विरळेच. या विरोधाभासाचे एक कारण म्हणजे कुठलीही आकृती नेहमीपेक्षा आकाराने लहान केली की ती सुंदर दिसते. यामुळेच मुंग्या सुंदर दिसतात पण मुंगळे कुरूप वाटतात. चिमण्या सुंदर दिसतात पण कावळे कुरूप वाटतात. खरे म्हणजे कुठल्याही प्राण्याची पिले सुंदर दिसतात. कुत्र्यामांजरांची पिले तर लोक पाळतातच. वासरे गोजिरवाणी दिसतात. गाढव, हत्ती इतकेच काय डुक्कर व गेंडा यांच पिले सुद्धा सुरेख दिसतात. कोंबडीच्या मागे फरपटत येणारे तिच्या पिलांचे लटांबर पाहिले की मन प्रसन्न होते.

**मानवी बालक :** पण या सर्वांवर कडी करते ते मानवी बालक. त्याच्याइतके सुंदर जगात काहीच नाही. जी. ए. कुलकर्णींनी बाळाच्या केसांचे वर्णन करताना 'जावळमऊ' असा शब्द वापरला आहे त्याला तोड नाही. पण हा विचार परंपरेतच आहे. कृष्णाच्या बाललीला किंबहुना त्याचे केवळ दर्शनही सुंदर आहे. खरे पाहता कृष्ण हा काळा, तो सुंदर कसा असेल ? पण त्याच्यातच सौंदर्याचा साक्षात्कार संतभक्तांना व कवींना झाला आहे.

बालक हे सर्वसुंदर म्हणजे सर्वांत सुंदर तर असतेच. पण ते सर्वांगसुंदर पण असते. कृष्णाचे वर्णन करताना कवीने,

अधरो मधुरो ... मधुराधिपतेः अखिलम् मधुरम् ।

म्हणजे, 'कृष्ण हा मधुराचा अधिपतीच असून त्याचे सर्वच सुंदर आहे' असे म्हटले आहे.

हा अनुभव येण्यासाठी कवी होण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाला स्वतःच्या घरातील बालकाच्या बाबतीत हे अनुभवता येते. खरे पाहता बालक ही प्रौढ मानवाची प्रतिकृती नसते. त्याचे डोके धडापेक्षा प्रमाणाबाहेर मोठे असते. शरीर सुघटित नसून आकारहीन असते. पण तरीही, किंबहुना म्हणूनच, ते सुंदर दिसते. प्रौढाचे पूर्ण शरीर सुंदर नसते, शिवाय ते कामोत्तेजक असते. त्यामुळे प्रौढाने शरीरप्रदर्शन करणे असभ्य ठरते, पण बालकाचे तसे नाही. तुटपुंज्या वस्त्रानिशी बालक निःसंकोच वावरू शकते. प्रौढ व्यक्ती इतरांसमोर विशिष्ट अवस्थेतच येते. उदा. आडवी होत नाही. नाटकात निद्रा दाखवू नये हा संकेत यातूनच आला आहे. पण बालक निद्रावस्थेतही सुंदर दिसते. 'निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टि सारखी धरी' यात हे व्यक्त झाले आहे. जागृतावस्थेत तर बालक सौंदर्य विविधरूपांनी दाखवते. बालक कोणत्याही अवस्थेत कोणत्याही दिशेने पाहिले तरी सुंदर दिसते. ते कोणतेही कौशल्य न वापरता सुंदर दिसते. त्याच्या शरीराला किंवा चेहऱ्याला कुठलेही सौंदर्यप्रसाधन करावे लागत नाही. किंबहुना दृष्ट लागू नये म्हणून काळ्या तिटीचा किंवा काजळाचा लाक्षणिक कलंकच लावावा लागतो ,व त्याची कांती तर सौंदर्यवती स्त्रियांना हेवा वाटेल अशी असते. चेहरा व शरीर या दोन्हीच्या सौंदर्याचा आदर्श मानवी सौंदर्योपासकांना जणू लाजविण्यासाठीच निसर्गाने निर्माण करून ठेवला आहे. सामाजिक संकेत, रूढी, भाषा यांच्या पलीकडले हे सौंदर्य आहे. प्रौढ शरीराच्या दृष्टिगत सौंदर्याचे विश्लेषण करण्यासाठी याचा उपयोग होईल. हे रूप केवळ सुंदरच आहे असे नाही तर ते गोंधळाविरूद्ध सुरचनेचे, प्रलयाविरूद्ध नवनिर्मितीचे, विकृतीविरूद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. सर्वत्र प्रलय झाला असता ,'त्यात हस्तकमलाने पदकमल मुखकमलात घालून वडाच्या पानाच्या पुडात निजलेल्या बालमुकुन्दाचे मी स्मरण करतो.'

करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ॥

या कथेत हेच प्रसिद्ध रूपक आहे.

बालक हे या जडसृष्टीत मानववंश टिकण्याचे, संततीचे साधन आहे , व तेच सौंदर्याचे, संस्कृतीचे ही आदर्श रूप आहे. प्रौढांच्या आचरणाकडे पाहिल्यावर ईश्वर आहे की नाही अशी शंका येऊ लागते, पण बालकाचे निरीक्षण केल्यावर ईश्वर अस्तित्वात असलाच पाहिजे असे वाटू लागते.

स्त्रीमुखसौंदर्य : बालकाप्रमाणे स्त्रीने मुखप्रदर्शन केले तरी चालते. पण त्यातही मुखलेप वापरल्यास कृत्रिम वाटते. बालकाचे केस विखुरलेले असले तरी चालतात. पण सभ्य स्त्रीने सर्वांसमोर केस मोकळे सोडणे अपेक्षित नसते. त्याऐवजी काही ना काही रचना करून केसांना बांधून ठेवावे लागते. बालकाचे हसणे किंवा चेहरा वेडावाकडा करणे रंजक असले तरी , स्त्रीने दात वेंगाडून हसणे किंवा चेहऱ्यावर कृत्रिमभाव आणणे असभ्यपणाचे समजले जाते. बालकाच्या रूपाचा व भावदर्शनाचा स्त्रियांनी अवश्य हेवा करावा. पण त्याची पूर्ण नक्कल करण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना नाही.

यात हताश होण्यासारखे काही नाही. जातीच्या (म्हणजे जन्मजात) सुंदरांना काहीही चांगले दिसते असे म्हणतात, ते खरे आहे. स्त्री व बालक यांच्या चेहऱ्यात साम्य असते. पुरुषांमध्ये प्रौढवयात बालरूप नष्ट होते, पण स्त्रिया बालसदृश दिसतात. त्या बालसदृश असतात, व वागतातही. स्त्रीहट्ट आणि बालहट्ट यांची तुलना त्यामुळेच केली जाते. स्त्रीमुखसौंदर्य हे जर खरोखर बालकाप्रमाणे असेल तर त्याला कुठल्याही प्रसाधनांची आवश्यकता लागत नाही. वयात येताना मुलगे काळवंडतात व मुली उजळतात. ही सर्व निसर्गाची किमया आहे.

षोडशवर्षदेशीया - गर्दभीऽपि अप्सरा।

म्हणजे सोळा वर्षांची गाढवीसुद्धा सुंदर दिसते. यामुळेच कॉलेजकन्यका प्रसाधन किंवा भपक्याशिवायही आकर्षक भासतात त्या या बालसदृश नैसर्गिक सौंदर्यामुळे.

निसर्गाने सौंदर्य सर्वांनाच बहाल केले आहे. त्यातला आनंद लुटण्याऐवजी मुखमंडन करून आकर्षक दिसण्याची निष्कारण धडपड चालते. याला भोगवादी आर्थिक प्रणाली जाहिरातींच्या माध्यमातून खतपाणी घालते. परंतु असे लेपयुक्त सौंदर्य टिकत नाही. काही काळ आकर्षक वाटले तरी, अशा मढवलेल्या, केसांचा पिसारा उभारलेल्या, दात वेंगाडलेल्या रूपाचा कंटाळा येतो. अभिनेत्रींच्या बाबतीत असे झाले तर ,कृत्रिमतेवर आधारलेली लोकप्रियता ओसरायला वेळ लागत नाही.

देहसौंदर्य : मुखाच्या बाबतीत विशिष्ट मर्यादा पाळून स्त्रीला मुखप्रदर्शन करता येते. पण देहाच्या बाबतीत पुष्कळच बंधने पाळावी लागतात. बालक लघुवस्त्र किंवा वस्त्रहीन अवस्थेत वावरले तरी त्यात काही वाटत नाही. पण स्त्रीने मुख व हात, पाय सोडून सर्व शरीर झाकावे लागते. तमाशा असंस्कृत असल्याचे पौरजन मानतात. त्यातली भाषा कदाचित रांगडी असेल, पण कलावतीने देह पारंपरिक पोशाखात पूर्णपणे झाकलेला असतो.

शरीरसौष्ठवप्रदर्शन तर करायचे, पण देह झाकायचा हा विरोधाभास कसा सोडवायचा ? त्यासाठी वस्त्राचाच आधार घेतला जातो. वस्त्र अंगालगत असेल तर आकाराचा दृक्प्रत्यय येतो. आपल्याकडील नऊवारी साडीत हे उत्तम साधले जाते. त्यामुळे राजकन्यादेखील सभ्यपणाला बाध न आणता सौंदर्यप्रदर्शनकरू शकते. राजा रविवर्म्याने याचा उत्तम वापर करून सुंदर स्त्रियांची अविस्मरणीय चित्रे काढली. तमाशातील कलावतीदेखील नऊवारी साडीतूनच आपले सौष्ठव प्रकट करते. नऊवारीची 'मी बाई पाचवारी' झाल्यावर सुलभता आली पण सौंदर्यहासही झाला; कारण पातळ नुसते गुंडाळले तरी चालते, पण लुगडे नीट नेसावे लागते.

वस्त्रांमधून स्थिरदेहाचे प्रदर्शन होते. हालचालींमधून चल सौंदर्य व्यक्त करता येते. बालकाचे धावणे किंवा बागडणे हे रंजक असते. पण स्त्रीने असे केले तर तो बालिशपणा ठरेल. प्रौढांसाठी भावप्रदर्शनाचे सांकेतिक मार्ग त्यासाठी शोधले आहेत. चेहऱ्यावरील भाव मुद्रांच्या योगे दाखविले जातात. शरीराच्या हालचाली, मान हलविणे, चालणे, हातवारे, बसणे इ. सुद्धा आकारबद्ध करून त्यातले सौंदर्य वाढविले जाते. हे सर्व कष्टसाध्य असते. त्यासाठी वर्षानुवर्षे शिस्त पाळून अभ्यास व सराव करावा लागतो, तेव्हा कुठे एखादी नृत्यशैली आत्मसात करता येते. शिवाय यात अभिनय येतो व संगीताचीही जाण येते. नृत्य ही स्त्रीसौंदर्यविकासाची उच्च पातळी आहे. पौराणिक अप्सरा नुसत्याच सुंदर नसत, त्या नृत्यांगना असत. जुन्या हिंदी चित्रपटातल्या टिकाऊ व हरहुन्नरी नायिका पाहिल्या तरी

असेच दिसते. वैजयंतीमाला, पद्मिनी पासून रेखा, हेमामालिनी, जयाप्रदा, मीनाक्षी, श्रीदेवी ही त्याची उदाहरणे. या केवळ आकर्षक नव्हत्या तर अभिनयनिपुणही होत्या. देहप्रदर्शन न करता नृत्य व अभिनय यांच्या जोरावर त्या प्रेक्षकांना जिंकू शकल्या, ते त्यांच्या नृत्यनैपुण्यामुळे. आपल्याकडे भरतनाट्यम् , ओडिसी व उत्तर भारतात मोगलांच्या संपर्कात आलेली कथ्थक अशा अनेक शैली आहेत. या सर्व काही मूलभूत सिद्धांत व संकेतांवर आधारलेल्या आहेत. त्या सर्वांचे आपल्या संस्कृतीशी नाते आहे. पण यापैकी कुठल्याही शैलीत, अगदी अशिष्ट समजल्या गेलेल्या तमाशातही, देहप्रदर्शन केले जात नाही.

इतके असूनही संगीताला व दृश्यकलांना म्हणजे नाटक व नृत्य यांना आपल्याकडे प्रतिष्ठा नव्हती. क्वचिद्गानवती सती । म्हणजे गाणारीण साध्वी असणे दुर्मिळ, अशा तऱ्हेच्या वचनांतून त्याचा प्रत्यय येतो. या कलाकारांचे खाजगी आयुष्य सामान्य पापभीरू माणसासारखे सरळ नसणे शक्य आहे. परंतु व्यक्तिगत आचार व सार्वजनिक प्रदर्शन यांतली मर्यादा राखली जात होती. लोकांसमोर (सभेत) जे येई ते सभ्यच असे. व्यक्तिगत स्वैराचार असला तरी आविष्कारात स्वैराचाराला मुभा नव्हती. व्यक्तिगत आचारात सामान्य नीतिनियम कदाचित पाळले जात नसतील. पण हे संबंधित व्यक्ती निभावून नेत असत. गंधर्वविवाह (आजकालचे प्रेमविवाह) जे व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार होते व दासीपुत्र हे शेवटी सामावून घेतले जात होते,पण ते अपवाद म्हणून. लोकांसमोर प्रेमप्रदर्शन करण्यास मात्र परवानगी नव्हती, म्हणजे आविष्कारस्वातंत्र्य नव्हते. यामुळे नृत्याचे वेश व शरीरप्रदर्शनाच्या मर्यादा पाळल्या जात. नाटकात तर दृश्याबरोबरच नाट्यसंहिताही सभ्य असावी लागे . म्हणजे भाषिक अभिव्यक्तीवरही मर्यादा होत्या. दर्शन व लेखन या दोन्हींमध्ये समाजाशी संबंध येत असल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य नव्हते. हा व्यवसायनीतीचाच भाग होता. व्यवसायनीतीत व्यावसायिकांनी एकमेकांशी कसे वागावे हे तर असतेच, तसे तर चोरही एकमेकांशी सचोटीने वागत असतील; पण त्याहीपेक्षा व्यावसायिकांनी समाजाशी कसे जुळवून घ्यावे हे ठरविलेले असे.

सद्य परिस्थिती : दृष्टिगत सौंदर्य व दृश्यकलांचा आढावा घेतल्यावर आता आजचे चित्र पाहू. व्यक्तिस्वातंत्र्यातून उद्भवणारा स्वैराचार, कुटुंबभंजन इत्यादींची परिणती समाजभंजनात होऊ शकते. केवळ व्यक्तिगत स्वैराचार हा विशिष्ट व्यक्ती, कुटुंबे किंवा समाजघटक यांच्यापुरताच मर्यादित असेल तर त्याची वाढ मर्यादित राहते. आता या स्वैराचाराची कर्करोगसदृश प्रक्रिया पाहू.

1) अनिर्बंध वाढ : स्वैराचाऱ्यांची संख्या प्रजननाने वाढते असे नाही. ती प्रचार व प्रसार यांनी वाढते. पूर्वी असे लोक एकेकटे राहत व आपला उपद्रव इतर कुणाला होणार नाही याची काळजी घेत. इतरांचे परिवर्तन करून आपली संख्या वाढविण्याच्या फंदात ते पडत नसत. परंतु आता तसे नाही. आता अशा स्वैराचाऱ्यांना कपाटात कोंडून रहावेसे वाटत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच संघटनास्वातंत्र्य असल्यामुळे ते एकत्र होतात. त्यांची मित्रमंडळे, परिचयसभा, उद्यानमीलने इ. होतात. यातून दिलासा तर मिळतोच, शिवाय धीटपणा येतो. यांना आपल्या हक्कांची जाणीव होते. पूर्वी 'भारत सेवक समाज'अशा संस्था स्थापिल्या जात. सध्या हक्कवादी संघटनांचे पेव फुटले आहे. मग ते विस्थापितांचे हक्क असोत की स्त्रियांचे, इतकेच काय, अतिरेक्यांनाही मानवी हक्क असतात. चोरी करणे, कॉपी करणे, कुणाच्या शयनगृहात डोकावणे, चारित्र्यहनन करणे हे देखील हळूहळू हक्क ठरू लागतील. अशा व्यक्तिस्वातंत्र्यवीरांचे संघटन होणे ही समाजाला घातक ठरणारी गोष्ट आहे. आविष्कारस्वातंत्र्याचेही असेच आहे. यात कोणी सामाजिक संकेतांची पायमल्ली केली किंवा दैवतांचा अपमान किंवा नामनिर्देश करून वस्त्रहरण केले तरी तक्रार करण्याची सोय नाही. या आविष्कारस्वातंत्र्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक पुरोगामी संघटना एका पायावर तयार असतात.त्यामुळे स्वैराचार व स्वैराविष्कार याला संघटित पाठिंबा मिळणार नाही याकडे लक्ष देणे निकडीचे झाले आहे.

2) अकार्यक्षमता : स्वैराचारी, समाजघटक म्हणून आपली कर्तव्ये करण्यात कमी पडतात. धूम्रपान करणारा कररूपाने जे योगदान देतो. त्याच्या कितीतरीपट घस समाजाला सोसावी लागते. सिगारेट कंपन्यांच्या नियोजित नुकसानभरपाईवरून हे प्रकर्षाने दिसते. सर्व व्यसनांचे व स्वैराचाराचे असेच आहे. मद्यपान असो की अलीकडचे

उत्तेजकपान (Drugs) त्याने व्यक्तिगत कार्यक्षमता व आरोग्य व आयुर्मान यांचा ह्रास होतो.

3) निकटवर्तीयांना उपद्रव : व्यसनामुळे कुटुंबाला तर त्रास होतोच. शिवाय नातेवाईक, शेजारीपाजारी, स्नेही, सहविद्यार्थी, सहसेवक यांच्यावरही ताण पडतो. प्रत्यक्ष त्रासाबरोबरच अप्रत्यक्ष त्रासही होतो. एक भाऊ मद्यपी झाला व ते चालवून घेतले गेले की, आपण सरळमार्गी असूनही झुकते माप मात्र या दारुड्याला मिळते, असे न पिणाऱ्या भावाला वाटू लागते. सारख्याच दिसणाऱ्या दोघींपैकी एकीने नट्टापट्टा व हावभाव करून लक्ष वेधून घेण्यास सुरवात केली की, दुसरीला आपण काकूबाईसारख्या राहतो हे चुकत तर नाही ना, असे वाटू लागते. एखाद्या लेखकाने सनसनाटी ,अश्लील लिहिले व त्याचे समर्थन हक्कवाद्यांनी केले की, इतर मर्यादशील लेखकांना सुप्त हेवा वाटू लागतो. मुलांसमोर प्रौढांच्या गोष्टी बोलू नयेत, मद्यपान करू नये किंवा प्रणयालाप करू नयेत, कारण त्यांच्या मनावर परिणाम होतो. स्वैराचार उघडपणे होऊ लागला की सरळमार्गी लोकांचा बुद्धिभेद होण्याची, निदान त्यांचा संभ्रम वाढण्याची शक्यता असते.

4) प्रवास : पूर्वी जवळपासच्या लोकांनाच स्वैराचाराचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष उपद्रव होई, पण तो दूर पसरत नसे. जंगलाला आग वीज पडल्यामुळे लागू शकते, पण एखाददुसरे झाड जळून गेल्यावर ती थांबते. परंतु वारा सुटला तर मात्र ही आग पसरते. प्रसारमाध्यमांचे तसेच आहे. ती वाऱ्याप्रमाणेच, सुगंध पसरवू शकतात, जलद मेघांना पोचवू शकतात, त्याचप्रमाणे आग भडकवू शकतात. वीज हे मूलनिमित्त असले तरी वाऱ्याने मोठा घात होतो. त्याचप्रमाणे व्यक्तिगत स्वैराचार एक वेळ परवडतो पण त्याचे आविष्करण व समर्थन होऊ लागले की धोका वाढतो.

प्रसार : आजकालची प्रसारमाध्यमे नेमके हेच करीत आहेत. त्यांचा उपयोग ज्ञानप्रसार, समाजप्रबोधन यांसाठी व्हावयास हवा, पण त्याऐवजी हिंसा, अनाचार, भ्रष्टाचार, भोगवाद यांविषयीची माहिती पोचविण्याचे कार्य ती प्रकर्षाने करीत आहेत. पूर्वी तमाशास जाणे देखील निंद्य समजले जाई. तमासगिरिणीला घरी आणणे तर अजिबात चालत नसे. त्यामुळे तमाशा आपल्या जागी राही. चित्रपटामुळे स्थलकालाची बंधने कमी झाली तरी, निदान चित्रपटगृहात जाण्याचे कष्ट घ्यावे लागत. त्यानंतर व्हिडिओ व टीव्ही आले. आता तर कळसूत्री बाहुलीप्रमाणे ,रिमोटची कळ दाबून हवी ती तमासगिरीण घरीच डोळ्यासमोर उभी राहण्याची सोय झाली आहे. परकीयांचा स्वैराचारही विविध कार्यक्रमांतून उपग्रहवाहिन्यांतून आपल्यापर्यंत पोचला आहे.

5) दूरवसाहत : या पाहुण्यांनी इथे घरोबा करायलाही सुरुवात केली आहे.त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी इथले लेखक व कलाकारही उत्सुक आहेत. परकीय वाहिन्यांची स्थानिक प्रतिबिंबेही दिसू लागली आहेत. आर्थिक उदारीकरणाबरोबरच सामाजिक मुक्ताचार येत आहे. या उपग्रहीय माध्यमांचा मुख्य धोका आर्थिक नसून सांस्कृतिक आहे.

6) समाजह्रास : आर्थिक, राजकीय व सामाजिक या तिन्ही क्षेत्रांतील कर्करोगसदृश प्रक्रिया आपण पाहिल्या. पूर्वी कायद्याच्या बाह्य बंधनांपेक्षा नीतीची आंतरिक बंधने महत्वाची होती, त्यामुळे समाजधारणा होत होती. आता स्वातंत्र्ययुग आल्यामुळे कायदेशीर पण नीतिहीन भोगवादाचे प्राबल्य आहे. सध्या ऋण काढून सण करण्याचा उदारपणा दाखवला जात आहे. त्यामुळे हे उदारीकरणाऐवजी 'उधारीकरण' ठरण्याची शक्यता आहे. रोखे, हवाला व ठेवी कंपन्यांचे प्रचंड घोटाळे होणे व ते न सुटणे, ही त्याची परिणती आहे. राजकीय क्षेत्रात व्यक्तिगत व गटीय स्वार्थामुळे भ्रष्टाचार वाढत आहे. निवडून येणाऱ्यावर कुठलीच नैतिक बंधने नसावीत असे भासत आहे. पण या दोन क्षेत्रांतले घोटाळे काही लोकांपुरते मर्यादित असतात. सामाजिक स्वैराचाराचे, हिंसेचे समर्थन मात्र सर्व समाजावर व संस्कृतीवर परिणाम करू शकेल. आर्थिक भोगवाद, राजकीय भ्रष्टाचार व सामाजिक स्वैराचार ही सर्व एकाच प्रक्रियेची विविध रूपे आहेत.

आतापर्यंत संघटनात्मक कर्करोगप्रक्रिया पाहिली. संघटन हे विचारांतून घडते. अशा विचारप्रणाली सामान्य माणसापासून बुद्धिवाद्यांपर्यंत विविध पातळ्यांवर कार्यरत असतात. त्यांचा विचार पुढील १२ व्या लेखांकात करू.

• • •

*With Best Compliments From*

***MAHENDRA PRATAP SINGH (KSHATRIYA BHUSHAN), MANAGING DIRECTOR***

*Hon. Treasurer :*

**Security Association of India &**

**Association of Exempted Security Guards Agencies**

(Maharashtra)

*Member :*

**World Association of Detective Inc.**

*Chairman :*

**Kuber Credit Co-op Society Ltd., Mulund(E) &**

**Mulund Shri Ram Co-op Society, Mulund(E) &**

**Dnyaneshwar Darshan, Mulund(E)**

*Vice president :* **Akhil Bhartiya Kshatriya Mahasabha (Maharashtra)**

1. **M/s. ISPAC (INDIA) PVT. LTD.,** (Mostly services at Factories/Commercial Establishments in Greater Bombay & Thane Dist.)

2. **M/s. BEST SECURITY & PERSONNEL SERVICES (INDIA) PVT. LTD.**
(Services at Factories & Commercial Establishment outside Greater Bombay & Thane Dist.)

3 **M/s. BUILDING SECURITY SERVICES**
at Residential Societies & open Plots etc. Greater Bombay & Thane Dist. Only)

Provides security, detection, intelligence services, Body Guards and Gunmen etc. to various factories, Establishments, Offices, Residential Buildings/Bungalows, Open Plots, Religious places in Greater Bombay & Thane Dist. and other parts of our country, since January 1974.

Also advises on Industrial Relations and Personnel Management.

**CONTACT ADDRESS & TELEPHONE**

**HEAD OFFICE**

4 & 5 Dnyaneshwar Darshan
Adjacent to BMC Hospital
Mahatma Phule Road, Mulund (East)
Mumbai 400 081.
Phone : 5605149/5615749/5640685

**BRANCH OFFICE**

Flat No. 102/103 Everest Apt.
Samarwani, Silvasa Masat Road,
Silvasa 390230
U.T.
Phone : 02636-40990

# वेदकालीन राज्यपद्धती

श्री. शं. बा. मठ

*सामान्य माहिती :-*

पूर्वीचे आर्य म्हणजेच आजच्या हिंदुसमाजाने आतापावेतो विविध पद्धतीची राज्ये व राज्य पद्धती यांचे प्रयोग करून पाहिले आहेत. त्यावरून काही ठळक वैशिष्ट्ये लक्षात येतात - १) वैदिक कालीन सर्वसत्ताधीश समिती २) वैदिक कालीन न्याय संस्था ३) गणतंत्र राज्यपद्धती खिस्तपूर्व १००० ते खिस्तोत्तर ६००) ४) पौर व जानपद संस्था (रामायणकाळ) ५) अभिषिक्त राजे व त्यांचे मंत्रिमंडळ ६) तत्कालीन कर आकारणी पद्धती ७) तत्कालीन साम्राज्यपद्धती ८) हिंदू राज्यपद्धतीला लागलेली उतरती कळा.

हा विषय खूप व्यापक असला तरी संकलितपणे त्याची मांडणी अशक्य मात्र नाही. कारण याविषयीचे अफाट साहित्य वेदवाङ्मय, संस्कृत वाङ्मय, प्राकृत वाङ्मय (बुद्धकालीन) यांतून प्राप्त होऊ शकते. आश्वलायन गृह्यसूत्र, शतपथब्राह्मण, तैत्तिरीय व ऐतेरेय ब्राह्मण आदि ग्रंथांतून विपुल माहिती उपलब्ध होऊ शकते. तसेच शिलालेख, नाणी , उत्खननाचे पुरावे यांचाही उपयोग होऊ शकतो. कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ आज उपलब्ध आहे (खिस्तपूर्व ३००) हा ग्रंथ कौटिल्यांनी पूर्वसूरींच्या माहितीवर आधारित लिहिला आहे. कौटिल्यापूर्वी सुद्धा राज्यशास्त्राचा अभ्यास अव्याहत चालू होता असेच म्हणावे लागते. कल्पसूत्रे ग्रथित केली जात होती तेव्हापासून हा विषय प्रतिष्ठित झालेला होता. त्यात असा उल्लेख आढळतो '' राजा पुरोहित धर्मार्थ कुशलम्'' याची व्याख्या करताना टीकाकार हरदत्त असे म्हणतो - धर्मशास्त्रेषु अर्थशास्त्रेषु च पुरोहित कुशलम् । पुरोहित हा धार्मिक व राज्यशास्त्राच्या गोष्टीतही निष्णात असे. शिवाय महाभारतातील शांतिपर्वात हिंदुराज्यशास्त्राची माहिती ओतप्रोत आहे.

पूर्वकाली राज्यशास्त्रपद्धति, राज्यकारभार अगर संस्था यांना 'दण्डनीति' असे नांव होते. अर्थशास्त्र म्हणजे मानवी संख्याबल. अगर संख्याबलयुक्तभूमी असा अर्थ कौटिल्य आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात करतो. अर्थ म्हणजे सामाजिक संपत्ती, तिचा विनियोग करण्यासाठी योजलेले नियम अथवा उपाय होय. म्हणजेच भूमिसंपादन व तिच्या सीमा वाढविणे इत्यादी अभिप्रेत असते.

मनुष्याणां वृत्तिः अर्थः मनुष्यवत् भूमिः इत्यर्थः।

तस्याः पृथिव्याः लाभपालन उपायः शास्त्रं अर्थशास्त्रं इति।

दण्डनीति याचा अर्थही वरीलसारखाच असलेला आढळतो.

दण्डनीतिः अलब्ध लाभार्थी, लब्धपरिरक्षणे,
रक्षितविवर्धने च ।

प्राप्त झालेले नाही त्याची प्राप्ती, प्राप्त झालेल्याचे रक्षण, रक्षिलेल्याचा विस्तार याला 'दण्डनीति' म्हणतात. दण्डनीति हा शब्द उषनास(शुक्र) यांनी स्वीकारला तर अर्थशास्त्र हा शब्द बृहस्पतींनी पुरस्कारला. राज्यशास्त्राचा अर्थ राजे लोकांसाठी केलेले नियम व राजधर्म म्हणजे राजाची कर्तव्ये. नीति म्हणजे राज्यपद्धती अगर राज्यशास्त्राची तत्त्वे. नय याचा अर्थ राज्य शास्त्राची प्रमुख तत्त्वे. कालांतराने, अर्थ, दण्ड आदी शब्द मागे पडले आणि नीति, नय हे शब्द प्रचलित झाले. कामंदक आपल्या निबंधाला 'नीतिसार' म्हणतो. 'उषनास दण्डनीति' या ग्रंथाचे नाव 'शुक्रनीतिसार' असे झाले. इतकेच काय गोष्टिरुपाने लिहिलेले 'पञ्चतन्त्र' हे नयसार म्हणून मानले जाते. मुसलमानी अमलात देखील राज्यशास्त्रावरील निबंध लिहिले गेल्याचे उल्लेख आढळतात. चंद्रेश्वर - राजनीति रत्नाकर, मित्रमिश्र-वीरमित्रोदय आणि नीलकंठ - राजनीति आदी निबंध यांनी लिहिले आहेत. राजनीतिमयुख हा त्यापुढील काळातील निबंध होय. निबंध वा पुराणग्रंथ ही संग्रहीत स्वरूपाची असल्याने त्यांत मूलभूत असे काही आढळत नाही. मध्ययुगीन काळातील काही रचना उपलब्ध आहेत त्यापैकी अर्थशास्त्रावर आधारित 'बृहस्पति सूत्रे' हा ग्रंथ लिहिला गेला, तसेच सोमदेवाचा 'नीतिवाक्यामृत ' हा ग्रंथ देखील त्याच कालातील असून सूत्रबद्ध आहे. तीनशे वर्षांपूर्वी समर्थ रामदासांनी 'दासबोध'

या ग्रंथातून राजधर्माचा विचार केलेला आहे. छत्रपति राजाराम महाराज यांनी 'आज्ञापत्रे' हा राज्यशासनग्रंथ आपल्या अमात्याकडून लिहून घेतला. हिंदी भाषेतून गुरु गोविंदसिंहांनी लिहिलेला राजग्रंथ उपलब्ध आहे.

**हिंदुराजपद्धती ऐहिक होती -**

'औशनस दण्डनीति' हा ग्रंथ आज उपलब्ध नाही. मात्र एक श्लोक उपलब्ध आहे. त्या श्लोकात शुक्र राज्याला वंदन करताना म्हणतो.

नमोस्तु राज्यवृक्षाय षाड्गुण्याय प्रशासिने ।
सामादि चारु पुष्पाय त्रिवर्ग फलदायिने ।

राज्याला वृक्षाची उपमा देऊन तो म्हणतो - ह्या वृक्षाचे शासन सहा गुणांनी युक्त अशा राजनीतीने प्राप्त होते. हिंदुराजपद हे ऐहिक म्हणजे मानवी इहलोकाच्या कल्पनाचे होते. म्हणून तो म्हणतो - या वृक्षाला साम दाम दण्ड भेद अशी सुंदर फुले लागतात. या वृक्षाची सर्व फळे सर्व प्रजेला प्राप्त होतात. या इहवादी राज्यात राजाची निवड होत असे. तो अभिषिक्त होत असे. प्रजा, तपस्विसंस्था यांच्या संमतीने त्याला राज्यभार चालवावा लागे. सर्व प्रजाजनांचे हितवर्धन करणे, त्यांचे ऐहिक जीवन सुसह्य करणे, त्यांच्या आर्थिक संपन्नतेत कृषी व इतर उद्योग सुरु करून भर घालणे, त्याचबरोबर नैतिक मूल्यांचे जतन करणे ही राजाची अंतर्गत प्रमुख कर्तव्ये होतो. छांदोग्यात असा उल्लेख आहे. कैकय देशचा राजा अश्वपति मोठ्या अभिमानाने सांगतो,

न मे स्तेनो जनपदे न कदर्यः न मद्यपः ।
न नाहिताग्नि नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः ॥

माझ्या राज्यात चोर नाहीत, मद्यपी नाहीत, अडाणी नाहीत, अधर्मी नाहीत, स्वैर वर्तन करणारे पुरुष नाहीत, स्त्रियांचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**अराजकतेचा निषेध :-**

फार पुरातन काळापासून भारतीय लोकांनी अराजकतेचा निषेध केलेला आहे. इतकेच नव्हे तर अराजका पेक्षा वाईट राजा देखील श्रेष्ठ असे ते मानत, म्हणूनच वेन राजाला सिंहासनावर बसविले.

अराजकभयादेव कृतो राजा अतत् अर्हयः ।

कारण निर्नियंत्रित अवस्था समाजाला रसातळाला नेते. समाजधारणेसाठी, पोषणासाठी, विकसनासाठी, राज्यशासनाची नितांत आवश्यकता आहे. अशी भारतीयांची धारणा होती.

अराजके हि लोकेस्मिन् सर्वतो विद्रुते भयात् ।
रक्षार्थ अस्य सर्वस्य राजानं सृजत् प्रभुः ।
तस्यार्थे सर्वभूतानां गोप्तारं धर्ममात्मजम् ।
ब्रह्मतेजोमयं दण्डं असृजत् पूर्वमीश्वरं ।

मनु अराजकाच्या निर्नियंत्रित परिस्थितीत भयकंपित होऊन पळत असता सर्व प्रजेच्या रक्षणासाठी परमेश्वराने राजाला निर्माण केले. या राजासाठीच सर्व प्राणिमात्रांना संरक्षक असा ब्रह्मतेजोमय धर्मदण्डही स्वतःपासूनच निर्माण केला. चाणक्य राज्यसंस्थेबद्दल म्हणतो-

सुखस्य मूलं धर्मः ।
धर्मस्य मूलं अर्थः ।
अर्थस्य मूलं राज्यम् ।
दण्डनीतिम् अधितिष्ठन् प्रजाः संरक्षति ।

राजा अथवा राज्यसंस्था दण्डनीतीचे योग्य अवलंबन करून समाजसंरक्षणाचे आपले कार्य करीत असते. दण्ड याचा विचार करताना असे म्हटले आहे -

आन्वीक्षिकी त्रयी वर्णानां योगक्षेम साधनो दण्डः ।
तस्य नीतिः दण्डनीतिः ।

अध्यात्मविद्या, वेदत्रयी, व वार्ता (अर्थशास्त्र) यांचा योगक्षेम चालण्यासाठी जे साधन त्याला दण्ड म्हणावे. त्याचे जे नियम त्यांना दण्डनीति म्हणतात.

याप्रमाणे राज्यसंस्था ही प्राचीन कालापासून महत्त्वाची मानली गेली आहे. कारण समाजाचा सर्वांगीण विकास तिच्या आधाराने निर्धारित होतो. वेदकाली राज्यसंस्था सुव्यवस्थित होती. वेदवाङ्मयात याबद्दल अनेक उल्लेख आहेत. ऋग्वेदातच चाळीसावर राजांची नांवे आली आहेत. जनस्य गोपाः लोकांचे रक्षण करणारा. यावरून राज्यसंस्थेच्या कार्याची कल्पना स्पष्ट होते. पृथुराजाचे वर्णन 'सम्राट् पार्थिवानाम्' असे करण्यात आले आहे.

यावरून वैदिक ऋषींना साम्राज्यसंस्था परिचित होती. वैदिक काळी राज्यसंस्था एकतंत्री होती. महाभारत व कौटिलीय काळापासून गणराज्ये उदयास आली. वेदांत गणराज्याचा उल्लेख नाही. ऐतरे ब्राह्मणात कुरुक्षेत्रापासून प्रयागपर्यंतच्या गंगायमुना दुआबाच्या भूभागातील राज्यसंस्थेचे वर्णन करताना म्हटले आहे,

एतस्यां ध्रुवायां मध्यमायां प्रतिष्ठायां दिशि ये के च कुरु पांचालानां राजानः स वशोशीनराणां राज्याय एव ते अभिषिच्यन्ते। राजा इति अनेन अभिषिक्तानां आचक्षते। (८-१४)

अभिषिक्त राजालाच राजा ही पदवी प्राप्त होत असे.

राजा शब्दाची व्युत्पत्ती -

राजा हा शब्द मूलधातू राट् म्हणजे नियंता या पासून आहे. परंतु प्रजाहितदक्ष तो राजा हीच व्याख्या रूढ झाली. रंजनात् राजा (राजा प्रकृति रंजनात्) याचा परिणाम पुढील संपूर्ण संस्कृत वाङ्मयावर झालेला दिसतो. उत्तररामचरितात भवभूति म्हणतो -

स्नेहं दयां च कीर्तिंच यदि वा जानकीं अपि।
आराधनाय लोकाना मुंचतो नास्ति मे व्यथा।

प्रजेच्या हितासाठी प्रसंगी मी जानकीचाही त्याग करीन. कलिंगातील बुद्ध नरेश खारवेल म्हणतो - माझ्या राज्यात प्रजा सुखी असल्याने राजा ही पदवी मी सार्थ केली आहे. थोडक्यात राजाचे कर्तव्य प्रजेचे हित हेच मुख्यत्वाने अभिप्रेत आहे, हे प्रकर्षाने ध्यानात येते.

राजा ही संस्था कशी निर्माण झाली :-

यासंबंधी ऐतरेय ब्राह्मणात (१.१४) देवासुरयुद्ध कथेतून ही भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. देव व राक्षस यांच्यात फार पुरातन कालापासून नित्य झगडे होत. देव नेहमीच पराभूत होत. याचे कारण ते शोधू लागले. त्यांच्या ध्यानात आले की असुरांचा राजा आहे तो त्यांचे नेतृत्व करतो. त्यामुळे ते विजयी होतात. देवांनी आपला राजा निर्माण केला नव्हता. असाच प्रयोग आपण का करू नये म्हणून त्यांनी राजा निवडण्याचे ठरविले.

देवासुरा वा एषु लोकेषु समपतंतः। तान् ततो असुरा अयजन्त। देवा अब्रुवन् अराजतया वै सो जयंति राजानं करवामहि इति। तथेति।

राजा हा निवडला जावा हा सर्वप्रथमचा विचार या कथेवरून ध्यानात येतो. राज्यसंस्थेचे मूळ युद्धात अथवा जीवनाच्या संघर्षप्रवृत्तीत आहे. यासाठीच गुणाधिष्ठित माणसाची निवड होत असे. देवांनी इन्द्राला राजा म्हणून निवडले. व सर्व देवांनी त्याला मान्यता दिली. त्याच पद्धतीने वैदिक लोकांनी राजा हा निवडीने निश्चित करावा व सर्व लोकांची त्याला मान्यता असावी असे ठरविले.

राज्यसंस्था व लोकमत :-

राज्यसंस्था लोकमताला उत्तरदायी असावी की नसावी. लोक व राजे यांचे संबंध कोणत्या प्रकारचे असावेत. सार्वभौमत्वाचा अधिकार लोकांचा की राजांचा इत्यादि प्रश्नांची उकल वैदिक राज्यसंस्थेने स्पष्ट केली आहे. अव्यक्त ईश्वराने सार्वभौमत्व राजाला बहाल केले या कल्पनेचा पुरस्कार भारताने कधीही केलेला नाही. राज्यसंस्था लोकांनीच निर्माण केली, आणि ती लोकमतालाच नेहमी उत्तरदायी राहील हे प्रथमपासून उद्घोषिले आहे. लोक व राज्यसंस्था यांच्यात विशिष्ट प्रकारचा करार असे व तो उभयतांना बन्धनकारक असे, ही गोष्ट जगाच्या इतिहासात भारतीय राज्यपद्धतीने सर्वप्रथम मांडलेली आहे. पाश्चात्य राष्ट्रांत या कल्पनेच्या उदयाला १८वे शतक उजाडावे लागले. प्रजेच्या सुखात राजाचे सुख हे तत्त्व कौटिल्याने पण स्पष्ट मांडले आहे.

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानांच हिते हितम्।
नाऽत्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्।
विद्या विनीतो राजा हि प्रजानां विनये रतः।
अनन्यां पृथिवीं भुंक्ते सर्वभूत हिते रतः।

ऋग्वेदात असे म्हटले आहे -

विशस्त्वा सर्वा वांछंतु। ऋ. १०-१७३

प्रजाजन तू राज्यपदावर असावे अशी इच्छा करोत.

वैदिक कालीन सार्वभौम (लोकसभा) समिती :-

वेदकालीन राजकीय जीवनपद्धतीवरून ज्ञात असलेल्या कालापासून ही राजपद्धती लोकप्रतिनिधी व त्यांच्या समूहांच्या माध्यमातून चालत आलेली आढळते.

अशापैकी सर्वात मोठी राजसंस्था 'समिति' होय. सम्+इति = एकत्र येणे. योग्य पद्धतीने व्यवहार करणारा जनसमूह या अर्थी हा शब्द आहे. समिति म्हणजे लोकसभा हा अर्थ रूढ झाला. ही राष्ट्रीय स्तरावर काम कारणारी संस्था होती. यात सर्व प्रजाजनांना (विशः) सहभागी व्हावे लागे. ही खऱ्या अर्थाने सर्व थरांतील लोकांची तत्कालीन राज्यपद्धती राबवणारी एक प्रातिनिधिक संस्था होती. या समितीचे अधिकार राजाहून अधिक होते. किंबहुना समिती ही सार्वभौम संस्था होती.

राजाची निवड करणे हे 'समिति' चे मुख्य कार्य. त्यावेळी सर्व प्रजाजनांची उपस्थिती आवश्यक असे. तसेच राजाला राज्यावरून दूर करण्याचा, पदच्युत झालेल्या राजाची फेरनिवड करण्याचा अधिकार समितीकडे होता. निवड झालेल्या राजाने प्रजेचे हित साधावे आणि योग्य प्रकारे वर्तन करावे, जेणेकरून प्रजेचे कल्याण व रक्षण होईल. आणि त्यांची भरभराट होऊन प्रजा सुखी राहील. समितीकडून राजाला काही अधिकार प्राप्त होत असत. राज्य, राजा, राजसत्ता या सर्व प्रकारच्या संकल्पनांची बीजे या वैदिक मंत्रातून ध्वनित होतात.

संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्।
देवाभागं यथा पूर्व संजानाना उपासते।
समानः मंत्रः समितिः समानी समानं मनः सहचित्तमेषाम्।
समानं मंत्रं अभिमंत्रये वः हविषा जुहोमि
समानीत आकूतिः समाना हृदयानिवः।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति। ऋ.१०.१९१

मित्रांनो, तुम्ही एकत्र होऊनच कार्य करा आणि परस्पर विचारविनिमय करण्यासाठी संवाद करीत जा. पूर्वकाळी देव ज्याप्रमाणे यज्ञमंदिरात एकत्र येऊन हविर्भागाचा स्वीकार करीत असत त्याप्रमाणे तुम्हीही एकत्र बसून एकमेकांचे विचार समजून घ्या. हे जे तुम्ही, तुमच्या सर्वांचा मंत्र म्हणजे राजकीय धोरण एकसारखेच असू द्या. तुमची समिती ही सर्वांना एकवटणारी असावी त्या योगाने तुमचे मन, तुमचे चित्त हेही एक राहील. म्हणून तुम्हा सर्वांसाठी मी आता एकच मंत्र सांगतो, व सर्वांचा मिळून एकच हविर्भाग अग्नीला अर्पण करतो. तुमचे विचार आणि योजना एकच असू द्यात. तुमची मनेही सारखी एकाच भावनेने परिपूर्ण असू द्या. तुमचे अन्तःकरण एकाच ध्येयाकडे लागलेले असू द्याल. म्हणजे तुम्हाला पाहिजे असेल ती गोष्ट सहज साध्य होईल.

करारधिष्ठित राज्यपद्धती :-

वैदिक म्हणजेच हिंदुराज्यपद्धती ही करारावर आधारित असली तरी तिच्या कराराच्या व पाश्चात्य विचार प्रणालीतील कराराच्या स्वरूपात एक मोठा फरक आहे. हिंदुपद्धतीत हा करार सर्व प्रजांच्या संमतीने, तपस्विसंस्था व राजा यांच्यात झालेला आहे. सार्वभौमत्व ज्ञानमय, तपस्यासंपन्न जीवन जगणाऱ्या वर्गाकडे सोपविले गेले होते. हा वर्ग उपभोगशून्य, स्वामित्वाची आकांक्षा जाळून टाकलेला, निरिच्छ होता. यांच्यावर सिंहासनाचे नेतृत्व सोपविण्यात आले होते. या तपस्वी लोकांनी संरक्षणाचे खड्ग क्षत्रिय वर्णाच्या स्वाधीन केले व राज्यसंस्था निर्माण झाली.

'असिना धर्म गर्भेण पालयस्व प्रजा इति।
म.शां.प. अ. १६६.६८

धर्मासाठीच असलेल्या या खड्गाच्या साहाय्याने तू प्रजेचे पालन कर. याप्रकारे क्षात्रशक्तीला राज्यसंस्था महर्षिसंस्थेच्या द्वारे प्राप्त झाली. वैदिक राष्ट्रातील राजे सर्वसंमतीने निवडून दिले जात असले तरी प्रजाजनांनी तपस्विसंस्थेच्या सहाय्याने राजाची निवड केलेली असून राजपद केवळ करार न राहता तो एक संस्कार होता. अथर्ववेदात याबद्दल स्पष्ट उल्लेख आहेत. (अथर्व ६-८७/८८)

हे राजा, राष्ट्रांच्या हितासाठी आम्ही तुझी निवड करून तुला जनतेपुढे आणले आहे. ह्या राज्यावर तू ठामपणे स्थिर रहा. कोणतीही चलविचल होऊ देऊ नकोस. तुझ्या प्रजाजनांना तूच राजा असावेस असे वाटते.

विशस्त्वा सर्वा वांछंतु मा त्वत् राष्ट्रमधिभ्रशम्।

केसाइतका सुद्धा कर्तव्यापासून ढळू नकोस. पर्वताप्रमाणे पक्का रहा. इंद्राप्रमाणे अढळ व दृढ रहा. राष्ट्राचे भरण व पोषण कर. (राष्ट्र सुधारया)

निश्चित विधानाने समर्पित केलेला हविर्भाग मिळत असल्याने इंद्राने या राजाला राज्यावर पक्के स्थिर केले आहे.

त्याला सोमाने संमती दिली, ब्रह्मणस्पतीने अनुमती दिली.

हे तारकामंडित आकाश स्थिर आहे, ही पृथ्वी ध्रुव आहे, हे पर्वत अचल आहेत, हे सर्व जगत् सुस्थिर आहे तसाच हा राजा प्रजाजनांत स्थिर राहो. (इमे ध्रुवो राजा विशाभयम्)

राजा वरुण ठाम उभा आहे. बृहस्पति देव स्थिर आहे. इंद्र व अग्नी तुझे राष्ट्र स्थिर करोत. पदभ्रष्ट न होता राजपदावर चिरकाल टिकून रहा (राष्ट्रं धारयतां ध्रुवम्)

शत्रूचे निर्दालन कर, त्यांना पार बुडवून टाक, सर्व दिशा प्रसन्न होवोत. या राज्य पदावर समिती तुला दीर्घ काल स्थित करो. (ध्रुवाय ते समितिः कल्पयति)

करारने राजसत्तेच्या प्रतिष्ठापनानंतर राजाला राजपदावर विशिष्ट समारंभाने व संस्कारपूर्वक बसावे लागे. विशिष्ट प्रतिज्ञा अगर शपथ घ्यावी लागे. या गोष्टी प्राचीन निवडणूक व करारपद्धतीच्या खुणा होत, राजा निवडीच्या अधिकाराची जाणीव भारतीय राष्ट्रजीवनात भरून राहिलेली होती. सत्ताधीश अयोग्य वाटल्यास त्याला पदच्युत करण्याचा अधिकार होता. तसेच पुनः निवडही करण्यात येत असे. (अथर्ववेदातील उल्लेख याला पुष्टी देतात - अथर्व ३४.२, ६,७ ) लोकांनी तुला या पदावर पुनः निवडून दिले आहे. खूप लोकांनी तुझे नेतृत्व मान्य केले आहे. राज्ययंत्रातील या सर्वोच्च स्थानी रहा व मोकळ्या अन्तःकरणाने धनाची योग्य विभागणी कर. (न उग्रो विभजा वसूनि) सर्व आप्त जवळ येवोत, विरोधक बोलावोत आणि मित्र पुनः तुझीच निवड करोत. पुनःजनतेत ये , कारण तुझी व तुला निवडून देणाऱ्या प्रजेची मते जुळली आहेत. राजा अरेरावीने न वागल्यास ही निवड त्याच्या जीवितापर्यंत असे (दशमी मुग्रः सुमनावरोह) तू दहा दशकांपर्यंत राज्य कर.

## राजपद : एक संस्कार

वैदिक राज्यपद्धतीत राजपदग्रहण केवळ करार नसून संस्कारही होता. नवा राजा राज्यसिंहासनावर बसल्यानंतर जमलेले लोक व राजकृत मंडळ त्याला पदाधिकाराचे चिह्न म्हणून मणी देत. तो पळसाच्या काष्ठाचा असे. राजाची निवड करणारे राजकृत हीच मंडळी एकाची राजा म्हणून निवड निश्चित करत. याना रत्निन् असे म्हणत. अधिकारप्रदाननिर्दर्शक मणि वा रत्न राजाला या लोकांकडून घ्यावे लागे. रामायणकालापर्यंत राजकृत मंडळ असल्याचा उल्लेख आढळतो. मणी देणारे हे सर्व प्रजाजनांचे प्रतिनिधी असत. अथर्ववेदात याबद्दल उल्लेख आहे.

ये धीवानो रथकाराः कर्माराः ये मनीषिणः
उपस्तिन् पर्ण महां त्वं सर्वान् कृण्वभितो जनान् ।
ये राजानो राजकृतः सूता ग्रामण्यश्च ये ।
उपस्तिन् पर्ण महां त्वं सर्वान् कृणुभितो जनान् ।

(अथर्व ३-५,६/७) कुशल रथकारांनो, धातूच्या कारागिरांनो, शिल्पकुशलांनो सर्व बुद्धिमान लोकांनो हा मणी (पर्ण) देऊन मला साह्य करा. सर्वच प्रजाजनांकडून मला हा मणी प्राप्त होवो.

राजसिंहासन कितीही मोलाचे असले तरी त्याजवर व्याघ्रसिंहचर्म आच्छादिलेले असलेच पाहिजे. त्यावर अधिकारनिर्दर्शक चिह्ने असतात. त्यावर आरोहण करते वेळी पुढील मंत्र म्हटला जातो.

व्याघ्रो अधिवैयाघ्रे विक्रमस्य दिशो महि ।
विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु । अथर्व ४.८-४

व्याघ्रचर्मावर आरोहण करणारा तू मनुष्यांमधील व्याघ्र आहेस. आपल्या पराक्रमाने दशदिशा जिंकून पृथ्वीवर निरपवाद विजय संपादन कर. आपल्या प्रजाजनांना सर्वदा प्रिय होऊन रहा.(यानंतर राजाला अभिषेक करण्यात येई. त्यावेळी खालील मंत्र म्हणण्यात येत असत. तासां त्वा सर्वासां अपां अभिषिञ्चामि वर्चसा । अभित्वा वर्चसा सिञ्चन् अनापो दिव्याः पयस्वतीः अथर्व ४.८ ५.६) या जलाने मी तुला सर्व बाजूंनी अभिषेक करतो. या दिव्य फलप्रद अशा जलाभिषेकाने तुला सफलता प्राप्त होवो. अघा मनो वसु देवाय कृणुष्व तमो न उग्रो विभजावसूनि । (अथर्व ३.४.६) आपले लक्ष तू राष्ट्राचे उत्पादनसामर्थ्य वाढविण्यावर केंद्रित कर, संपन्न कर, त्याने योग्य वाटप करून प्रजेचे जीवन सुखी व समृद्ध कर. तुझे प्रधान कर्तव्य योग्य रीतीने पार पाड. वेदकाळी समृद्ध राज्याची महता किती सर्वमान्य झाली होती याची कल्पना येते.

## यज्ञविधिसंस्कार

राजा, सम्राट, तपस्विसंस्थेचा प्रतिनिधी - पुरोहित

हे तीनही लोकनेते आपापले पदग्रहण करताना त्यांना सांगितलेला यज्ञविधी करावा लागे. राजाला राज्यावर अधिष्ठित होताना राजसूय यज्ञ करावा लागे. यज्ञः एव राजसूयम् । राजा वै राजसूयेन इष्ट्वा भवति । (शतपथ ब्राह्मण) पुरोहिताची नियुक्ती करताना वाजपेय यज्ञ करीत. या यज्ञाचे फळ वैयक्तिक नसून सामाजिक आहे. पारलौकिक नसून इहलौकिक आहे. राष्ट्राचे जीवन अन्नधान्याने समृद्ध करणे हे वाजपेयाचे फल आहे. तिसरा सर्वमेध यज्ञ. सर्व राजांना जिंकून जो सम्राट होण्याची इच्छा करी त्यानेच हा यज्ञ करावयाचा असे. वेदकाळी एकछत्री राज्याची कल्पना भारतात होती. ''पृथिव्यै समुद्रपर्यंतायाः एकराट्'' इति.

राजसूयाचे तीन विधी संभवतात. १) होम हवन २) अभिषेचन ३) पदग्रहण. पदग्रहण हा विधी अकरा अधिकृत व्यक्तींच्या संमतीने होत असे. त्यांना राजकृत वा रत्नी म्हणत. त्यांची नावे अशी - १) पुरोहित २) सेनापति ३) राज्ञी ४) सूत ५) ग्रामणी ६) छत्री ७) संग्रहित्री ८) भागदुघ ९) अक्षवाप १०) गोविकर्मिन् ११) पालगल यांचे अधिकार खालील प्रमाणे होते.

१) पुरोहित :-

सर्व विद्यांत निष्णात. अथर्व वा ब्रह्मविद्या, दंडनीति यांत निष्णात. राज्यसंस्थेचा मार्गदर्शक. राष्ट्रकारणधुरंधर, धुरणि, वयं राष्ट्रे जागृयाम पुरोहिताः (शुक्ल यजु) संशितं मे ब्रह्म संशितं वीर्यं बलम्, संशितं क्षत्रं जिष्णु यस्यां अहं अस्मि पुरोहितः (शु.य. अ.११.८१) पुरोहित म्हणतो आम्ही जागरुकतेने राष्ट्ररक्षण करतो तरच आमची विद्या, आमचे बल, विजिगीषु क्षात्रवृत्ती, ज्याचा मी पुढारी आहे ते तेजस्वी राहील. असे वैदिककालीन पुरोहित होते. म्हणून ते समाजाचे पुढारीपण समर्थपणे करीत. बृहस्पति हा देवांचा पुरोहित. ऋग्वेदात त्याची स्तुती केलेली आढळते. अप्रति इतः जयानि समृधनानि प्रतिऽजन्यानि उत या सऽजन्या । अवस्थ वे यः वरिवः कृणोति ब्रह्मणे राजा तमवन्ति देवाः । त्याच्या पुढे प्रजाजन आपणहून नम्र होतात. अशा राजाचे सामर्थ्य अकुंठित होऊन तो शत्रूची धनसंपत्ती जिंकून घेऊ शकतो त्याला आपल्या स्वजनांनाही आपल्याच मतानुसार वागविता येते. देव त्याच्यावर कृपा करतात. (ऋ.४.५०) दाशराज्ञ युद्धात सुदासाचा पुरोहित वसिष्ठ होता. त्याने सुदासाला राज्य मिळवून दिले.

२) सेनापति - दुसरा महत्त्वाचा अधिकारी. सर्वयुद्धग्रहण विद्याविनीत. युद्धशास्त्र विषयक - शास्त्र व अस्त्र या विद्यांचे सूक्ष्म ज्ञान असलेला. त्याने राजनेतृत्व संपूर्ण मानलेले असते. हा राजाचे प्राणरूप अंगच आहे.

३) राज्ञी - पदग्रहणाचे वेळी राणीची संमति आवश्यक. ही केवळ राजाची बायको नाही. राज्याची पट्टराणी. तिच्याशिवाय राजा अपूर्ण. पत्नीविना राजसूय यज्ञ होत नाही. तिला अभिषेकसंस्कार राजाबरोबरच होत असे. राणी हे संस्कारित अधिकारपद होय.

४) सूत - हा केवल स्तुतिपाठक नसून राज्यातील सर्व बऱ्यावाईट, प्राचीनअर्वाचीन वृत्तांताच्या संरक्षण खात्याचा प्रमुख अधिकारी.

५) ग्रामणी - गावे व खेडी यांच्या समूहाचा अधिकारी.

६) संग्रहित्री - कोषाध्यक्ष

७) भागदुघ- महसूल खात्याचा अधिकारी.

८) अक्षवाप -नाण्यांचे मोजमाप करणारा -प्रमुख लेखापाल.

९) गोविकर्मिन् - जंगलखात्याचा मुख्याधिकारी. वने वन्यप्राणिरक्षण कर्ता.

१०) छत्री - राज्याचे छत्र सांभाळणारा अधिकारी.

११) पालगल - श्रमजीविप्रतिनिधी. हा शूद्र वर्णाचा असे. शूद्रांना देखील त्याकाळी समाजातला घटक म्हणून प्रतिष्ठा होती.

अभिषेचन संस्कार -

पवित्र जलाने अभिषेक केला जाई. राजसिंहासन धर्मरक्षणार्थ असल्याने अनेक देवतांची प्रार्थना करण्यात येत असे. कायद्याची देवता, वरुण, सद्‌गुण उत्साह प्रभुत्व प्राप्ति देवता, सविता, कौटुंबिक सद्‌गुणदेवता, अग्नि, वनरक्षण, स्थावररक्षण देवता, सोम, ज्ञानवर्धनासाठी बुद्धिदेवता, बृहस्पति, राजा करण्यासाठी सामर्थ्यासाठी देवता, इंद्र, पशुसंरक्षणासाठी देवता, रुद्र, सत्त्वरक्षणासाठी देवता, मित्र यांची मनःपूर्वक प्रार्थना करून राजाला हे सारे या देवतांकडून प्राप्त होवो, असे म्हटले जात असे. ही महत्त्वाची अंगे असून

त्यांचे पालन करण्यासाठी राजाला या गुणांची नितांत आवश्यकता आहे. तदेवं वरुणः एव धर्मपरिः धर्मस्य पतिं करोति परमाता वै सा यो धर्मस्य पतिः सद्योहि परमतां गच्छति। शतपथ. त्यानंतर शंभर छिद्रांच्या सुर्वणकलशाने त्या पवित्र जलाचा अभिषेक करण्यात येई. देव सद्गुण देतात जल राजाला पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार देतात. जलदेवतांनो तुम्ही राज्यपद प्राप्त करून देणाऱ्या आहात. स्वराज्यस्था राष्ट्रदा मनुष्यैः दत्तः। शतपथ. राजा प्रजेचे स्वास्थ्य व स्थैर्य निर्माण करतो. जनराज्यासाठी राजा आवश्यक आहे. देवता त्याला बल प्रदान करोत. परंतु त्या राजपद देत नसत. ते जनतेकडूनच राजाला प्राप्त होत असे. त्यावर शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार जलदेवतांनो तुमचा आहे. कारण तुम्ही सर्व ठिकाणी प्रवाहित होत असल्याने तुम्हाला हा अधिकार प्राप्त झालेला आहे. तुम्ही राज्यपद निश्चित करणाऱ्या आहात.

जलसेचन विविध भागांतील नद्यांचे पाणी एकत्र करून करण्यात येत असे. जलसिंचनात चारही वर्णांची मंडळी सहभागी होत. या जलसिंचनानंतरच राजा वस्त्रे धारण करी व त्याच्या डोक्यावर राजमुकुट ठेवला जाई. यानंतर पुरोहित घोषणा करीः हा राजा अखिल राष्ट्राचा अधिपति झाला आहे. गृहपालक अग्निदेवतेने हे जाणले आहे. सतत कीर्ति वृद्धिंगत होत असलेल्या इंद्रदेवतेने हे जाणले आहे, संपत्तीचे पोषण करणाऱ्या पूषन् देवतेने हे जाणले आहे, सर्व जगाला सुख देणाऱ्या द्यावापृथिवीने हे जाणले आहे. सर्वांना अत्यंत सुखप्रद अशा देवमाता अदितीने हे जाणले आहे. हा राजा झाला हे सर्वांना आता ज्ञात झाले आहे.

शपथविधी -

या घोषणेनंतर राजा सर्वांसमक्ष शपथ घेई. घटनेप्रमाणे सामान्य राजापासून तो सम्राटापर्यंत ही शपथ घ्यावीच लागे. त्याशिवाय अभिषेक पूर्ण होत नसे व राजेपणाही मान्यता पावत नसे. स ब्रूयात् सह श्रध्दया याञ्चरात्रीं अजायेहं याञ्च प्रेतास्मि तत् उभयं अंतरेण इष्टापूर्तं मे लोकं सुकृतं आयुः प्रजाः वृञ्जीथाः यदि ते दुहोयं इति। ती शपथ राजाने श्रद्धेने घ्यावी. येणेप्रमाणे - जर मी माझ्या प्रजाजनांच्या कर्तव्यात चुकलो आणि माझ्या हातून प्रजाद्रोह झाला, तर जन्मावारभ्य मरेपर्यंतच्या जीवनात मी इष्टापूर्तीचे अनुष्ठान करून परलोकाच्या दृष्टीने जे काही पुण्य संपादन केले असेल ते सर्व नष्ट होवो. माझी मुलेबाळे, माझे यश, कीर्ती इत्यादींचा सर्वनाश होवो. अशी शपथ घेतल्यानंतरच राज्याभिषेक केला जात असे. त्यावेळी पुरोहित म्हणत असे - सोमस्य त्वा द्युम्नेन अभिषिञ्चामि। अग्नेः भ्राजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येंद्रियेण। क्षत्राणां क्षत्रपतिः अध्येति दिधन् पाहि। इमं देवा असपत्नं सुवध्वं महते क्षत्राय महते जैष्ठ्याय महते जानराज्याय इन्द्रस्येंद्रियाय। इमं अमुष्यं पुत्रं अमुष्यै पुत्रं अस्मै विशऽएष वोऽमा राजा सोमोऽस्माकं ब्राह्मणानां राजा। हे राजा चंद्राच्या यशाने मी तुला अभिषेक करतो. तू क्षत्रियेश्वर हो, शत्रूंनी तुझ्यावर टाकलेल्या बाणांचे अतिक्रमण करून तू स्वतःच्या शरीराचे रक्षण कर. मी अग्नीच्या तेजाने सूर्याच्या कान्तीने व इंद्राच्या सामर्थ्याने तुला अभिषेक करतो. हे देवहो महनीय अशी क्षात्र पदवी, सर्वमान्य असे श्रेष्ठत्व अत्यंत विस्तीर्ण असे हे राज्य आणि देवराज इंद्राचे सामर्थ्य संपादन करण्याची तुम्ही या राजाला प्रेरणा करा. सर्व जातीच्या लोकांनो, हा तुमचा राजा आहे. आम्हा तपस्विजनांना नक्षत्रराज चंद्र हाच राजा आहे. मग राजा पृथ्वीची प्रार्थना करीः पृथ्वी मातर् मा हिंसीः। मा अहम् त्वाम्। न हि माता पुत्रं हिनस्ति न पुत्रो मातरम्। शतपथ.

प्रजाजन राजाला सांगत -

इयं ते राट् यन्तासि यमनो ध्रुवोसि ध्रुसमः।
कृष्यै त्वाक्षेत्राय त्वा रय्यै त्वा पोषायत्वा।

हे राजपद तुला दिले जात आहे. तू त्याचा नियंता हो, मार्गदर्शक हो. तू स्थिर रहा. सहनशील रहा. हे अधिकार तुला कृषीसाठी देण्यात आले आहेत. जनकल्याणासाठी दिले आहेत, उन्नतीसाठी दिले आहेत. हे तुला जनतेने बहाल केलेले आहेत. या साऱ्या महत्वाच्या गोष्टी अभिषेकामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. हे राज्यपद तुला सोपविले आहे. पवित्र संस्काराने तुला पुनीत केले आहे. हा पवित्रपणा पूर्णपणे राखावयाचा आहे. राजा हा मनुष्यनिर्मित आहे देव त्याला मदत करतात. मात्र राज्यपद लोकांनीच बहाल केलेले आहे. याची सतत आठवण राजाला करून देण्यात येत आहे.

मग मंत्रोच्चारपूर्वक त्याला सिंहासनावर

बसविण्यात येई. तू स्वसंरक्षित गादीवर बैस, असे सांगण्यात येई. मग धर्मदण्डाचा उपयोग पुरोहित करी - अथ एवं पृष्ठतः तूष्णीमेव दण्डैः घ्नन्ति। न दण्डै : घ्नन्तः दण्डवधं अति नयन्ति तस्मात् राजा दण्डयो यदेनं दण्डवधं अभिनयन्ति। त्या राजाला पाठीवर पुरोहित दण्डाने आघात करी. राजा दण्डाच्या अतीत नसून धर्मदण्डाच्या कक्षेत आहे हे पुरोहित त्याला सांगे. थोडक्यात हिंदुराजपद हे मानवी स्वरूपाचे म्हणजे ऐहिक आहे, राजाची राजपदी निवड केली आहे. काही करारानुसार ही पदवी त्याला बहाल केली जात असे. जनतेच्या साहाय्याने राजाला कारभार करावा लागे. थोडक्यात वैदिक राज्यसंस्था अशी होती- ही मानवनिर्मिती आहे याची जाणीव ऋषींना होती, निवडणुकीने आपल्या इच्छेनुसार लोक राजा निवडीत. राज्यसंस्था तपस्वी व प्रजा यांना उत्तरदायी असे. राज्यसंस्था करार व संस्कार होता. तो राजा, प्रजा, व तपस्विसंस्था यांच्यात होई, राजपद विश्वस्तपद होते आर्थिक हितसंबंध स्थिर राखणे, पिळवणूक न करणे हे प्रधान सूत्र असे. वैदिक राज्यसंस्था कायद्याच्या नियंत्रणाखाली होती. सार्वभौमत्वाचे अधिकार समितीकडे होते.

### सार्वभौम समिती -

राष्ट्रातील प्रतिनिधींची सभा, लोकसभा. ध्रुवाय ते समिति : कल्पताम् इह। अथर्व ६.८०.३ समिती तुला दीर्घ कालासाठी राजा करो. न अस्मै समितिः कल्पते। त्याला समिती राजा करीत नाही. हे 'समिति' चे अधिकार होते. राजा समितीत जातीने उपस्थित असे. राजा न सत्यः समितो रियानः।ऋ.९.१२.६ सत्यप्रेमी राजा नित्य लोकसभेत प्रवेश करतो. समितीत सभासद चर्चा करीत आपले म्हणणे पटवून देत असत. आर्थिक धोरण ठरवीत. संग्रामे संयते समयकामः। (तै. संहिता) संग्राम म्हणजे गावाची प्रातिनिधिक सभा समय-समान आर्थिक हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींचे आर्थिकधोरणाबाबत एकमत. अर्थीयैः सुहृभिः ऐकमत्यं समयः। समिती वेदकालीन दर्जेदार संस्था होती. इथे फार दर्जेदार चर्चा होत असे. अत्यंत मोकळेपणाने योग्य मार्गदर्शन केले जात असे. आपले म्हणणे पटवून देण्यासाठी प्रत्येक सभासद उत्सुक असे. हे उत्कृष्ट वक्ते होते. ये संग्रामाः समितयः तेषु चारु वेदम ते। तै ब्रा.आपण उत्तम वक्ते आहोत. दुसऱ्याचा विरोध ओढवून न घेता पटवून देऊ शकू अशी उमेद ते बाळगत. अभिभूः अहं आगमम् विराट् प्रतिवाश्याः। पारस्कर . मी यशस्वीपणे पटवून देऊ शकतो. सारे निर्णय परस्परचर्चा करून घेतले जात. छांदोग्यात एक उल्लेख आला आहे. शिक्षण पूर्ण झालेला विद्यार्थी पांचालांच्या समितीत येतो. पांचालानां समितिं एयाय। तिथे क्षत्रिय राजा प्रवहण जैवली यांनी त्याला तत्त्वज्ञानविषयक पाच प्रश्न विचारले. एकाही प्रश्नाचे त्या विद्यार्थ्याला उत्तर देता आले नाही. त्यावेळी तो राजा त्याला म्हणतो, तुला काही येत नसताना शिक्षण पूर्ण झाले असे कसे म्हणतोस ?

समिती सर्व प्रजाजनांची असे. त्यात गावचा प्रतिनिधी ग्रामणी असे. खेडे एक घटक मानून त्यावर प्रतिनिधित्व आधारित असे. ही संस्था बरीच वर्षे अस्तित्वात होती. छांदोग्यानंतर ही सभा या नावाने उदयाला आली. सभा आणि समिती या प्रजापतीच्या दोन कन्या असे मानले गेले आहे. सभा च या समितिः च आवतां प्रजापतेः दुहितरौ संविदाने। लोकतंत्रवादाची बीजे भारतीय राष्ट्रजीवनात फार प्राचीन काळापासून नांदत होती. लोकतंत्र-बहुमतानुसार निर्णय घेतले जात. सभेला नरिष्टा असे नांव होते. कोणी आक्रमण करू शकत नाही अशी सभा. अनतिक्रमण या नावाने तिला नरिष्टा असे म्हणत. सभासदांना बहुमताची कदर बाळगावी लागे. ते सभेला आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करीत.

### सभेचे मुख्य काम - न्यायदान :-

सभा म्हणजे वैदिक कालीन न्यायमंडळच. यातील सभासद मुरब्बी, विद्वान, व वजनदार असत. या सभासदांना पितरः असे संबोधले आहे. पितरः पालकः पितृभूतः वा सभासदाः जनः। वेदातून सभाभ्यः सभापतिभ्यः नमः। म्हणून वंदन केले आहे. (रुद्रसूक्त). न्यायमंडळाचे नियम कडक होते. अपराध्यांची चौकशी होत असे. गंभीर अपराधाबद्दल शिक्षा होत असे. धर्मात् सभाचरन्। न्याय मिळविण्यासाठी तो सभेत प्रवेश करतो. यत् ग्रामे यत् अरण्ये यत् सभायां यत् इंद्रिये। यत् शूद्रे यत् अर्थे यत् येनश्चकृता वयं यदेकस्य अधिधर्माणि तस्य अव यजनमसि। (यजु.) जे गावात, जे अरण्यात, जे समितीत जे इंद्रियाविषयी, जे शूद्रासंबंधी जे

वैश्यासंबंधी आम्ही काही पातक केले असेल अथवा धर्मकार्यासंबंधी जे काही पातक घडले असेल त्या सर्व पापांचा तू नाश करणारा आहेस. अशा प्रकारे अपराध्याचा अंतिम विचार या संस्थेत होई. सभेच्या निर्णयानंतर कोणाकडेही दाद मागण्याची सोय नसे. एखादा माणूस निर्दोष सुटला तर त्याचे स्वागत करण्यात येई. सर्वे नन्दन्ति मनसा आगतेन सभा साहेन सख्या सखायः। सभेतून आपला मित्र निर्दोष सुटून येताच सर्व मित्र आनन्दाने त्याचे स्वागत करीत. आणखी एक 'विदथ' नावाची संस्था होती राष्ट्राचे सैनिकी जीवन नियंत्रित करणे हे तिचे काम होते. विदथ, सभा, समिती, सेना या लोकसंस्थांचे अस्तित्व अथर्ववेदात वर्णिले आहे. तं सभा च समितिश्च सेना च। धर्म व सैनिकीकरण उभयविध कामे या संस्थेकडे होती.

करआकारणी :-

राजा हाच एकमेव आकारणारा होता. तो सर्व प्रजाजनांकडून कर वसूल करी. ध्रुवं ध्रुवेण हविषाभिः सोमभृशामसि। अथो न इंद्रकेवली दिशोबली हरस्करम्। ऋ. १०.१८३.६ तो एकमेव कर वसूल करणारा होता. नेहमीचा कर वाढीव स्वरूपातही घेतला जात असे. कर घेण्याचा अधिकार फक्त राजाला असे. राजाचा हा अधिकार प्रजेकडून निश्चित करण्यात आला होता. त्याला उच्चपदस्थ मानले जात असे. उत्पन्नाचा सहावा भाग कर म्हणून घेण्यात येत असे.

राष्ट्ररक्षण :-

ऋग्वेदात रणदुंदुभीने दुमदुमलेले वातावरण पाहावयास मिळते. अथर्ववेदात कूटयुद्धविषयक मंत्र आढळतात. तेजस्वी वैदिक राष्ट्राची इन्द्र ही संग्रामदेवता होय. भारतभूमीचे स्वामित्व त्यानेच आर्यांना समर्पण केले. अहं भूमिम् अददां आर्याय। अहं वृष्टिं दाशुषे मर्त्याय। अहं अपो अनयंवावशाना मम देवासो अनुकेतु मायन्। ऋ. ४.२६.२ . ही भूमी मीच आर्यांना दिलेली आहे. दानशूर भाविक जनांकरता मीच पर्जन्यवृष्टी केली. धो धो शब्द करून वाहणाऱ्या उदकांना मीच वाट करून लदली. आणि माझ्याच ईश्वरी संकेताप्रमाणे देव वागत आलेले आहेत. ऋग्वेदकालापासून तो तहत रामायण, महाभारत, त्याही पुढे हर्षवर्धनकाळापर्यंत भारतीय योध्याचे धनुष्यबाण हे सर्वश्रेष्ठ आयुध होते. या काळातही सगळे वीर धनुर्धारी होते. म्हणून या शास्त्राला धनुर्वेद असे योग्य नाव दिले गेलेले आहे.

संरक्षक व आक्रमक अशी दोन प्रकारची शस्त्रे होती. या प्रत्येक प्रकारात चार प्रकारचे वर्गीकरण केले होते. मुक्त, अमुक्त, मुक्तामुक्त, मंत्रमुक्त. मुक्त-शत्रूच्या अंगावर सोडण्यात अथवा फेकण्यात येणारी शस्त्रे. अमुक्त-शस्त्र न फेकता आपल्या हातात ठेवून प्रहार करावयाची शस्त्रे. यंत्र वा मंत्रमुक्त-मंत्राने अगर गुप्त पद्धतीने यंत्राच्या साहाय्याने फेकली जाणारी शस्त्रे. धनुष्यबाण, मुक्त खड्ग, अमुक्त. मंत्रमुक्त विशेष अभिचारमंत्राने युक्त मुक्तामुक्त-प्रहार करून परत येणारी शस्त्रे धनुर्वेदात धनुष्याचे प्रकार त्याची लांबीरुंदी, तो कसा बनवावा, धनुष्यदंड कोणत्या धातूचा वा लाकडाचा असावा इत्यादी मुक्तामुक्त प्रकारात हे उपयोजिले जात. शतघ्नी म्हणजे तोफ. शंभर माणसांना मारणारे यंत्र.

राष्ट्राची प्रतिष्ठा ध्वजाच्या ठिकाणी एकवटलेली होती. अस्मितेचे प्रखर जीवनज्योतीचे एकमात्र प्रतीक म्हणजे ध्वज अशी धारणा होती. राजमस्तकापेक्षाही राष्ट्रध्वज अधिक मोलाचा होता. युद्धात ध्वजावर प्रहार करणे महत्त्वाचे होते. ध्वजरक्षणासाठी प्राणार्पणाची प्रेरणा मिळत असे. अस्माकं इन्द्र संऋतेषु ध्वजेषु अस्माकं या इषवः ताः जयन्तु अस्माकं वीरा उत्तरे भवन्तु अस्माकं उं (इति) देवा अवन्तु हवेषु। आमच्या सैन्याचे ध्वज शत्रूसैन्यात मिसळून गेले असता हे इन्द्रा तू त्यांच्याजवळ संरक्षणार्थ रहा. आमच्या सैनिकांनी सोडलेले बाण शत्रूंची शिरे छाटून विजयी होवोत. आमचेच वीर उत्कृष्ट ठरोत. त्यांचीच सरशी होवो आणि ह्या संग्रामप्रसंगी दिव्य विबुध आमच्याच बाजूला असो. ध्वजसंरक्षण, ऋग्वेदकाळी किती महत्त्वाचे समजले जात होते याची कल्पना येईल.

एताः देवसेनाः सूर्य केतवः सचेनसः।
अभिमान् तो जयन्तु स्वाहा।

अथर्व ५.२१.१२

या दिव्य सेना सूर्यचिह्नाचा ध्वज घेऊन चालणाऱ्या आहेत. त्या हृदय दृढ करून शत्रूंचा पराभव करोत. विजयासाठी आमचे आत्मसमर्पण होवो.

(रथी हा युद्धातील एक महत्त्वाचा घटक. अस्माकं एभिःनृभिः वयं सासह्याम पृतन्यन्तः वनुयाम वनुष्यन्तः नभन्तात् अन्यके समे। ऋ. ८.४०.७) आम्ही आमच्या शूर सैनिकांसह शत्रुसैन्याला चिरडून टाकू आणि आमच्याशी सख्य करणाऱ्याशी सख्य करू. जशास तसे हेच भारतीयांच्या राजनीतीचे वेदकाळपासूनचे सूत्र आहे.

**अर्थव्यवस्था :-**

कोणताही मनुष्य उन्नत होण्याची धडपड करतो, कारण सुख, संपत्ती व सत्ता यांचे स्थान प्राप्त व्हावे असे त्याला वाटते. हिंदुपद्धतीत उन्नती म्हणजे त्यागमय जीवनाचा स्वीकार असे मानले गेले आहे. कृषि वाणिज्य पशुपालन ही राष्ट्रसमृद्धीची साधने वैदिक कालीन राष्ट्रात सिद्ध होती. वैदिक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत भोग्याचा विचार नसून भोक्ता व भोग्य अशा दोन्ही घटकांचा पायाशुद्ध विचार केलेला आह. बुद्धिबल, शरीरबल, धनबल व श्रमबल या सर्वांचा योग्य समन्वय साधून ते सर्व समष्टिरूप परमेश्वराला अखंड त्यागपूर्वक समर्पण करण्याची योजना आखली गेली आहे. हे अर्थशास्त्राचे स्वरूप आहे.

**विविध राज्यपद्धती :-**

राज्यम्-सर्वेषां राज्ञां श्रैष्ठ्यं अरिष्ठ्यं परमतंगच्छेयम्। इतरांकडून श्रेष्ठ म्हणून वाखाणला गेलेला राजा. महाराज्यम्-मोठा राजा महत् श्रेष्ठतावाचक शब्द आहे. शेजारी असलेल्या राजाहून मोठा. आधिपत्यम्-मांडलिक राजांचा अधिपती, प्रमुख. आपल्या संरक्षणाखाली अनेक राजे आश्रयाला असलेला छोटा सम्राट. सार्वभौम : सर्वभूमीवर एकछत्री राज्य चक्रवर्ती राज्य. पृथिव्यैः समुद्रपर्यन्तायाः एकराट्। सम्राट ही कल्पना सार्वभौमहून अगर आधिपत्याहून प्राचीन आहे. एका महान् राजाखाली असणारे इतर राजे. ही राज्ये अंतर्गत स्वतंत्र असतात. मात्र सामूहिक करभार सम्राटाकडे. थोडक्यात संयुक्त संस्थाने. भौज्य-अनभिषिक्त राजा केवळ राज्यकारभार पाहणारा. स्वाराज्यं = स्व + राट् स्वतःचे राज्य त्या भूभागातील लोकनियुक्त राजा. वैराज्यम्- राजा नसलेले राज्य म्हणजे लोकराज्य, सर्व लोकांनी चालविलेले राज्य. पारमेष्ठ्यं राज्यम् - परमश्रेष्ठ दर्जाचे राज्य-ही ऐतरेय ब्राह्मणात माहिती आढळते. (८.१५.) थोडक्यात वैदिक कालीन राजे, राज्यपद्धती, अभिषिक्त राजाचे महत्त्व, युद्धपद्धती, करभार, नैतिकमूल्य जोपासना, प्रजाभिमुख राज्य, त्यांची शारीरिक मानसिक, आध्यात्मिक उन्नती, स्वराष्ट्रसंवर्धन, संरक्षण सार्वभौम सत्ताकेंद्र समिती या सर्वांचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

इंग्रजी शिक्षणाने आमच्या देशातील धर्म-विचाराची दिशा बदलली आहे. मनुष्याचे मन धर्मापासून कसे दूर जाईल असे शिक्षण दिले जात आहे. धर्माचे ज्ञान आवश्यक आहे, कारण धर्म हा जीवन घडविण्याचा प्रश्न आहे. उगाच टवाळकी करण्याचा नाही. आपल्या खऱ्या धर्माचे उज्ज्वल स्वरूप सर्वांपुढे मांडण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. आजही आपल्या देशात विद्वान, कल्पक, विज्ञाननिष्ठ मंडळी आहेत. परंतु देश, राष्ट्र, अस्मिता यांविषयी अत्यल्प विचार होतो. परकीय सत्ता या देशात फार काळ राहिल्याने आमच्या साम्राज्यकल्पना नष्टप्राय झाल्या. सैन्याची रचना कशी असावी, राज्यकारभार कसा असावा याबद्दल आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेली राज्यव्यवस्था, तिचे प्राचीनत्व त्यात लोकतांत्रिक प्रवृत्तीची बीजे ही सारी अभ्यासनीय नाहीत का ? गणपति ही देवताच मुळी अनेक गणांचा, समूहांचा अधिपति. त्याची आराधना करताना मंत्रपुष्पातील शब्द राज्यपद्धतीच्याबद्दलचे आहेत. राज्य महाराज्य साम्राज्य भौज्य स्वाराज्य वैराज्य साम्राज्य आधिपत्य पारमेष्ठी राज्य- या तत्कालीन विविध राज्यपद्धती होत्या हे समजून घेतले पाहिजे. ही ज्ञानपरंपरा खंडित झाली. ती ज्ञानगंगा पुनरपि प्रवर्तित करणे आवश्यक आहे. वयं साम्राज्यवादिनः। कृण्वन्तो विश्वमार्यम्। आम्ही साम्राज्यवादी जरूर आहोत. आमचे साम्राज्य भूभाग आक्रमून गुलाम करण्याचे नसून आम्ही संपूर्ण विश्वात सुसंस्कृतता निर्माण करू, ही ती घोषणा आहे. आपली ही राजकीय प्रेरणा आहे. आमच्या पूर्वजांचे हे घोषवाक्य पुनरपि साकार करण्यासाठी झटणे हेच हिंदुस्थानातील तरुणांचे, ज्येष्ठांचे, श्रेष्ठांचे, मातांचे, भगिनींचे आद्य कर्तव्य ठरेल. पृथ्वीवरील सर्व मानववंश सुसंस्कृत करण्याची क्षमता आपल्यात निर्माण करणे हे काळाचे आह्वान आपण पेललेच पाहिजे, तरच खरी शांती, समृद्धी, नीती निर्माण होईल. हे आह्वान तरुण पिढीने स्वीकारलेच पाहिजे.

• • •

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (९)

डॉ. र. पु. कुलकर्णी

दक्षिण भारतीय शैलीचे देवालय, त्याच्या भोवती असलेले निरनिराळे तट (प्राकार), त्या प्राकारांमध्ये असलेले अवाढव्य उंच गोपुरद्वार, ऐवढेच नव्हे तर अशा भल्यामोठ्या देवालयात इमारतींची, मांडणी (Temple-planning) कशी असते या विषयांची माहिती आपण घेतली. देवालयाच्या स्थापत्यशास्त्रानुसार अनेक अंगांची माहिती जशी महत्त्वाची आहे त्याचप्रमाणे ते देवालय बांधणाऱ्या स्थपतीच्या भावना त्या देवालयाभोवती कशा गुंतलेल्या असतात; देवालय व त्यातील देव यांबद्दल त्याच्या मनात काय कल्पना असतात याचीही माहिती घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.

दक्षिण भारतीय देवालयांत सगळ्यात बाहेरचे गोपुर हे भव्य आणि उत्तमोत्तम नक्षी, अलंकरण तसेच देवमूर्ती यांनी सजविलेले असते. जसजसे आपण देवालयाकडे जातो तसतसा या गोपुरांचा आकार व उंची लहान होत जातात, व खुद्द देवालयाभोवती जी भिंत असते त्या भिंतीतील प्रवेशद्वार सर्वांत लहान आकाराचे व उंचीचे असते. आधुनिक पाश्चात्य स्थापत्यशास्त्रींच्या मते गोपुरांची ही योजना, सर्वांत उंच गोपुर सर्वांत बाहेर व सर्वांत लहान गोपुर आतमध्ये, सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने रुचिपूर्ण वाटत नाही. त्यांच्या मताने व त्यांच्या अनुकरणाने कांही भारतीयांचे हेच मत आहे, जसजसे देवालयाजवळ जाऊ तसतशी गोपुरे अधिकाधिक भव्य व उंच असावयास हवी म्हणजे एकाहून एक मोठे व अवाढव्य अशी गोपुरे एका मागोमाग एक अशी पाहिली म्हणजे त्यांचा मनावर परिणाम अधिक चिरस्वरूपी असतो व गोपुरांची ही योजना अधिक सौंदर्यपूर्ण दिसली असती. या बाबतीत पूर्वीच्या भारतीय स्थपतींची विचारसरणी वेगळी आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सर्वांत बाहेर जे उंच, भव्य ,अनेक मूर्ती, अलंकार यांनी सजविलेले गोपुर आहे, ते मानवी मनाच्या, त्या गोपुराजवळ भक्त आल्यानंतर, असलेल्या अवस्थेचे प्रतीक आहे. देवाचा भक्त जेव्हा देवदर्शनासाठी येतो त्या वेळेला त्याच्या मनात अनेक राजस व तामस विचारांनी गर्दी केलेली असते. देवदर्शनाला येण्याचा त्याचा मुख्य हेतू, निदान बहुतांश भक्तांचा तरी, बाहेरील जगात व्यवहार करताना जी अनेक अपयशे झेलावी लागतात त्यांच्या जागी यश मिळावे, जगात पुढे येण्यासाठी व यशस्वी होण्यासाठी, अमाप पैसा मिळविण्यासाठी, देवाचे सहाय्य मिळावे या हेतूने मनुष्य देवदर्शनासाठी येत असतो. या व असल्याच विचारांची त्याच्या मनात भवति न भवति चालू असते. भक्तांच्या मनाचे प्रतिबिंब राजस प्रकारच्या, अनेक रितींनी शृंगारलेल्या गोपुरामध्ये दिसून येते. देवदर्शनासाठी आतुर झालेला भक्त जसजसा देवालयाजवळ जाऊ लागतो, तशी त्याच्या मनाची तगमग हळूहळू कमी होत जाते. त्याच्या मनात सात्विक भाव निर्माण होऊ लागतात. राजस भावांचे प्राबल्य असतेच, पण त्यांतही पुन्हा सात्विक भावाचा उद्भव होतो. भक्ताच्या मनाची ही स्थिती उत्तरोत्तर लहान होणाऱ्या, अनेक मूर्ती, अनेक अलंकार यांची तडक भडक येथे कमी होत जाणाऱ्या अशा गोपुरांनी दर्शविली जाते; किंवा गोपुरांच्या अशा दर्शनाने भक्ताच्या मनाची तडफड कमी होऊ लागते, त्याचे मन स्वतःविषयी, स्वतःच्या स्वार्थाविषयी कमी विचार करू लागते व देवाविषयी, देवाच्या कर्तृत्वाविषयी त्याच्या मनाची अधिकाधिक खात्री होत जाते. देव हाच कर्ताकरविता असून,आपण त्याच्या हातातले केवळ बाहुले आहोत आणि देवाला तनमनाने समर्पित होणे यातच आपले हित आहे असे अधिकाधिक सात्विक विचार त्याच्या मनात येतात आणि जेव्हा तो देवालयांत शिरून गर्भागारातील अनेक भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या देवमूर्तीचे दर्शन घेतो तेव्हाच कृतकृत्य होतो. त्याच्या मनाची ही अवस्था होण्यास उत्तरोत्तर लहान व कमी उंचीच्या गोपुरांची मदत होते. भारतीय स्थपती, यांप्रमाणे केवळ बाह्यसौंदर्याचाच विचार करतात असे नव्हे , तर मनुष्याच्या अंतर्मनातील विचारांवर देखील आपण तयार केलेल्या वस्तूचा यथायोग्य परिणाम व्हावयास हवा याचाही विचार ते करतात. रुचिपूर्ण सौंदर्य याचा अर्थ तरी काय घ्यावयाचा ? जे सौंदर्य मनाला भावते जे सौंदर्य मनाच्या विचारांशी एकरूप असते ते रुचिपूर्ण सौंदर्य व सौंदर्याच्या या व्याखेप्रमाणे भारतीय स्थपतींनी

उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या गोपुरांची केलेली योजना ही त्यांच्या रुचिपूर्ण सौंदर्याचीच द्योतक आहे.

भारतीय स्थपतींच्या मताने देवालय हे भक्तजनांच्या समुदायाकरिता किंवा त्यांच्या समुदायाने एकत्रित प्रार्थना करण्याचे स्थान नाही. त्यामुळे भारतातील देवालये ही आकाराने लहान असतात. त्यांच्या मताप्रमाणे देवालयातील देवाशी तादात्म्य मिळविणे ही भक्ताची खरी इच्छा असते आणि त्यासाठी देवाशी एकांती अगर एकटेपणे भेट घेणे भक्ताला अधिक आवडते. त्यांच्या मताने देवालयातील देवमूर्ती ही जीवात्म्यासारखी असून खुद्द देवालय हे देवाचे शरीर आहे.

*देहो देवालय प्रोक्तो जीवो देवः सनातन ।*

म्हणजे मानवी देह हा देवालयासमान असून त्या देहातील मानवी जीव हा देवस्वरूप असतो. याच विचाराप्रमाणे देवालय हा देवाचा देह असून देवाची मूर्ती ही जीवात्मा असते.

*विमानं स्थूललिङ्गं च सूक्ष्मलिंगं सदाशिवम् ।*

म्हणजे प्रासाद किंवा देवालय हे देवाचे स्थूल स्वरूप असून खुद्द देवमूर्ती हे देवाचे सूक्ष्मरूप होय.

याहूनही 'शिल्परत्न' या शिल्पशास्त्राच्या ग्रंथात स्पष्ट म्हटले आहे की

*प्रासादं पुरुषं मत्वा पूजयेन्मन्त्रवित्तमः ।*

यातील पुरुष हा सांख्यांच्या किंवा वेदान्त्यांच्या प्रकृती व पुरुष या अनादी जोडीतील पुरुष समजावयाचा. तेव्हां भारतीय स्थपति देवालय बांधताना त्याविषयी केवढा पूज्यभाव बाळगीत असत याची कल्पना येते.

प्रासाद हा पुरुषरूप म्हणजेच मानवस्वरूप आहे अशी एक कल्पना आहे. 'विश्वकर्म वास्तुशास्त्र' या शिल्पशास्त्राच्या ग्रंथात प्रसाद म्हणजे देवालय आणि मनुष्य यातील साधर्म्य फार सुंदर वर्णिले आहे.

*उपपीठं चरणाकारं अधिष्ठानं जानुमण्डलम् ।*
*कुम्भपञ्जर संस्थानं नाभिश्चोदर सीमकम् ॥*
*पादवर्गं कराकारं प्रस्तरं बाहुमूलकम् ।*
*तत्कण्ठं गलमित्युक्तं शिखरं मुखमेव च ॥*
*उष्णीषान्तं शिखा चैव महानासी च नासिका ।*
*नेत्राणां क्षुद्रनास्यौ च विश्वरूपमिति स्मृतम् ॥*

वरील श्लोकाचा अर्थ खाली तक्त्यात दिला आहे व तो अधिक चांगला समजावा म्हणून आकृती दिली आहे.




**Fig. 1 DESIGN OF VIMANAM ILLUSTRATING FORM**

| देवालयाच्या अवयवाचे नाव | | मनुष्याच्या अवयवाचे नाव | |
|---|---|---|---|
| संस्कृत | मराठी | संस्कृत | मराठी |
| उपपीठ | जोते, चौथरा | चरण | पाय |
| अधिष्ठान | जोते, चौथरा | जानुमण्डल | गुडघा |
| कुंभ, पञ्जर | खांबाचा कुंभ हा अवयव व वरच्या मजल्यावरील कूट, कोष्ठ, पञ्जर हे अवयव | नाभि व उदर | पोट व त्यावरील बेंबी |
| पादवर्ग | खांब, कुडमस्तंभ भिंत | कर | हात |
| प्रस्तर | तुळ्या | बाहूमूल | खांदा |
| कंठ | शिखराखालील अरुंद अवयव | गल | मान |

| | | | |
|---|---|---|---|
| शिखर | छप्पर | मुख | तोंड/चेहरा |
| उष्णीष | स्थूपि, कळस | शिखा | शेंडी |
| महानासी | मोठा श्रृंगारलेला कोनाडा | नासिका | नाक |
| दोन | दोन लहान | नेत्र | डोळे |
| क्षुद्रनासी | अलंकारपूर्ण कोनाडे | | |

तेव्हा भारतीय स्थपतींच्या मताने देवालय हे मनुष्यरूपी देवाचे शरीर आहे. या देवालयाच्या निरनिराळ्या अवयवांना देखील मानवी अवयवांची नांवे दिली आहेत.

येथे देवालयाचे जे मनुष्यरूपाने वर्णन दिले आहे ते उभ्या असलेल्या मानवाकृतीशी मिळते जुळते आहे. परंतु देवालयाचे स्वरूप त्याला लागून असलेले मंडप, त्याच्याभोवती असलेल्या भिंती तसेच त्या भिंतीत असलेले गोपुरद्वार यांची रचना अशी आहे की त्यातून झोपलेल्या देवमूर्तीचे, शयनमूर्तीचे दर्शन होते. हे वर्णन देणारे श्लोक खाली दिले आहे.

*गर्भगृहं शिरः प्रोक्तं अन्तरालं गलं तथा ।*

*मण्डपं च मुखं बाहू कुक्षिः स्यात् मण्डपो महान् ॥*

*प्रकारं जानु जंघे च गोपुरं पादमेव च।*

*पादस्थाङ्गुलयः प्रोक्तः गोपुरस्थूपयस्तथा ॥*




**Fig. 2 TEMPLE LAYOUT ILLUSTRATING HUMAN FORM**

देवालयाचा गाभारा हा शेषशायी भगवान विष्णूचे मस्तक. त्यापुढील अंतराल म्हणजे गर्भगृह व पुढील मण्डप जोडणारा बोळ (मंडप) हा त्या मूर्तीचा जणू काही कंठच. मण्डल हा त्याचा खांदा आणि त्यापुढील महामंडप हा त्या मूर्तीच्या पोटाच्या स्थानी असतो. प्राकार जणू त्याच्या मांड्या व गुडघे आणि गोपुर त्याची पावले होत. गोपुरावरील अनेक कळस ही त्याच्या पावलाची बोटे. तर असे हे संपूर्ण देवालयरूपी गांवाचे शेषशायी भगवानाशी साम्य दर्शविले आहे. गोपुराच्या पायरीला, प्रवेशद्वाराच्या पायरीला आपण हात लावून नमस्कार करतो म्हणजे जणू काही भगवान विष्णूचे पादवंदनच करतो.

तेव्हा भारतीय स्थपती देवालय देवस्वरूप मानतो आणि त्यामुळेच त्याच्या उभारणीमध्ये, अलंकरणामध्ये, नक्षी व मूर्तीशिल्पांत छोटीशी देखील चूक होणार नाही. याची तो काळजी घेतो. देवालयाच्या कोपऱ्याशी जेथे भिंतीचा कांही भाग दुसऱ्या भिंतीच्या काही भागाच्या आड असतो येथे देखील दगड तसाच न घडविता ठेवला जात नाही. जेथे नक्षीचा पट्ट असेल, तो पट्ट या भागांत दुसऱ्या भिंतीने झाकला जात असला तरी तेथे नक्षी केलेली असते. भले ती नक्षी दिसत का नसेना, पण देवालय हे देवाचे शरीर असल्याने त्यात कोठेही उणीव, कमतरता राहू नये ही स्थपतीची इच्छा असते.

• • •

*With Best Compliments From*

**Smt. Mishra Neera Dayashankar**

Narendra Apts. 1st floor,
Room No. 104 & 105,
Mumbra,
Thane - 400 612.

With

Best

Compliments

To

STUDENTS, FACULTY

&

MANAGEMENT

OF

VIDYA PRASARAK MANDAL

THANE

*From*

- A Well Wisher

# मन आणि शरीर

श्री. व. वि. अकोलकर - श्री. धुं.हृ. बेडेकर

मन अथवा चित् (consciousness) हे इंद्रियगम्य नाही, विचार कल्पना, संकल्प, हेतू इत्यादि मनोव्यापार रूढ वस्तुनिष्ठ वैज्ञानिक पद्धतीने अभ्यासता येत नाहीत असे प्रतिपादन करून १९०८ पासून J.B. Watson यांनी 'मनावाचूनचे मनोविज्ञान' रचण्याचा प्रयास केला व 'मनोविज्ञान म्हणजे वर्तनाचे विज्ञान' अशी व्याख्या करून वर्तनवादी संप्रदाय ( Behaviourism) सुरू केला. 'वर्तना'ची कारणीमीमांसा बाह्य उद्दीपके (stimuli) . मज्जासंस्था व मेंदू व अंतःस्रावी ग्रंथीचे स्राव या परिभाषेत करण्यात येऊ लागली. पाश्चिमात्य वैद्यकातही शरीर हे एक यंत्र आहे ही कल्पना मूळ धरू लागली.

परंतु, शरीरात कोणताही बिघाड (organic disorder) नसता कार्यांच्या बाबतीत मात्र बिघाडाची (functional disorder) उदाहरणे तात्पुरते अंधत्व, बहिरेपण, लुळेपणा, इत्यादी १९१४ ते १९१८ च्या महायुद्धाचे काळात रणांगणावरील सैनिकांच्या बाबतीत आढळून येऊ लागली. तेव्हा 'मना'ची दखल घेणे भाग पडू लागले व केवळ वर्तनवाद संपुष्टात येऊ लागला.

मनाचे सामर्थ्य महत्त्वाचे मानले गेलेले आहे. मनाची शक्ती व मनाचे स्थलकाल निरपेक्षत्व भारतीय दर्शनांमध्ये व आध्यात्मिक वाङ्मयात वर्णन केलेले आढळते. भारतीय वैद्यकातही मनास महत्त्वाचे स्थान आहे. आता गेल्या काही दशकांपासून पाश्चिमात्य वैद्यकही ते स्वीकारू लागले आहे. 'मनोदैहिक विकार' (Psychosomatic) ह्या संकल्पनेत मनाचा प्रभाव अभिप्रेत आहे. मनाचा शरीरावर प्रभाव संमोहनप्रयोगांमध्ये दिसून आलेला आहे. मनाचे स्थलकाल निरपेक्षत्व मानससंक्रमण व अतींद्रिय संवेदन (E S P) विषयक प्रयोगाद्वारे सिद्ध झाले.

शुभविचारांचा आरोग्यावर हितकर परिणाम होतो व अशुभ विचारांचा प्रतिकूल परिणाम होतो हे सत्य वैद्यकशास्त्रात मान्यता पावू लागले आहे. [१]

The Future of the Body (१९९२) या लेखात Michel Murphy यांनी म्हटले आहे की, 'पंचज्ञानेंद्रिंया व्यतिरिक्त असे काही तरी आहे की ज्याच्यायोगे कोणत्याही ऊर्जास्रोतांचे संक्रमण होऊ शकते व त्या संक्रमणाचा सदुपयोग व दुरुपयोगही होऊ शकतो, असे जवळ जवळ सर्व परंपरागत धर्म मानतात.' त्या ऊर्जा संक्रमणाचा दुरुपयोग केल्यास इतरांवर हानिकारक परिणाम होतो असे वैज्ञानिक संशोधनही दर्शवीत आहे.

भावनिक संघर्ष, तत्त्व, चिंता इ. मानसिक कारणांमुळे अनेक प्रकारचे शारीरिक विकार (Psychosomatic diseases) होतात. [२]

स्वप्नाचा परिणाम शारीरिक पातळीवर होऊ शकतो. तोही मनाच्या शरीरावरील प्रभावाचा पुरावा ठरतो. डॉ. जे.बी. ऱ्हाईन (Rhine) यांच्या एका मानसशास्त्रज्ञ मित्राने त्यांना सांगितलेला अनुभव असा : स्वप्नात ह्या मानसशास्त्रज्ञाच्या पाठीवर कोरडे ओढले जात होते. त्याच्या कण्हण्यामुळे त्याची पत्नी जागी होऊन तिने त्याला उठवले. त्याला वेदना होतच होत्या. तिने त्याची पाठ पाहिली तो पाठीवर लालपांढरे वळ होते. मनाने चोप कसा काय दिला हे त्या मानसशास्त्रज्ञास सांगता येईना. [३]

मनाचा शरीरावर प्रभाव : संमोहनाधारित पुरावा

संमोहनाची सूचना व्यक्ती स्वीकारते व ती स्वयंसूचना बनते तेव्हा विलक्षण प्रकार घडू शकतात. ज्ञानेंद्रियांची एरवीची संवेदनक्षमता लोप पावते, वेदना नाहीशा होतात. संमोहनपूर्वक वेदनारहित शेकडो शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. वेदनारहित प्रसूतिसाठीदेखील संमोहन शास्त्र वापरले जाते. म्हणून तर १९५१ व १९५७ मध्ये अनुक्रमे ब्रिटिश मेडिकल असोसिएशन व अमेरिकन मेडिकल असोसिएशन यांनी हिप्नॉटिझमला मान्यता दिली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही (WHO) संमोहन हे शास्त्र म्हणून मान्य केले आहे. मनाने स्वीकारलेल्या संमोहन सूचनांचा परिणाम म्हणून संमोहकाचे सुचविलेल्या जागी जखम निर्माण झाली, फोड आले, मस फुटले अशी उदाहरणे

नमूद आहेत. जखमेतून होणारा रक्तस्राव, उमटलेले मस व फोड पाहता पाहता नाहीसे झाल्याचीही उदाहरणे नमूद आहेत [४]

### मन व शरीरस्वास्थ्य

मानसिक घटकांचे व्यक्तीच्या शरीरांतर्गत प्रक्रियांवर व पर्यायाने शरीरस्वास्थ्यावर जे अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होऊ शकतात त्यांचे दोन वर्ग करता येतात.

१) खुद्द व्यक्तीची मनःस्थिती, भावना, विचार, कल्पना, समजुती, श्रद्धा-अश्रद्धा इत्यादींमुळे तिच्या आरोग्यावर होणारे परिणाम (Intra personal effects). (त्यांची कारणमीमांसा मेंदूकडून मज्जासंस्थेकडे जाणारे संदेश, स्वायत्त मज्जासंस्थेद्वारा हृदय अंतस्रावी ग्रंथी इत्यादींच्या परिभाषेत अर्थात भौतिक व शरीरशास्त्रीय परिभाषेत करता येते.)

२) इतर व्यक्तीं च्या मनाचा-विचार, भावना, चित्तवृत्ती, इच्छा वगैरेंचा परिणाम अर्थात आंतर्व्यक्तिक स्वरूपाचे परिणाम (Interpersonal effects) रुग्णाच्या सांनिध्यात वावरणाऱ्या व्यक्ती, रुग्णास तपासणारे डॉक्टर इत्यादींचे परिणाम या सदरात पडतात म्हणून ते स्थानिक स्वरूपाचे (Local interpersonal effects) होत.

दूर अंतरावरील व्यक्तीच्या मनाचा, विचारांचा, भावनांचा, हेतूंचा, वगैरेंचा अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम माणसांवर होत असेल तर तो परिणाम स्थूल निरपेक्ष आंतर्व्यक्तिक परिणाम (Nonlocal -Interpersonal effets) या सदरात पडेल.

दूरवरील व्यक्तीच्या मनाचा रुग्णावर परिणाम होण्याची शक्यता आधुनिक (पाश्चिमात्य) वैद्यक विचारात घेतांना दिसते. ह्या शक्यतेच्या बाजूने भरपूर पुरावा आहे. दूरस्थ व्यक्तींच्या शुभचिंतन, प्रार्थना वगैरेंचा अनुकूल शारीरिक परिणाम घडून येऊ शकतो इतके मानण्यास कांही डॉक्टर तयार असतात. परंतु दूरस्थ व्यक्तींच्या दुष्ट विचारांचा, दुष्ट भावनांचा व हेतूंचा हानिकारक परिणाम होण्याची शक्यता मात्र विचारात घेण्याची त्यांची तयारी नसते. पहिली शक्यता विचारात घेण्याची तयारी व दुसरी शक्यता विचारात घेण्याबाबत मात्र नाखुषी, असे कां, हा तर्कसंगत प्रश्न मनांत येतो.

### व्यक्तीच्या मनोवस्थेचा तिच्या शरीरावर परिणाम

जिवलग व्यक्तीच्या अचानक मृत्यूचे वृत्त ऐकताच आप्त त्या मानसिक आघातामुळे मृत्यू पावल्याची उदाहरणे वैज्ञानिकांनीही नमूद केलेली आहेत. [५]

दृष्टीस पडलेल्या घटनेचे प्रतिकूल अर्थ लावून आता कोणकोणते अनिष्ट परिणाम होणार याचा भीतियुक्त मनाने विचार करीत बसणाऱ्यांच्या शरीरांतर्गत प्रक्रिया नकारात्मक व बाधक स्वरूपाच्या होऊ शकतात; नैराश्य, विषण्णता, असहायताभाव वगैरे नकारात्मक भावनांचा परिणाम अनिष्ट होतो हे सत्य आहे.

"मी आणखी दहाच वर्षे जगणार" असे मनाने घेतलेल्या व्यक्तींची प्रत्यक्ष मृत्यूसंख्या व नकारात्मक वृत्ती असलेल्यांची संख्या या दोहोंमध्ये सहसंबंध (Correlation) असल्याचे २३००० व्यक्तींचा समावेश असलेल्या Yale Medical School (YSA) ने केलेल्या एका पहाणीत आढळून आले आहे. [६]

नकारात्मक भावनांचा उद्रेक साधी डोकेदुखी किंवा जठरव्रण ह्या सर्वसाधारण व्याधींपेक्षां आणखी कितीतरी घातक व्याधींचे कारण असू शकते असे दिसून आले आहे. [७]

### प्रायोगिक पुरावा :

खुद्द रुग्णाच्या सकारात्मक किंवा नकारात्मक विचारांचा, कल्पनांचा, भावनांचा, श्रद्धाअश्रद्धांचा त्याच्या शरीरस्वास्थ्यावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होतो. याची प्रयोगसिद्ध उदाहरणेही आहेत. कर्करोगरुग्णावर रासायनिक उपचार (केमोथेरॅपी) चालू होता. त्याच्याच जोडीस त्यांना 'प्लॅसिबो' म्हणजे औषध नसलेल्या गोळ्या देण्यात आल्या. त्या घेतल्यावर १/३ रुग्णाना मळमळू लागले; १/५ जणांना वांत्या होऊलागल्या; व सुमारे १/३ जणांचे केस गळू लागले. [८]

दुसऱ्या एका प्रयोगात, कर्करोगाच्या रुग्णांना तशाच फसव्या गोळ्या (प्लॅसिबो) दिल्या. प्रतिजैविके (antibiotics) दिली जात आहेत अशी रुग्णांची समजूत

होतो. त्या समजुतीचा परिणाम म्हणून स्ट्रेप्टोमायसिनची अनिष्ट परिणामलक्षणे व आनुवंशिक परिणामही दिसून आला (उदा. श्रवणशक्ती कमी होणे.) एका रुग्णास तर मळमळू लागले, चक्कर आली, रक्तदाब कमी झाला व अंग पिवळे पडले. हा केवळ समजुतीमुळे झालेला परिणाम होता. [१]

मनाने करून घेतलेल्या कल्पनांच्या परिणामांची पुढील दोन उदाहरणे उद्बोधक आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जेफरसन तसेच जॉन अॅडॅम्स यांच्या मनाने घेतले की ४ जुलै १८२६ रोजी स्वतःचा मृत्यू होणार. बरोबर त्याच दिवशी ते मृत्यू पावले.

**समीपस्थ व्यक्तीच्या भावनांचा दुसऱ्यावर परिणाम**

**(Local inter personal effects ) :**

संनिध असलेल्या व्यक्तीच्या संतापाचा परिणाम (मानससंक्रमणामुळे)दुसऱ्या व्यक्तीवर होऊ शकतो ह्याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्णजे जॉर्ज बर्नाड शॉ यांनी स्वतः निवेदन केलेला अनुभव होय. अॅरेन बॉल्ड हे Telepathy & Medical Psychology (१९४७) चे लेखक. डॉ. John Ehrenwald ह्यांना लिहिलेल्या पत्रात कळविलेला तो अनुभव Tomorrow ह्या नियतकालिकांत Ehrenwald ह्यांनी प्रसिद्ध केला आहे. शॉ यांनी लिहिले की ' लंडन येथील किंग्ज कॉलेज मध्ये माझे व्याख्यान होते. माझी स्वतःची प्रकृती व वृत्ती प्रसन्न होती. (व्याख्यानानंतर) मी जाण्यासाठी उठलो. आणि एका एकी माझ्या पाठीच्या कण्यांत विलक्षण वेदना होऊं लागल्या. श्वास घेणे देखील मुष्किल झाले. प्रकृती धडधाकट होती व तो प्रकार होण्याजोगे इतर कोणतेही दृश्यकारण नव्हते. (माझी) यातना व व्याकुळता लपविता येणे कठीण झाले. पुढे ह्या व्यासपीठावर माझ्या विरोधांत असलेली एक प्रतिष्ठित स्त्री बसली होती. माझी काही विधाने तिच्यावरचा प्रखर हल्ला होता. ती क्रोधाने जळत होती. द्वेषाने जळफळत होती. तिच्या निःशब्द शापाच्या विषारी ज्वाळांचे संक्रमण झाले. हा प्रकार म्हणजे केवळ Telpathy ची प्रक्रिया होती. Telepathy ची मला आलेली ही प्रचीती मी विसरू शकत नाही.

रुग्णावरही निकटवर्ती व्यक्तींच्या मनाचा-भावनांचा शारीरिक परिमाण होत असतो. रोग्याच्या जवळपासच्या व्यक्तींचे विचार व भावना त्यांच्या बोलण्या-वागण्यातून व्यक्त होत असतात, व आपल्यास वाटते त्यापेक्षां त्याचे गंभीर परिणाम रोग्याच्या शारीरिक स्थितीवर होऊ शकतात. चांगल्या विचारांचा व भावनांचा अनुकूल , तर वाईट विचारांचा व भावनांचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. वैद्यकीय व्यवसायाच्या संदर्भातही ही गोष्ट लागू आहे. डॉक्टर व रुग्ण यांमधील भावनिक संबंध महत्वाचे असतात. तसेच डॉक्टरांची स्वतःची सकारात्मक अथवा नकारात्मक, अथवा संशयात्मक वृत्ती, नैराश्यवृत्ती, विषण्णता यांचा प्रभाव रुग्णाच्या तपासणीवर रोगनिदानावर आणि औषध योजनेवर पडू शकतो.

कर्करोग अथवा हृदयविकार असलेल्यांना डॉक्टर 'तुम्हाला आणखी पांच वर्ष५० टक्के धोका नाही' असा सद्हेतूने दिलासा देतात. परंतु ह्या बोलण्यामुळे ' माझी आता फार तर पाच वर्षे उरली आहेत.' अशी रुग्णाची समजूत होते व तिचा अनिष्ट परिणाम होऊ शकतो याचे भान डॉक्टर मंडळींनी ठेवणे महत्वाचे आहे.

रुग्णांना डॉक्टरांकडून मिळणाऱ्या औषधविषयक माहितीचाही परिणाम त्यांच्या शारीरिक अवस्थेवर होत असतो. Lymphnode स्वरूपाचा कर्करोग झालेल्या एका रोग्याने Krebiozen ह्या 'चमत्कारजनक' औषधविषयी ऐकले. वास्तविक त्या औषधाची परिणामकारकता सिद्ध झालेली नव्हती; परंतु तेच औषध द्या म्हणून रुग्णाने हट्ट धरला व ते देण्यात आले. रुग्णाचा लवकरच मृत्यू होणार अशी डॉक्टरांची धारणा होती परंतु १० दिवसांत कर्करोगाच्या गाठी तर बऱ्याच लहान झाल्या. पुढे दोन महिन्यांनी ते औषध परिणामकारी नाही हे त्या रुग्णाच्या वाचनात आले व पुन्हा त्या गाठी वाढू लागल्या व तो पुन्हा रुग्णालयांत दाखल झाला. 'पूर्वी दिलेले Krebiozen जुन्या साठ्यातील होते आतां नवीन झालेल्या साठ्यातले ते औषध देत आहोत.' असे डॉक्टरांनी त्याला सांगितले परंतु खरोखरी शुद्ध पाण्याची इंजेक्शने दिली. गाठी पुन्हा आक्रासू लागल्या व रुग्णाच्या प्रकृतीत कित्येक महिने सुधारणा दिसून आली. पुढे ते औषध निरुपयोगी असल्याचे राष्ट्रीय पातळीवरल संशोधनांनी प्रसिद्ध झाल्याचे त्या रुग्णास कळले व तो दोन दिवसातच मरण पावला. त्याच्या प्रकृतीतील बदल

दर्शवितात की रुग्णाने स्वतः करून घेतलेली समजूत असो अथवा दुसऱ्यांनी करून दिलेली समजूत असो तिचा अनुकूलप्रतिकूल परिणाम रुग्णाच्या शरीरावर होत असतो.[१०]

दूर अंतरावरील व्यक्तींच्या सुष्टदुष्ट भावनात्मक विचारांचा व्यक्तिंच्या शरीरावर परिणाम कसा होत असावा ह्या प्रश्नाबाबत भिन्नभिन्न उपपत्ती प्रस्तुत करण्यात आल्या आहेत. भौतिक ऊर्जेद्वारा होत असतील तर ती ऊर्जा नेमकी कोणत्या स्वरूपाची या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अद्यापि मिळालेले नाही.[११]

मानस संक्रमणाद्वारा घडू शकतात असे दर्शविणारी उदाहरणे ही आहेत आणि प्रायोगिक स्वरूपाचा पुरावाही आहे.[१२]

दूर अंतरावरील व्यक्तीच्या वाईट (दुष्ट) विचारांचा परिणाम 'लक्ष्य' व्यक्तीच्या शरीरावर होऊ शकतो काय हे प्रयोगाद्वारे पडताळून पहाण्याचा प्रयत्न अर्थातच नैतिक दृष्ट्या समर्थनीय ठरत नाही. प्राण्यांच्या बाबतीत प्रयोगिक पुरावा उपलब्ध आहे. व्यक्तींच्या दुष्ट विचारांचा परिणाम म्हणून 'लक्ष्य' प्राण्यांना जखमा झाल्या. कधीकधी प्राण्यांच्या मृत्यूही झाला, तर कधीकधी त्यांच्या चयापचय प्रक्रियेत बिघाड झाला असे Benor ह्यांनी नमूद केले आहे.[१३]

मानससंक्रमणाद्वारे अन्यत्र असलेल्या व्यक्तीच्या शरीरावर परिणाम (Telesomatic) घडून येऊ शकतात असे दर्शविणारी अनेक उदाहरणे जिव्हाळ्याच्या व्यक्तींच्या बाबतीत उपलब्ध आहेत. डॉ. श्रीमती Louisa Rhine यांच्या 'ड्यूक कलेक्शन' नावाने सुप्रसिद्ध असलेल्या संग्रहात विपुल उदाहरणे नमूद केलेली आहेत. Gurney, Myers व Podmore (१९८६) यांच्या संग्रहातील पुढील उदाहरणेही उद्बोधक आहेत : १)प्रसिद्ध चित्रकार आर्थर सेवर्स यांना निद्रानाशाचा विकार होता एके रात्री, पत्नी घरात झोपी गेली असता, एकाएकी तिच्या तोंडावर फटका बसल्यासारखे वाटून ती जागी झाली व तिला वेदना होऊ लागल्या पण ती न्याहारी करण्याच्या कामास लागली. तेवढ्यात, रक्ताळलेल्या तोंडावर रुमाल दाबून धरलेले सेवर्स घरी आले. झोप येत नव्हती म्हणून बाहेर पडून ते तळ्यात नांव चालवीत असताना शिडाच्या बांबूचा फटका त्यांच्या तोंडावर बसून तोंड रक्तबंबाळ झालेले होते २) आईस गुदमरल्यासारखे वाटू लागले व त्याच वेळी तिचे मूळ तळ्यात गटांगळ्या खात होते हे श्रीमती ऱ्हाईन यांनी उद्धृत केलेले उदाहरण अशाच स्वरूपाचे आहे.

मानससंक्रमणाद्वारे अन्यत्र असलेल्या व्यक्तीच्या शरीरावर मुद्दाम प्रयोगाद्वारे परिणाम घडवून आणता येत नाहीत हे खरे. पण म्हणून आपाततः घडलेल्या उदाहरणांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. वैद्यकीय नियतकालिके देखील अशा घटना प्रसिद्ध करू लागली आहेत. Journal of Medical Society (1947) मध्ये डॉ. बी. Swartz यांनी मातापिता व बालक यांच्या बाबतीत मानस संक्रमण मूलक शारीरिक परिणाम घडल्याच्या ५०४ उदाहरणांचा उल्लेख केला आहे.

मानससंक्रमणामुळे अन्यत्र असलेल्या व्यक्तीस अल्पकालिक शारीरिक विकृती उद्भवल्याची उदाहरणे आहेत. रणांगणावरील एका सैनिकाचे पाय तुटले त्याच वेळी त्याच्या आप्तास लकव्याचा झटका आला; एका गृहस्थाचा हात अपघातात मोडला त्याचवळी घरी पत्नीचा हात एकाएकी बधिर झाला. अशा प्रकारची उदाहरणे आहेत. एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत अशा घटना वारंवार घडल्या तर तिला भीती बसून तिचे शरीरस्वास्थ्य ढासळण्याची शक्यता असते.

मानससंक्रमणामुळे शरीरास अपायकारक परिणामही घडून आल्याची उदाहरणे असल्यामुळे पुढील प्रश्न साहजिकच मनात येतो. अन्यत्र असलेल्या एकाद्या निरपराध व्यक्तीवर दुष्ट हेतूने हानिकारक स्वरूपाचे प्रकार मानस संक्रमणाद्वारे घडवून आणता येत असतील काय ?

मानववंशशास्त्रज्ञांची निरीक्षणे :

वस्तीतील कोणी मृत्यू पावले तर त्याच्या मृत्यूची इच्छा कोणी केली होती याचा तपास लोक करु लागतात अशा जमातींचा उल्लेख मनोविश्लेषक डॉ. Jule Eisenbud यांनी केला आहे. दुष्ट हेतू मनात बाळगून दूरवरच्या व्यक्तीस हानी पोचवता येते असा विश्वास असलेले सांस्कृतिक समूह आहेत. पॉलिनेशिया प्रदेशात 'मृत्यूला आवाहन' नावाची

एक परंपरागत गूढविद्या होती व पुढे ती विद्या हवाई बेटांमध्ये प्रसार पावली. हवाई बेटांवर शिक्षकाचा पेशा स्वीकारुन Freedman Long या अमेरिकन मानसशास्त्रज्ञांनी तेथील रूढीसंबंधी मिळविलेल्या माहितीची खात्री करून घेऊन ती त्यांच्या Secret Science Behind Miracles (1976) या ग्रंथात दिली आहे : "Shaman" म्हणून काम करणाऱ्या तेथील व्यक्ती दुसऱ्या बेटावरील निढावलेल्या समाजकंटकास नाहीसे करण्याच्या हेतूने मृत्युदेवतेची प्रार्थना करुन त्याचा बळी घेत. दूरच्या बेटावरील त्या समाजकंटकाचे पायाचे तळवे प्रथम बधिर होत, नंतर सारे शरीर बधिर होऊन, अखेरीस श्वास घेणे कठिण होऊ व तो मृत्यू पावे.

विषारी सूक्ष्मजीवाणूमुळे आतड्यातील, तसेच फुफुसातील ज्या रोगांची कारणे अद्यापी अज्ञात आहेत त्यांच्या मुळाशी दूरवरुन केलेली 'करणी' असू शकेल काय असे डॉ. Larry Dossey विचारतात. ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील 'जिवारो इंडिअन्स' मध्ये मिळून मिसळून राहून Michael Harner या मानववंशशास्त्रज्ञांनी त्यांची निरीक्षणे १९९० मध्ये प्रसिद्ध केली आहेत. त्यानुसार तेथील Shamans स्वतःच्या सुरक्षिततेसाठी म्हणून 'Hexing' नामक मारक तंत्राचा अवलंब 'लक्ष्य व्यक्तीला' (Target Person) कळणार नाही व अर्थातच ती व्यक्ती सूड घेणार नाही अशा युक्तीने करतात. Halifax-Grof तसेच Kalweit यांनीही मानवसमूहांविषयीची माहिती आणि वैद्यकीय संदर्भ यांच्या आधारे म्हटले आहे की 'व्यक्तीवर हानिकारक परिणाम दूर अंतरावरुन घडवून आणता येतात (1974; 1980)

मनःप्रभावाचे प्रायोगिक पुरावे :

सामान्य माणूस संकल्प बलाने, ३०फूट अंतरावरून देखील पडत्या फाशांवर परिणाम घडवून आणू शकतो असे प्राणिशास्त्रज्ञ डॉ. कॅरोल बी. नॅश यांनी १९४६ मध्ये प्रयोगाद्वारे दाखवून दिले होते. [१४]

वनस्पतींच्या वाढीवर व्यक्तीच्या मनाचा परिणाम ५ फुटापासून तो १५ मैल अंतरावरून देखील होऊ शकतो असे J. Barry यांच्या प्रयोगांमध्ये दिसून आले आहे. [१५]

डॉ. नॅश यांनी प्रयोगाद्वारा दाखवून दिले आहे की इच्छासंक्रमणाद्वारे दूर अंतरावरील रोपांची जोमदार वाढ इच्छाबलाने होऊं शकतो अथवा वाढ खुंटू शकते [१६]

व्यक्तीच्या 'वाईट नजरेने' वनस्पती कोमेजतात तर कांही व्यक्तींच्या सांनिध्यात वनस्पती तरारतात या अनुभवावर आधारलेल्या समजुतीस हे प्रयोग पुष्टी देतात. Luther Burbank नामक गृहस्थ स्वतःच्या असामान्य परासामान्य क्षमतेद्वारा वनस्पतींच्या सुमारे ८०० जाती निर्माण करू शकले व त्यांचे हे कार्य उद्यान विद्या (Horticulture) क्षेत्रात अजोड गणले गेले आहे. [१७]

मनुष्याच्या वाईट विचारांचा परिणाम सूक्ष्म जीवांच्या जैवरासायनिक प्रक्रियांवर व त्यांच्या वाढीवर जर दूर अंतरावरून होऊ शकतो, तर दूरवरील व्यक्तींच्या दुष्ट विचारांचा परिणाम इतराच्या शरीरांतर्गत जैवरासायनिक प्रक्रियांवर व प्रकृतीवर होत असण्याची शक्यता विचारात घ्यावयास हवी असे डॉ. लॅरी डॉसी यांनी म्हटले आहे. [१८]

आध्यात्मिकता व शरीरस्वास्थ्य :

याच संदर्भात डॉ. डॉसी यांनी पुढील गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. नित्यनियमाने प्रार्थना, धार्मिक क्रियाकर्म, मंदिरात जाणे, ध्यानधारणा, उपवास, यांसारख्या आध्यात्मिक गोष्टीमुळे रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग इत्यादीमध्ये सुधारणा झाल्याची उदाहरणे आढळून आली आहेत. १९व्या शतकातील वैद्यकीय तसेच धार्मिक वाङ्मयसाहित्यातून जे २५० हून अधिक संदर्भ डॉ. J.S. Levin यांनी एकत्रित केलेले आहेत ते आध्यात्मिक जीवनाचा शरीरस्वास्थ्यावर सुपरिणाम दर्शविणारे आहेत. [१९]

आध्यात्मिक भावभावनांच्या शरीरस्वास्थ्यावर होणाऱ्या परिणामांचे संशोधन सातत्याने झाले पाहिजे यावर डॉ. Levin यांनी भर दिला आहे. त्यांच्या मते आध्यात्मिक कृतींचा भावभावनांवर व त्या भावनांचा अनुकूल परिणाम रक्तदाब, स्पंदनावर व रक्ताभिसरणावर होतो. प्रार्थना सामूहिकरीत्या केली तर रुग्णांना एक प्रकारे सामाजिक आधारही मिळतो. वर निर्दिष्ट केलेल्या आध्यात्मिक गोष्टी व ईश्वरावर श्रद्धा यामुळे मानसिक आरोग्य सुधारते हे दाखविणारे लेख १९७९ पासून Archives of General Pschiatry मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. वरील गोष्टी शारीरिक स्वास्थ्याच्या बाबतीतही उपकारक ठरल्याविषयीचे लेख

१९८० पासून Journal of Family Practice मधे आलेले आहेत.

मन यंत्रावर प्रभाव पाडू शकते ही गोष्ट पदार्थ वैज्ञानिक डॉ. Hein Schmidt यांनी Random Number Generator (स्वैर अंक देणारे उपकरण) वापरून केलेल्या प्रयोगांद्वारे दिसून आले आहे. [२०]

Princeton येथे Engineering Anomalies Reserch Laboratory मध्ये Random Event Generator नामक उपकरणाच्या साहाय्याने R.G. John व Bendra Dunne यांनी केलेल्या प्रयोगांवरून दिसून आले आहे की प्रयुक्त व्यक्ती मनात आणील त्यानुसार तिच्या समोरच्या पडद्यावर येणाऱ्या प्रकाशरेषा मध्यबिंदूच्या डाव्या किंवा उजव्या भागात नेऊ शकते. आता, व्यक्तीच्या मनाचा प्रभाव जर यंत्रावर पडू शकतो तर मग जिवंत अशा मानवी शरीरयंत्रातील प्रक्रियांवरही पडू शकतो असे मानण्यात गैरवाजवी काय आहे हा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. W.G. Braud व M.S. Schlitz यांनी शेकडो शोधनिबंधांचा परामर्श घेऊन दाखवून दिले आहे की दूर अंतरावरून जीवजंतू, उंदीर, कोंबड्यांची पिले, कुत्री, मांजरे, वाळवी इत्यादींवर परिणाम घडवून आणता येतो. 'लक्ष्य' (Target) जर मनुष्य असेल तर त्याच्या डोळ्यांची हालचाल, त्वचेचा विद्युतअवरोध, Piethysmo श्वासोच्छ्वासाची गती, मेंदूतील लहरींचा लय वगैरे दूरवरुन प्रभावित करता येतात. [२१]

हल्ली पदार्थवैज्ञानिक अणुपरमाणू दूर अंतरावरुन प्रभावित करण्याचे प्रयोग करीत आहेत. तर मग, जैविक तसेच मानसिक क्षेत्रांत दूर अंतरावरून प्रभाव पडण्याची संभवनीयता अभ्यासण्यास प्रत्यवाय नसावा. [२२]

व्यक्तीच्या शारीरिक स्वास्थ्यावर, विचार, भावभावना, इच्छा या मानसिक घटकांचा दूर अंतरावरून देखील परिणाम घडून येऊ शकतो असे मानणारी संशोधक मंडळी हानिकारक परिणामांची संभवनीयता विचारात घेण्यास मात्र नाखूष असतात. त्यामुळे या शक्यतेकडे जितके लक्ष द्यावयास हवे तितके दिले जात नाही. परंतु मानवशास्त्र, मानववंशशास्त्र, दंतकथा, चिकित्सालयीन पुस्तके आणि प्रायोगिक स्वरूपाचे पुरावे लक्षात घेतले तर दूर अंतरावरून शारीरिक/मानसिक आरोग्यास हानिकारक परिणाम घडून येण्याची शक्यता, अर्थात ती 'काळी बाजू' (Dark side) नजरेआड करुन चालणार नाही. ही शक्यता वैद्य मंडळींनी विशेष लक्षात घेतली पाहिजे कारण, 'मनोदैहिक' सदरांत पडणाऱ्या डोकेदुखी, पाठदुखी व अन्य सौम्य विकारांना शारीरिक/मानसिक ताणतणाव कारणीभूत असल्याचे निदान (डायग्नॉसिस) केले जाते खरे, परंतु ते अपुरे असण्याची बरेचदा खुद्द डॉक्टरांनाच जाणीव असते.


१) प्रमुख संदर्भ : Dr. Larry Dossey : Healing and the Mind : Is there a Dark Side ? (Journal of Scientific Exploration (1994) अन्य संदर्भ तळटीपांमध्ये )

२) उदा. इसब, पेटके, पाठदुखी, सांधेदुखी, दमा, जठर व्रण, कोलायटिस, हृदयविकार इत्यादि.)

३) J.B. Rhine : New World of the Mind (1953/1967)

४) E.J. Dingwall (ED) : Abnormal Hypnotic Phenomena. 4 Volumes 1967

५) American Journal of Psychiatry (1980) Annals of Internal Medicine (1974)

६) Idler & Kasls (1991) : Journal of Gerontology

७) Engel & Lown (1980) American Journal of Psychitriy

८) Fielding, in World Journal of Surgery (1983)

९) Journal of American Medical Association (1954) : British Stomach Cancer group.

१०) B. Klopfer (1987) Journal of Projective Therapy.

११) Achterberg (1985, 1992) - The Foundation for Transpersonal Medicine

१२) Benor D.J. (1990) Complementary Medical Research

Solfvin J (1984) Advance in Parapsychology Vol. 4

१३) Benor D.J. (1986) : Research In Psychic Healing

Current Trends in PSI Reserch

१४) Journal of Parapsychology - 1946

१५) Journal of Parapsychology - 1968

१६) Journal of American Society for Psychical Research 1982; 1984

१७) J. Benor (1990) Contemporary Medical Research

१८) J.S. Levin (1993) Explanations for the findings linking Spirtuality & Health.

१९) J.S. Levin (1993) Epidemiology of Religion, Journal of Religion & Health.

२०) Journal of Parapsychology - 1969

२१) Consciousness Interactions with Remote Biological systems (1991)

National Institute of Health च्या Alternative Medicines च्या कार्यालयाचा Mind-Body Interactions संबंधीचा अहवाल.

• • •

(पृष्ठ क्र. ७ वरून)

**Sports & Pastimes in Ancient India**

Leela and Kreeda, which give birth to creativity and pleasure. Play is something spontaneous, unorganised. Commercial and technological pressure are turning modern sports into a ruthless, competitive industry. Violence and use of drugs seen in today's sports are inevitable outcomes of this approach. We, in our history have the example of Dyuta which all wise people have advised to resist the temptation of.

Your papers today, which really amount to time-travel, are going to be a fitting reply to all these unfounded, unscientific and ignorant writings on the history of sports and pastimes in Ancient India.

• • •

*With Best Compliments From*

**Cheeran Developers**

16, Dreamland,

A, Soaras Road,

Chembur, Mumbai - 400071.

*With Best Compliments From*

Shri Madhukar D. Soman

Velankar Wada,

Brahmin Society,

Naupada, Thane (W) - 400 602

With

Best

Compliments



*From*

***Dr. JYOTSNA THAKUR***

' DIVYA' CLINIC

ROAD 16, WAGALE ESTATE

THANE

## श्री. मोहन पाठक

महाविद्यालयाच्या परिसरामध्ये आकार घेत असलेल्या रस्त्यांनी परिसराचे रूपच पालटून टाकले आहे. दोन महिन्याच्या सुटीत या रस्त्यांच्या कामाची वर्दळ सोडल्यास विद्यार्थ्यांची वर्दळ फारशी नव्हती. विद्यापीठाच्या परीक्षा, प्रथम, द्वितीय वर्षाचे निकाल अशा निमित्तानिमित्ताने विद्यार्थ्यांचे घोळके दिसत, पण या नैमित्तिक वर्दळीशिवाय परिसर एकूण शांतच होता. आता बारावीचे निकाल लागले आहेत व कॉलेज सुरू होण्याच्या मार्गावर लागले आहे. तेव्हां परत परिसर फुलून जाताना दिसतोय. काही नवे चेहरे, कांही प्रश्नांमध्ये गुंतलेले चेहरे, कधी विद्यार्थी तर कधी पालक... जणू दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर परिसरात चैतन्य जागं झालं आहे.

**व्यवस्थापन अभ्यास केंद्र**

दरम्यान आमच्या परिसरातील जिन्याजिन्यांच्या इमारतीत असणाऱ्या व्यवस्थापन अभ्यास संस्थेने सुटी होण्यापूर्वी या शाखेतील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा दोन व्याख्यानांचे संयोजन केले होते. संस्थेच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या व्याख्यानांपैकी पहिले व्याख्यान 'मुलाखतीची तंत्रे' या विषयी होते. 'टाटा युनिसिस' चे संचालक श्री. के. पी. भालेराव यांनी विद्यार्थ्यांना या विषयासंदर्भात उपयुक्त माहिती दिली. त्यांच्या व्याख्यानांबरोबरच तीन अभिरूप मुलाखतींचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, कार्याध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर व कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू उपस्थित होते.

'हिंदुस्थान सीबा गायगी' चे उपाध्यक्ष श्री. एस्.राजगोपालन यांचे आजच्या स्पर्धात्मक युगात आपला व्यवसाय यशस्वी कसा करावा या विषयासंदर्भात व्याख्यान झाले. प्रा. व्ही. एस्. भाकरे यांचे याबाबत मोलाचे सहकार्य लाभले. दोन्ही व्याख्यानांना असणारी विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यंत लक्षणीय होती. व्यवस्थापन संस्थेचे संचालक प्रा. भालचंद्र दाते यांचे मार्गदर्शन या संयोजनास लाभले होते.

या व्याख्यानांबरोबरच या संस्थेच्या २५ शिक्षकांची सहल केळवे माहीम येथील निसर्गसौंदर्याने नटलेल्या सागरतीरावर नेण्यात आली होती, हेही महत्त्वाचे. संचालक प्रा. दाते यांचाही सहलीत सहभाग होता.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

बारावीचा निकाल सात जून रोजी जाहीर होणार असल्याची बातमी आली आणि मार्च ९७ ला बारावीला बसलेले विद्यार्थी 'फुल टेंशन' मध्ये आले. सात जूनला दुपारी निकाल जाहीर झाला. यात आमच्या बांदोडकर महाविद्यालयाचा सौरभ कांडपाल ६०० पैकी ५३३ गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला. आमच्या महाविद्यालयाचा निकाल ९५.१७ % इतका लागला. या परीक्षेस बसलेल्या आमच्या ३७३ विद्यार्थ्यांपैकी ३५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यासह ८६ प्रथम वर्गात, १६५ द्वितीय वर्गात, तर ८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण श्रेणीत १७ विद्यार्थी आहेत.

महाविद्यालयातून दुसऱ्या क्रमांकाने हृषिकेश देरेकर (६०० पैकी ५२१) तर तृतीय क्रमांकाने अनुराधा वैद्य (६०० पैकी ५१९) हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तेजस नेवरेकर व संकेत मालवे या दोघांना गणितात पैकीच्या पैकी गुण मिळाले.

या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. मकरंद दीक्षित व पर्यवेक्षक एस्.डी. अत्तरदे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

**आर्.टी. - नवे पर्यवेक्षक**

कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. एस्.डी. अत्तरदे यांची पर्यवेक्षकपदाची मुदत संपल्याने या नवीन शैक्षणिक वर्षापासून पर्यवेक्षक म्हणून गणिताचे प्रा. आर्.टी.

कुलकर्णी काम पाहतील. आर्.टी.चे अभिनंदन!

**तृतीय वर्ष विज्ञान-निकाल**

'दिशा' साठीचे वार्तापत्र लिहून पूर्ण होत असतानाच मुंबई विद्यापीठाच्या मार्च ९७ च्या तृतीय वर्ष विज्ञान परीक्षेचा (बी.एस्.सी.) निकाल जाहीर झाला. आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा निकाल ९०.४५ % इतका लागला. विषयवार या निकालाचा तपशील पुढीलप्रमाणे.

| विषय | प्रथम वर्ग | द्वितीय वर्ग | उत्तीर्ण | एकूण |
|---|---|---|---|---|
| गणित | २ | ६ | १ | ९ |
| पदार्थविज्ञान | १३ | १९ | - | ३२ |
| रसायनशास्त्र | ६७ | ३८ | - | १०५ |
| संख्याशास्त्र | ९ | १० | - | १९ |
| वनस्पतीशास्त्र | ६ | ६ | - | १२ |
| प्राणिशास्त्र | १२ | १० | - | २२ |
| | १०९ | ८९ | १ | १९९ |

२२ विद्यार्थी परीक्षेस उपस्थित राहिले नाहीत वा अनुत्तीर्ण झाले. त्यामुळे २२१ विद्यार्थ्यांपैकी १९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रत्येक विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे व गुण पुढील प्रमाणे आहेत.

१) मनाली सु. वाघ संख्याशास्त्र ८०० पैकी ६७१ गुण
२) प्रतिभा सी. सारं ग रसायनशास्त्र ८०० पैकी ६६० गुण
३) तुषार ना.आठव ले पदार्थविज्ञान ८०० पैकी ५८७ गुण
४) शिल्पा ग. तांबे वनस्पतिशास्त्र ८०० पैकी ५६९ गुण
५) ज्योती र. टोपे प्राणिशास्त्र ८०० पैकी ५५५ गुण
६) सुशील अ. डिचवलकर गणित ८०० पैकी ४९७ गुण

महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील व उपप्राचार्य डॉ. सी. म. सारंग यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

**कला वाणिज्य महाविद्यालय**

बारावीच्या मार्च ९७ मध्ये झालेल्या परीक्षेत कला महाविद्यालयाचा निकाल ६५.५९ % तर वाणिज्य महाविद्यालयाचा निकाल ८८.७८ % इतका लागला. या महाविद्यालयांमधून प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या सर्व विद्यार्थिनी असून त्यांची नावे पुढील प्रमाणे -

**कला महाविद्यालय -**

प्रथम क्रमांक - मृदुला म. परांजपे ६०० पैकी ४४३ गुण
द्वितीय क्रमांक - पूनम र. अनवेकर ६०० पैकी ४११ गुण
तृतीय क्रमांक -वैशाली सु. करपे ६०० पैकी ४०३ गुण

**वाणिज्य महाविद्यालय -**

प्रथम क्रमांक - स्मृती स. मराठे ६०० पैकी ४५४ गुण
द्वितीय क्रमांक - शर्मिष्ठा श्री. जोशी ६०० पैकी ४५३ गुण
तृतीय क्रमांक - मुग्धा स. वागळे ६०० पैकी ४४६ गुण

प्राचार्य स.वा. गोखले यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

**शालेय परिसरातील वार्ता**

डॉ. बेडेकर विद्यामंदिराच्या प्राथमिक विभागाने एक घरगुती सत्कार सोहळा आयोजित केला होता. वयाची ८० वर्षे पूर्ण केल्याबद्दल विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर व कार्यकारिणी सदस्य श्री. द. वा. खर्डे यांचा तर वयाची ७० वर्षे पूर्ण केल्याबद्दल मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर व श्री. मा. ना. पाटील यांचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. या अनौपचारिक सत्कार समारंभास विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू, कोषाध्यक्ष श्री. वि. ना. मराठे, श्री. दिलीप जोशी, सौ. सुमेधा बेडेकर, श्री. प्र. ग. वैद्य, श्री. स. वि. सहस्रबुध्दे आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहोळ्यानंतर मराठी वाद्य वृंदाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. स्मिता महाडीक प्रदीर्घ सेवेनंतर एप्रिल अखेरीस निवृत्त झाल्या. त्याचबरोबर माध्यमिक विभागातील जुने शिक्षक श्री. अ.कृ. खरे व सौ. लता अनंत सहस्त्रबुध्दे या ही आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या.

## सहवेदना



अर्चना पैसास

तृतीय वर्ष या वर्गात रसायनशास्त्राचा अभ्यास करणारी कु. अर्चना पैसास हिचा अकाली मृत्यू आम्हा सर्वांना विलक्षण सुना करून गेला. अर्चना गेली दोन वर्षे असाह्य रोगाशी झगडत होती. तिला लागणाऱ्या पुस्तकांसाठी तिची आई ग्रंथालयात मला दोन तीनदा भेटायला आली होती.

विज्ञानशाखेत असल्याने महाविद्यालयाचे भरगच्च वेळापत्रक सांभाळत मन लावून अभ्यास करीत जिद्दीने अर्चनाने तिचे शिक्षण पूर्ण करीत आणले होते. गोड स्वभाव, जिद्द, अथकपणे काम करण्याची सवय हे सर्व अर्चनाचे विशेष आमच्या कायम स्मरणात रहातील.

महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य पाटीलसर व उपप्राचार्य डॉ. सारंगसर तिच्या पालकांना भेटून आले.

आमचे महाविद्यालय, विद्याप्रसारक मंडळ तिच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वर आत्म्यास शांती देवो !

• • •


विद्या प्रसारक मंडळास

हार्दिक शुभेच्छा !

**श्री. कमलाकर शंकर कोळी**


मुखपृष्ठ क्र. २ वरून

संपादकीय

### भारत-एक ठेंगू लोकांचा देश ?

अर्थव्यवस्था राबविणाऱ्या हाँगकाँग, सिंगापूर आणि जपानमधील ५ विद्यापीठे आहेत. चीनमधील पेकिंग विद्यापीठाचाही यामध्ये ७ वा क्रमांक आहे. भारतीयांना आपल्या भ्रष्ट राजकीय आणि सामाजिक नेतृत्वामुळे द्यावी लागणारी ही किंमत फार मोठी आहे. हवाला आणि घोटाळा प्रकरणांमध्ये या देशातील सर्व पक्षांच्या नीतिमत्तेचे वस्त्रहरण झालेले आहे. या भ्रष्ट लुटारूंनी जर भौतिक गोष्टींची लूट केली असती, तर ती केव्हातरी भरून काढता आली असती. पण स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार माजवून नीती, मूल्ये, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आघाड्यांवरही यांनी या देशाला गरीब करून टाकले. आजच्या सिनेमांतील गाणी, सिनेमासिकांमधील नग्न किंवा तत्सम उत्तेजक छपाई आणि सर्व चॅनेलवरील संगीत नृत्यांचे कार्यक्रम यांनी हिडीस आणि बीभत्सपणात नीचांक गाठला आहे. उच्च न्यायालयाने सदनिका वाटपातील दिल्लीमधील भ्रष्टाचार सप्रमाण सिद्ध केला. यातील जबाबदार व्यक्तींना शिक्षा करण्याचे दूरच राहो, मावळते राष्ट्रपती अध्यादेश काढून हे प्रकरण संपुष्टात आणतात, तेव्हा या राष्ट्राच्या पहिल्या नागरिकाची सदसद्विवेकबुद्धी पार नष्ट झाली आहे हे जाहीर होते. सर्वच राजकीय पक्षांना गोलमाल आणि बटीक राष्ट्रपती का हवा असतो, याचा उलगडा या उदाहरणातून होतो. निर्भय, चारित्र्यवान, कुठल्याही दडपणाला बळी न पडणाऱ्या, मिंधा न होणाऱ्या नागरिकाला या देशाचा राष्ट्रपती होणे अशक्य आहे हे आता सिद्ध झाले आहे. पन्नास वर्षांनंतर उंची वाढवण्याची आलेली चांगली संधी आपण वाया घालवली आहे. बुटक्यांच्या संस्था आणि आयुष्यही बुटकीच असतात.

• • •

With Best Compliments

From

**VISHAL SECURITY**

**&**

**FIRE SERVICES**

With Best Wishes

To

VIDYA PRASARAK MANDAL, THANE

*from*

**BOMBAY INTELLIGENCE SECURITY**

# 'दिशा' वर्ष क्र. ९ मधील लेखसूची



| क्र. | लेखाचे शीर्षक | पृ.क्रमांक | लेखक | अनु.क्र. व महिना |
|---|---|---|---|---|
| १ | अफवा,प्रवाद: सुरचना व गोंधळ (भाषा विचार ८) | ११ ते २३ व ३६ | वैद्य प्रकाश ल. | २/ऑगस्ट ९६ |
| २ | अभिमन्यूचे व्रत | ३१,३२ व ३९ | साने यशवंत रा. | ३/सप्टें. ९६ |
| ३ | आपल्या शिक्षणाची दिशा | २३ ते २५ व ३४ | तिनईकर सदाशिव | २/ऑगस्ट ९६ |
| ४ | आयू.एस्.ओ.९००० आणि आपली शिक्षणव्यवस्था, एक दृष्टिक्षेप | ४० ते ४२ व ५२ | टिळक अशोक गो. | १० /एप्रिल ९७ |
| ५ | आला संतांचा मेळा | ३ ३ ते ३६ | मठ शं.बा. | ८/ फेब्रुवारी ९७ |
| ६ | ऐ मेरे वतन के लोगो (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३ | | ८ /फेब्रुवारी ९७ |
| ७ | ऐंशी वर्षाच्या प्रक्षुब्ध तरुणाची गोष्ट | ३५,३६ | देवधर प्रभाकर शं. | २/ ऑगस्ट ९६ |
| ८ | ओळख आणि शोध | २३ ते २६ व २८ | प्रा(डॉ) बेडेकर वसंत ह. | १/ जुलै ९६ |
| ९ | कर्करोग व आर्थिक विचारप्रणाली (भाषाविचार ९) | ५ ते १६ व ३८ | वैद्य प्रकाश ल. | ९/मार्च ९७ |
| १० | कर्करोग : आर्थिक व राजकीय प्रणाली (भाषाविचार १०) | २५ ते ३३ | वैद्य प्रकाश ल. | १०/एप्रिल ९७ |
| ११ | कर्करोग : कारणे,प्रक्रिया व परिणाम (भाषाविचार ६) | ९ ते २० | वैद्य प्रकाश ल. | ६/डिसेंबर ९६ |
| १२ | कर्करोग व समाजजीवन (भाषाविचार ७) | १० ते २१ | वैद्य प्रकाश ल. | ७/जानेवारी ९७ |
| १३ | कथा आणि व्यथा डॉलीच्या जन्माची (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३, व ३९,४० | | ९/मार्च ९७ |
| १४ | कष्टाविण फळ ना मिळते | ३२ते ३५ | धोपाटे शशिकांत | ७/जानेवारी ९७ |
| १५ | ख्रिस्ताब्द की युगाब्द (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३ | | ३/सप्टेंबर ९६ |
| १६ | चित्रकार हुसेन यांची सरस्वती व द्रौपदी | २९ ते ३० | भागवत दुर्गा | ५/नोव्हेंबर ९६ |
| १७ | छंद-उपयुक्त वेडेपणा | २६ ते ३० | धोपाटे शशिकांत | २/ऑगस्ट ९६ |
| १८ | जनन भाषा (Genetic Code) : रचना आणि दोषपरिणाम (भाषाविचार-२) | १५ ते २२ | वैद्य प्रकाश ल. | २/ऑगस्ट ९६ |
| १९ | जादुगार : असे व तसे | ३७ ते ३९ | अकोलकर वसंत वि. | २/ऑगस्ट ९६ |
| २० | झेरॉक्सचे जनक व परामानसशास्त्र | ३५ ते ३६ | अकोलकर वसंत वि. | ३/सप्टेंबर ९६ |
| २१ | तथाकथित भानामतीचे प्रकार | २१ ते ३३ | अकोलकर वसंत वि. | ४/ऑक्टोबर ९६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | ''त्वचेसि चक्षुत्व आले'' | ३१ ते ३४ | अकोलकर वसंत वि. | ९/मार्च ९७ |
| २३ | दक्षिण भारतीय मंदिरे (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय ४) | ३१ ते ३४ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ६/डिसेंबर ९६ |
| २४ | दक्षिण भारतीय शैलीचा मंडप (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय ५) | २२ ते २९ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ७/जानेवारी ९७ |
| २५ | दक्षिण भारतीय शैलीचे देवालय (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय ६) | २४ ते २९ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ८/फेब्रुवारी ९७ |
| २६ | दक्षिण भारतीय शैलीचे देवालय (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय ७) | १७ ते २६ व ३८ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ९/मार्च ९७ |
| २७ | दिवंगत व्यक्तींकडून संप्रेषण : एक नमुनेदार प्रयोग | ३४ ते ३६ | अकोलकर वसंत वि. | ५/नोव्हेंबर ९६ |
| २८ | देवालयसंकल्पना (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय ८) | ३४ ते ३६ व ३८ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ९/मार्च ९७ |
| २९ | धर्म आणि शिक्षण | २७ ते २९ व ३७ | पराडकर मो.दि. | ३/सप्टेंबर ९६ |
| ३० | पर्यावरण : दिशा आणि दशा ? | ३१ ते ३४ | नवरे जाह्नवी | २/ऑगस्ट ९६ |
| ३१ | पूर्वसंचित ? | ३७ ते ३९ | अकोलकर वसंत वि. | १०/एप्रिल ९७ |
| ३२ | बाजीराव बाळाजी | २१ ते २६ | पराडकर मो.दि. | २/डिसेंबर ९६ |
| ३३ | बीज गर्भ, हस्तलिखित, वर्णसंयोजन यांतील दोषविचार (भाषाविचार४) | १५ ते २२ व ३३ | वैद्य प्रकाश ल. | ४/ऑक्टोबर ९६ |
| ३४ | ब्राम्हणु हिंडता बरा | २७ ते ३० व ३४ | बेडेकर वसंत | ९/मार्च ९७ |
| ३५ | भारतीय लोकशाही, वयात आलेली की वय झालेली ? (संपादकीय) | कव्हरपेज १ व ३३ | | १०/एप्रिल ९७ |
| ३६ | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१) | २३ ती २६ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ३/सप्टेंबर ९७ |
| ३७ | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (२) | २३ ते २८ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ४/ऑक्टाबर ९६ |
| ३८ | भारतीय स्वातंत्र्य, सुराज्य की अराजक (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३ | | २/ऑगस्ट ९६ |
| ३९ | मधु नाशिककर : एक कृतिशील जीवन | ३३ | कुलकर्णी माधवी | ३/सप्टेंबर ९६ |
| ४० | महात्मा गांधी स्मरण अणि विस्मरण (संपादकीय) | कव्हरपेज १ | | ४/ऑक्टोबर ९६ |
| ४१ | महाराष्ट्रभूषण (कै) डॉ.शां.भा.देव | ३९, ४० | चितळे श्रीपाद केशव | ७/जानेवारी ९७ |
| ४२ | महाविद्यालयीन वार्ता | ३१ ते ३६ | पाठक मोहन | १/जुलै ९६ |
| ४३ | महाविद्यालयीन वार्ता (महाविद्यालयीन परिसरातील निसर्गरम्य वाटा) | ३७ ते ३९ | पाठक मोहन | ३/सप्टेंबर ९६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | महाविद्यालयीन वार्ता | ३९ | पाठक मोहन | ४/ऑक्टोबर ९६ |
| ४५ | महाविद्यालयीन वार्ता (महिन्याभरातील घडामोडी) | ३७ ते ३९ | पाठक मोहन | ५/नोव्हेंबर ९६ |
| ४६ | महाविद्यालयीन वार्ता | ३८ते४० कव्हरपेज ३ | पाठक मोहन | ६/डिसेंबर ९६ |
| ४७ | महाविद्यालयीन वार्ता | ३८ते४० | पाठक मोहन | ७/जानेवारी ९७ |
| ४८ | महाविद्यालयीन वार्ता | ३७ ते ३८ | पाठक मोहन | ८/फेब्रुवारी ९७ |
| ४९ | महाविद्यालयीन वार्ता | ३१ ते ३८ | पाठक मोहन | ९/मार्च ९७ |
| ५० | महाविद्यालयीन वार्ता | ४५ ते ५० | पाठक मोहन | १०/एप्रिल ९७ |
| ५१ | माझा आपला खारीचा वाटा | ३५ ते ४२ | धोपाटे शशिकांत | ४/ऑक्टोबर ९६ |
| ५२ | मेंदू आणि मन | २७ ते ३१ | अकोलकर वसंत | ७/जानेवारी ९७ |
| ५३ | मेंदू हरवतो तेव्हा (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३ | | ५/नोव्हेंबर ९६ |
| ५४ | रोशन जाल पटेल | ४० | | १/जुलै ९६ |
| ५५ | लज्जा आणि सभ्यतेच्या निधनाबद्दल शोकसभा (संपादकीय) | कव्हरपेज १,२,३ | | १/जुलै ९६ |
| ५६ | वंशसातत्य आणि शुद्ध भाषा (भाषाविचार १) | १७ ते २२ | वैद्य प्रकाश ल. | १/जुलै ९६ |
| ५७ | विज्ञान आणि तंत्रविद्या | ५ ते १३ | बेडेकर विजय | १/जुलै ९६ |
| ५८ | विज्ञान जीवरक्षक की जीवनभक्षक (संपादकीय) | कव्हरपेज१,२ | | १/जुलै ९६ |
| ५९ | वैचारिक खतपाणी | २७,२८ | देवधर प्रभाकर शं. | १/जुलै ९६ |
| ६० | वैदिक भूमिती व वास्तूची आखणी (भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय) | ३१ ते ३३ | कुलकर्णी रघुनाथ पु. | ५/नोव्हेंबर ९६ |
| ६१ | व्यक्तिदोष, कर्करोग (भाषाविचार ५) | २५ ते २७ | वैद्य प्रकाश ल. | ५/नोव्हेंबर ९६ |
| ६२ | व्यवस्थापनाची दर्जेदार शिक्षणामधे भूमिका | ४३,४४ | करंदीकर श्री.वि. | १०/एप्रिल ९७ |
| ६३ | शपथग्रहण की शपथेला ग्रहण (संपादकीय) | कव्हरपेज १,२ | | ७/जानेवारी ९७ |
| ६४ | शिक्षण, साक्षरता व विज्ञान | ५ ते१० व२९ | बेडेकर विजय | २/ऑगस्ट ९६ |
| ६५ | संगणक आणि मानवी मन | १४ ते १६ | गांगल बाळ | १/जुलै ९६ |
| ६६ | संवाद स्वातंत्र्यदेवतेशी | ४०,४१ | बेडेकर विजय | ३/सप्टेंबर ९६ |
| ६७ | संहितारक्षण व मौखिक परंपरा(भाषाविचार ३) | १३ ते २१ | वैद्य प्रकाश ल. | ३/सप्टेंबर ९६ |
| ६८ | सुभाषित | पृ.३,४ (प्रत्येक अंक) | पराडकर मो.दि. | अंक क्र.१ते१० (जुलै ते एप्रिल) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९ | सेवानिवृत्ती | ३७ ते ३९ | | १/जुलै ९६ |
| ७० | सोनफुले (कविता) | ५९ | वैद्य प्रकाश ल. | १०/एप्रिल ९७ |
| ७१ | स्मृती : मेंदू संबंप किती | ३० ते ३२ | अकोलकर वसंत | ८/फेब्रुवारी ९७ |
| ७२ | हरवलेला मार्ग | २९,३० | साने यशवंत | १/जुलै ९६ |
| ७३ | हस्तलिखितांचा मान व अपमान | २७ते३० | बेडेकर वसंत ह. | ६/डिसेंबर ९६ |
| ७४ | ही 'ब्राइड मर्फी' कोण ? | ३५ते३७ | अकोलकर वसंत ह. | ६/डिसेंबर ९६ |
| ७५ | Agriculture in Ancient India | ५ ते १२ | बेडेकर विजय | ३/सप्टेंबर ९६ |
| ७६ | British Policies and Ancient Indian Education | ५ ते १४ | बेडेकर विजय | २/ऑगस्ट ९६ |
| ७७ | British Policies & Indian Culture | ५ ते १४ | बेडेकर विजय | ५/नोव्हेंबर ९६ |
| ७८ | History of Physical Education & Sports | ५ ते ९ व २१ | बेडेकर विजय | ७/जानेवारी ९७ |
| ७९ | JATI, VARNA and Genetics | ५ ते २४ व ३९ | बेडेकर विजय व वैद्य उल्हास | १०/एप्रिल ९७ |
| ८० | Law and Justice in Ancient India | ५ ते १४ | बेडेकर विजय | ४/ऑक्टोबर ९६ |
| ८१ | Vedangas | ५ ते ८ | बेडेकर विजय | ६/डिसेंबर ९६ |

• लेख क्र. ७५ ते ८१ इंग्रजीतील आहेत.

• ही अनुवर्णसूची शीर्षकातील पहिल्या वर्णानुसार आहे.

सूचिसंकलन - प्रा. मोहन पाठक, ग्रंथपाल,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

*With Best Compliments From*

**Shri V.M. Phatak**

Thane (W) 400 602.

# वाढत्या खर्चाला हवे वाढते उत्पन्न
# आमच्याकडे ठेव ठेवून व्हा सम्पन्न

## आकर्षक व्याज दर

# १४%

| मुदत ठेव | |
|---|---|
| ठेवींची मुदत | व्याज दर |
| ३० दिवस ते १ वर्ष | ९.५% |
| १ वर्षांवरील | १४ % |

**६३ महिन्यांत दामदुप्पट**

| पुनर्गुंतवणूक ठेव योजना | |
|---|---|
| ठेवींची मुदत | लाभ |
| १२ महिने | ९.८४% |
| २४ महिने | १५.८४ % |
| ३६ महिने | १७.०४% |
| ४८ महिने | १८.३५% |
| ६० महिने | १९.८०% |

त्वरित व तत्पर सेवेसाठी 'भारत ध्वनी' व 'भारत मुद्रा' योजनांचा लाभ घ्या.

भारत ध्वनी

( TELE BANKING )

भारत मुद्रा

( BTM )

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत संपर्क साधा.

## भारत सहकारी बँक लिमिटेड,

'शततारका', वाजीप्रभू देशपांडे मार्ग, विष्णुनगर, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२९४३२/३३, ५३३५२३७, ५३४६२६७, ५४२९४३१

PERFECT PRINTS, THANE